# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level***

*Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access Journal*

*ISSN:2230-9578 February - 2026 Volume-18 Issue-2(XIX)*



**Mob: +91-9552416001 Website: https://jrdrvb.org Chief Editor: Prof. Ramesh V. Bhole**

# MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL JOURNAL

Website: https://jrdrvb.org



ISSN: 2230-9578
February - 2026
Volume-18 Issue-2(XIX)

Please Get in Touch
Email: jrdrvb.org@gmail.com
Mob: +91-9552416001,+91- 8888454089

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) | February- 2026

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

## Volume No-18, Issue-2(XIX), February - 2026

Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

CHIEF EDITOR
**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

***Disclaimer***

*The Editors shall not be held responsible for the originality or the views and opinions expressed in the papers. The author(s) alone shall bear full responsibility for the originality of their work and the ideas expressed therein.*

***© All rights reserved with the Editors.***

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL PARTICULARS

| Name of Journal | JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT |
|---|---|
| **Frequency** | Monthly : Jan to Dec (12 issues per year) |
| **ISSN** | 2230-9578 |
| **Publisher** | Dr. Ramesh V. Bhole |
| **Chief Editor** | Dr. Ramesh V. Bhole |
| **Copy right** | Journal of Research and Development |
| **Starting Year** | January 2010 |
| **Subject** | Multi-Disciplinary |
| **Review Process** | Double Blind Peer |
| **Language** | English, Hindi, Marathi, and other Indian Constitutional Languages. |
| **Publication Format** | Print |
| **Access** | OPEN ACCESS |
| **License** | CC BY NC SA<br>Creative Commons (CC BY-NC-SA 4.0) |
| **Phone No.** | +91 93256 65856, +91-8888454089 |
| **Email** | jrdrvb.org@gmail.com |
| **Journal Website** | https://jrdrvb.org |
| **Registered office Address** | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon, Maharashtra, India |
| **Admin. Office Address** | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon , Maharashtra, India |
| **Printing** | **Amitsons Digital Copiers**<br>106 and 110, Paras Chambers 1st Floor, Near Laxmi Narayan Theatre, Above Bank Of India, Swargate-411042 |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

## CHIEF EDITOR

**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

## ASSOCIATE EDITORS

**Prof. (Dr.) Madan Mohan Goel**
Vice-Chancellor (Former)
Rajiv Gandhi National Institute of Youth Development, Govt. of India
Starex University, Gurugram, Haryana, India

**Dr. Praveen G. Saptarshi**
Visiting Faculty
Salisbury University, United States

## MANAGING EDITOR

**Dr. Santosh P. Mane**
Assistant Professor,
Head Department of Geography,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org



## EDITORIAL BOARD

| | | |
|---|---|---|
| **BABALOLA, Ayodele Samuel**<br>Department of Pure and Applied Zoology, Federal University of Agriculture, PMB 2240, Abeokuta, Ogun State, Nigerian | **Dr. Lal Mervin Dharmasiri**<br>Senior Professor and Chair Head of Geography<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Vijayanand Selvaraj**<br>Data Strategist and Artificial Intelligence Lead<br>Information Technology (IT), Houston,Texas, USA |
| **Dr. Munther Moh'd Ibrahim Zyoud**<br>Assistant Professor of English Language Teaching Methods-Al-Quds Open University, Palestine. | **Prof. A.G. Amarasinghe**<br>Senior Lecturer Grade<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Dr. Gyanaranjan Sahoo**<br>Extension Scientist<br>Orissa University of Agriculture & Technology, Orissa India |
| **Dr. RVS Praveen**<br>Director<br>Digital Engineering and Assurance, USA | **Dr. Ranjan Kalita**<br>Principal<br>Rangapara College, Amaribari, Rangapara, (Autonomous) Assam | **Dr. S. C. Advitot**<br>Principal<br>CBK's B. Sci, R.V. Com. & R. J. Arts College, Akkalkot |
| **Dr. Kulkarni Swanand Gajanan**<br>Associate Professor,<br>Mechanical Engineering Department, S.K.N. Sinhgad College of Engineering,Korti, Pandharpur- | **Dr. Anurag Shrivastava**<br>Professor & Post Doctoral,<br>Lincoln University College (LUC) Petaling Jaya, Malaysia, Malyasia | **Prof. (Dr.) F. M. Nadaf**<br>Principal,<br>Government College Borda Margao Goa (Autonomous), India |
| **Dr. Tushti Sharma**<br>Royal School of Languages,<br>The Assam Royal Global University, Guwahati, Assam | **Dr. Sandeep Rout**<br>Faculty of Agriculture,<br>Sri Sri University, Cuttack, Odisha | **Dr. Daneshwar. R. Pandey**<br>Assistant Professor,<br>Head Of Department<br>S.S Agrawal College Of Commerce And Management Navsari Gujarat |



## PUBLISHER

**Dr. Ramesh V. Bhole**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon

Email: jrdrvb.org@gmail.com Journal Website: https://jrdrvb.org

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX)| February - 2026


| Sr. No. | CONTENTS | Page No. |
|---|---|---|
| 1 | A study of the Problems faced by Women Fisherfolk in Ratnagiri District **Dr. Dinesh Yadavrao Parkhe** | 1-4 |
| 2 | विकास प्रक्रिया आणि सामाजिक चळवळींचे समाजशास्त्र : भारत व महाराष्ट्राचा अभ्यास **ए. आर. शेळके** | 5-7 |
| 3 | विकसित भारत २०४७: राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० आणि ग्रंथालय विज्ञान शिक्षणाची भूमिका **डॉ. संगिता गंगाराम उतेकर** | 8-13 |
| 4 | योग, आयुर्वेद आणि सर्वांगीण शिक्षण : एक अभ्यास **ज्ञानेश्वर गोविंदराव मुंढे** | 14-17 |
| 5 | परंपरागत विपणन आणि आधुनिक विपणनातील आयाम **डॉ. प्रशांत म. पुराणिक** | 18-24 |
| 6 | नव्या भारतातील उद्योजकता आणि स्टार्ट परिसंस्था **रुपाली प्रशिल पाटील,डॉ. लतिका ज्ञानेश्वर गायकवाड** | 25-29 |
| 7 | ग्रामीण उपजीविकेमध्ये महिला शेतकरी आणि लिंगाधारित भूमिका (Women Farmers and Gender Roles in Rural Livelihoods) **डॉ. रेखा दत्तात्रय आपटे** | 30-34 |
| 8 | सिनेमा, डिजिटल मीडिया और समाज(Cinema, Digital Media and Society) **माधुरी परशुराम कांबळे** | 35-39 |
| 9 | स्पर्धा परीक्षांच्या यशामध्ये महाविद्यालयीन ग्रंथालयाची भूमिका आणि विद्यार्थांचे अभ्यासाचे नियोजन : एक अभ्यास **सुभाष एकनाथ निकम, डॉ.दादासाहेब आर.पवार** | 40-42 |
| 10 | वायू प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि देखरेख तंत्रज्ञानाचा अभ्यास **दिपाली मालू बांगारे** | 43-47 |
| 11 | महाराष्ट्रातील ऐतिहासिक लेण्यांचे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व: - एक अभ्यास **डॉ. अंकुश मारुती सोहनी** | 48-50 |
| 12 | ग्रामीण भागात होणारे शहरी संक्रमण **श्रद्धा संतोष भोईर** | 51-52 |
| 13 | शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवा : एक चिकित्सक अध्ययन **डॉ. अनंत मारोतराव थोरात** | 53-60 |
| 14 | भारतीय भाषा, साहित्य आणि ज्ञानपरंपरा यांचे विकसित भारत २०४७ शाश्वत विकासातील योगदान **शिल्पा मधुकर रामटेके** | 61-64 |
| 15 | लोकसंस्कृती, आदिवासी परंपरा आणि मौखिक इतिहास श्री. **यशवंत ढवळा भांडकोळी, प्राचार्य, डॉ. शंकर शिवाजी मुंडे** | 65-69 |
| 16 | आदिवासी लोकसंस्कृती, परंपरा आणि मौखिक इतिहास एक संशोधनात्मक अभ्यास **Sarita Dashrath Deshmukh,Dr. Baban Bhivsen Jadhav** | 70-73 |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# A study of the Problems faced by Women Fisherfolk in Ratnagiri District

**Dr. Dinesh Yadavrao Parkhe**
HOD of Economics, Patpanhale Arts, Commerce & Science College Ptpanhale Tal- Guhagar Dist-Ratnagiri
**Email:** dinesh.parakhe@gmail.com

**Manuscript ID:** JRD -2026-180201
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 1-4
February - 2026
**Submitted:** 15 Jan. 2026
**Revised:** 25 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***Abstract***

*भारताला सुमारे ७५१६ कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे आणि त्याने भारताला तीन बाजूने वेढले आहे. भारतातील मासेमारी ही भारतीय अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचे पुरुषाबरोबरच महिलांना रोजगार मिळवून देणारे एक महत्वाचे क्षेत्र आहे भारताला मिळणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी १.०७ टक्के उत्पन्न मासेमारी व्यवसायापासून मिळते मस्य उत्पादनात भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो.महाराष्ट्राला ७२० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे देशामध्ये महाराष्ट्राचा मासेमारीमध्ये ७ वा क्रमांक लागतो.रत्नागिरी जिल्ह्यात एकूण ९ तालुके असून त्यातील तीन तालुके अभ्यासासाठी घेतले आहे ज्याच्यातून पूर्ण जिल्ह्याचे चित्र स्पष्ट होते.त्यात राजापूर, गुहागर आणि दापोली या तालुक्यातील एकूण १५० मच्छिमार महिलांच्या भेटी घेवून त्यांना मासे विक्री करतांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते याचा अभ्यास केला आहे.रत्नागिरी जिल्ह्यातील मिऱ्या बंदर, नाटे बंदर, दाभोळ बंदर पालशेत बंदर,हर्णे बंदर आणि वेसवी बंदर हि अभ्यासासाठी निवडण्यात आली.अभ्यासासाठी प्रश्नावली पद्धतीचा वापर करण्यात आला आहे यात १०० महिलांच्या समस्यांचा आढावा घेण्यात आला.मासेमारी करतांना स्वमालकीच्या साहित्याची कमतरता, बर्फाची कमी उपलब्धता,मासे विक्री साठी दूरवरचा प्रवास, कमी उत्पन्न आणि मच्छी साठवणुकीसाठी सुविधा नाही यासारख्या महत्वाच्या समस्यांना मच्छिमार महिलांना सामोरे जावे लागते.यासाठी महिलांना योग्य प्रशिक्षण मासेमारी व्यवसायासाठी उपयुक्त साहित्य पुरविले तर महिलांना नक्कीच सोयीचे होईल. केंद्र व राज्य सरकारकडून मस्यपालन व्यवसाय (Fish Farming) करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले जात आहे.*

***Key words**: - मच्छिमार महिला, कोकण, रत्नागिरी, राजापूर, गुहागर, दापोली इ.*

## Introduction: -

मस्य उत्पादनात भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो. जागतिक मस्य उत्पादनाच्या ७.७ टक्के उत्पादन भारतात होते मस्य उत्पादनात आपल्या देशात खूप विविधता आणि विपुलता दिसून येते. जगातील मासे आणि शेलफिश प्राण्यांच्या जातीत जैवविविधतेमध्ये भारताचा वाटा दहा टक्क्याहून अधिक आहे भारताला ७५१६ कि.मी लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे एकूण ९ राज्ये आणि ४ केंद्र शासित प्रदेश यांना तो सीमित असून दक्षिणेकडील राज्याचे मस्य उत्पादन ५९ टक्के आणि पूर्वेकडील किनारी प्रदेशाचे ४१ टक्के उत्पन्न आहे.गुजरात हे राज्य एकूण सागरी मस्य उत्पादनाच्या १९ टक्के असून ते सर्वाधिक सागरी उत्पादन करते तर त्यानंतर तामिळनाडू,,केरळ आणि महाराष्ट्र सध्या ४ थ्या क्रमांकावर आहे.

महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासात मस्य व्यवसाय विभागाचा महत्वाचा वाट आहे. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गातील लोकांकरिता रोजगार मिळण्यासाठी मत्स्य व्यवसाय क्षेत्र हा महत्वाचा स्रोत आहे आणि मत्स्य व्यवसायाच्या विविध क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून मत्स्य व्यवसायाचा विकास करणे हा उद्देश आहे.रत्नागिरी हे भारतातील पश्चिम किनारपट्टीत वसलेले महाराष्ट्र राज्यातील एक मुख्य बंदर आहे.समुद्र किनाऱ्यालगतचा प्रदेश. हा प्रदेश साधारणपणे समुद्र किनाऱ्यापासून १५ ते २० कि.मी.पर्यंत विस्तारला आहे.हा भाग समुद्र सपाटीपासून कमी उंचीवर आहे. या ठिकाणी सरासरी सुमारे २५०० मि.मी.पाऊस पडतो.या भावतील बहुतांश व्यवसाय हे समुद्राशी निगडीत आहे.या परिसरात असंख्य किनारे,खाडी,समुद्र किल्ले आणि बंदरे आहेत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19325686
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*Dr. Dinesh Yadavrao Parkhe, HOD of Economics, Patpanhale Arts, Commerce & Science College Ptpanhale Tal- Guhagar Dist-Ratnagiri*

**How to cite this article:**
*Parkhe, D. Y. (2026). A study of the Problems faced by Women Fisherfolk in Ratnagiri District. Journal of Research and Development, 18(2(XIX)), 1–4. https://doi.org/10.5281/zenodo.19325686*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

रत्नागिरी जिल्ह्यातील वाशिष्ठी,जगबुडी,सावित्री,बाव,मुचकुंदी आणि जैतापूर यासारख्या प्रमुख नद्या असून त्या सह्याद्री पर्वतात उगम पावून अरबी समुद्राला येवून मिळतात या नद्यांमध्ये पण कमी अधिक प्रमाणात मासेमारी केली जाते.मात्र दाभोळ ,पालशेत,हर्णे,नाटे आणि मिऱ्या बंदर येथे मोठ्या प्रमाणात मासेमारी व विक्री केली जाते केंद्रीय अर्थसंकल्पात देशातील मत्स्य निर्यात दुप्पट करण्याचा सरकारचा विचार आहे.या साठी सरकारकडून अनेक योजना राबविल्या जात आहेत.मात्र आता मत्स्य शेतीसाठी योजना राबविण्याबरोबरच केंद्र सरकारकडून मस्त्य उत्पादकांना प्रशिक्षण देखील दिले जाणार आहे.केंद्र सरकारकडून मत्स्य उत्पादकांसाठी २० हजार ५०० कोटीची पंतप्रधान मस्त्य संपदा योजना (Fish Farming) राबविली जात आहे.त्याच बरोबर मस्त्य पालन व्यवसायासाठीकेंद्र सरकारकडून फिश हार्बर,फिश लॅन्डींग सेंटर यासारखी अत्याधुनिक सुविधा दिल्या जात आहेत.किसान क्रेडीट कार्ड आणि विमा योजनांचा मस्त्य उत्पादकांना लाभ दिला जात आहे.तसेच २३६५ कोटी रुपये नील क्रांती साठी देण्यात आले आहेत. अशा या मस्त्य व्यवसायात महिलांच्या ज्या समस्या आहेत त्या जाणून घेण्याचा प्रयत्न या संशोधन लेखाच्या माध्यमातून संशोधकाने केला आहे.

**Review of literature**: -

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, दापोली आणि राजापूर तालुक्यातील संशोधन साहित्याचा आढावा घेतल्यानंतर असे निदर्शनास आले की, बहुतांश मच्छीमार महिला या विवाहित असून त्या विभक्त कुटुंबात राहत आहे. यातील बहुतांश महिलांचे उत्पन्न ५०,००० ते १,००,००० रु या गटात येतात जवळपास ५२% महिलांना कोणत्याही प्रकारचे तांत्रिक आणि व्यावसायिक मार्गदर्शन मिळाले नाही.रत्नागिरी जिल्ह्यातील महिलांना प्राधान्याने स्वयसहायता गट स्थापन करणे,आर्थिक साक्षरता,कचऱ्याचे निस्सारण,मासे प्रक्रिया व साठवणूक इ.बाबत प्रशिक्षणाची गरज आहे (Bhave et al..2022).

**Objective of Research**: -

1.रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, दापोली आणि राजापूर तालुक्यातील मस्त्य व्यवसाय करणाऱ्या महिलांचा सामाजिक आणि आर्थिक अभ्यास करणे.

2. रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर,दापोली आणि राजापूर तालुक्यातील मस्त्य व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या समस्या जाणून घेणे.

**Research Methodology and Data Collection**:- या संशोधन लेखासाठी प्राथमिक आणि दुय्यम माहितीवर आधारित आहेत.संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती व तथ्ये रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर,दापोली आणि राजापूर तालुक्यातील मच्छीमार महिलांकडून प्रश्नावली द्वारे संकलित केलेली आहे.संशोधनाकरिता आवश्यक इतर माहिती वर्तमान पत्रे, मासिके आणि सरकारी अहवाल इ.द्वारे संकलित केली आहे.

**Social and Economic status of women fisherfolk in Ratnagiri District: -**

रत्नागिरी जिल्ह्यात मस्त्य व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो त्यामध्ये पुरुषापेक्षा महिलांचे प्रमाण जास्त असल्याचे प्रकर्षाने जाणवते. सदर संशोधनात जिल्ह्यातील गुहागर,दापोली आणि राजापूर तालुक्यातील महिलांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती जाणून घेण्यासाठी पुढील तक्ता क्र.१ मध्ये लक्षात येईल.

**तक्ता क्र.१**

**रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छीमार महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती**

| अ.क्र. | तपशील | वारंवारिता(n=100) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वयोगट (वर्ष) | | |
| | तरुण(१८-३४) | ४८ | ४८ टक्के |
| | अर्धमध्य(३५-४४) | २५ | २५ टक्के |
| | मध्य(४५-६४) | १७ | १७ टक्के |
| | वृद्ध(६५ वर्ष व त्यापेक्षा अधिक) | १० | १० टक्के |
| २ | **शैक्षणिक पातळी** | | |
| | निरक्षर | २२ | २२ टक्के |
| | प्राथमिक/शालेय शिक्षण | ४९ | ४९ टक्के |
| | माध्यमिक शालेय शिक्षण | २५ | २५ टक्के |
| | उच्च माध्यमिक व त्यापेक्षा जास्त | १३ | १३ टक्के |
| ३ | **विक्रीचा प्रकार** | | |
| | बर्फाच्छादित/ताजे मासे | ३० | ३० टक्के |
| | सुकवलेले मासे | ४५ | ४५ टक्के |
| | दोन्ही प्रकारचे | २५ | २५ टक्के |
| ४ | **मासे विक्रीचे ठिकाण /प्रकार** | | |
| | मासळी बाजार | ५० | ५० टक्के |
| | रस्त्यालगत किरकोळ विक्री | २५ | २५ टक्के |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

| | | | |
|---|---|---|---|
| | घरोघरी फिरून | २० | २० टक्के |
| | बंदर | ०५ | ०५ टक्के |
| ५ | **मासे खरेदी स्रोत** | | |
| | घाऊक विक्रेते | २५ | २५ टक्के |
| | दलाल | ०८ | ०८ टक्के |
| | किरकोळ विक्रेते | ५२ | ५२ टक्के |
| | लिलाव | १५ | १५ टक्के |
| ६ | **विक्रीचे अंतर** | | |
| | ५ किलोमीटर पर्यंत | १५ | १५ टक्के |
| | ५ ते १० किलोमीटर | २८ | २८ टक्के |
| | १० ते १५ किलोमीटर | २७ | २७ टक्के |
| | १५ किलोमीटर पेक्षा जास्त | ३० | ३० टक्के |

**संदर्भ :- प्रश्नावली द्वारे माहिती संकलन.**

वरील तक्ता क्र. १ वरून असे निदर्शनास येते की, ४८ टक्के महिला या तरुण वयोगटातील आहेत.तर १७ टक्के महिला या अर्ध मध्य वयोगटातील आहेत,२५ टक्के महिला मध्य वयोगटातील आहेत आणि १० टक्के महिला या वृद्ध वयोगटातील आहे.

शैक्षणिक पातळीचा विचार केला तर असे दिसून येते की, २२ टक्के महिला निरक्षर असल्याचे दिसून आले.४९ टक्के महिलांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण आहे.२५ टक्के महिला माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या आहेत.तर फक्त ३ टक्के महिला उच्च शिक्षित आहेत.

विक्रीचा प्रकार विचारात घेता बर्फाच्छादित/ताजे मासे ३० टक्के महिला विकतात. ४५ टक्कर महिला सुकवलेले मासे विकतात तर दोन्ही प्रकारचे मासे विकणाऱ्या महिलांचे प्रमाण २५ टक्के असल्याचे दिसून येते.बर्फाची उपलब्धता खूप कमी असल्याने सुके मासे जास्त महिला विकतांना दिसून येतात.

विपणनाचा विचार करता,मासळी बाजारात ५० टक्के महिला मासे विकतात रस्त्यालगत २५ टक्के,घरोघरी जाऊन मासे विक्री करणाऱ्या महिलांचे प्रमाण २० टक्के आहेत.तर बंदरावर मासे विक्री करण्याचे प्रमाण ५ टक्के आहे.

मासे विक्रीसाठी महिला ज्या वेगवेगळया ठिकाणी जातात त्या अंतराचा विचार करता असे दिसून येते की,१५ टक्के महिला ५ किलोमीटर अंतर नेहमी चालत जातात. ५ ते १० किलोमीटर अंतर जाणाऱ्या महिलांचे प्रमाण २८ टक्के, १० ते १५ किलोमीटर अंतर जाणाऱ्या महिला २७ टक्के तर १५ किलोमीटर च्या मासळी विक्रीला जाणाऱ्या महिलांचे प्रमाण ३० टक्के असल्याचे माहितीच्या आधारे लक्षात आहे.

**Problems faced by Women fisherfolk in Ratnagiri District: -**

मासेमारी या क्षेत्रामध्ये आपल्याला हमी नसलेल्या उत्पन्नाची अनिश्चितता आहे. बालसंगोपन,कौटुंबिक आरोग्य,घरगुती व्यवस्थापन,अन्न,स्वच्छता, मुलांचे शिक्षण, कर्ज फेडण्याची जबाबदारी आणि आर्थिक व्यवस्थापनाची जबाबदारी महिलांच्या खांद्यावर असते.सीझन नसतांना ती जबाबदारी दुप्पट होते घटणारी संसाधने,अवघड काम आणि वाढती स्पर्धात्मक परिस्थिती यामुळे त्यांचे काम आणखी कठीण होते.यासारख्या समस्या महिलांना मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहेत.त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे-

1. सामाजिक समस्या:- रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छीमार महिला मासेमारीच्या विक्रीवर त्याचे कुटुंब चालवतात. कमी साक्षरता दर,आरोग्य सेवेचा अभाव आणि मच्छीमार महिलांमधील असहकार्य हे प्रमुख सामाजिक अडथळे आहेत जे मच्छीमार महिलांना पार करावे लागतात.या शिवाय मासळी विक्रीत समावेश असलेल्या महिलांना बाजारभावातील चढ-उतार, अस्वच्छता आणि बाजार पेठेतील मुलभूत सुविधांचा अभाव या सारख्या समस्यांना नेहमीच तोंड द्यावे लागते.
2. वैयक्तिक आणि घरगुती समस्या:- महिलांवर मासे विक्री करण्याबरोबरच घरातल्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात. कामाच्या दयनीय परिस्थितीमुळे मच्छीमार महिलांना एर्गोनॉमिक समस्या उद्भवतात. कमी शिक्षणाचे प्रमाण,घरगुती कामे, समकक्षकडून कोणतेही समर्थन नाही त्याचबरोबर मुलांचे शिक्षण यासारख्या काही वैयक्तिक समस्या आहेत.
3. आरोग्य संबधित समस्या;- महिलांना मासे विक्रीसाठी खूप अंतर चालत जावे लागते किवा गाडीने जावे लागते मच्छीमार महिलांना बंदरावरून दररोज मासे भरून बाजारपेठेत आणावे लागतात.या स्त्रिया दररोज डोक्यावर ३५-४० किलो मासांचा भर वाहतात.यामुळे संपूर्ण दबाव त्यांच्या शरीरावर येतो.विशेषतः पाठीच्या कण्यावर त्याचा भर पडून डिस्क स्लिप आणि पाठदुखीच्या समस्या उदभवतात. त्याच प्रमाणे मणक्याचे आजार,मानेचे आजार या सारख्या आजारांचा सामना करावा लागतो.सामान्यत व्हिटामिन ए आणि बी च्या कमतरतेने मधुमेह,उच्च रक्तदाब या सारख्या आजारांना त्यांना सामोरे जावे लागते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

4. शिक्षण संबधीत समस्या:- साक्षरता हा विकासाचा स्रोत आहे.परंतु मच्छीमार महिला आणि त्यांच्या मुलांमधील साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे कारण मच्छीमार महिलांचा हा पारंपारिक व्यवसाय असल्याने त्यांची मुलेही लहान पणापासून मस्त्य व्यवसायात गुंतलेली असल्याने त्यांचा शिक्षणातील ओढा खूपच कमी असल्याचे निदर्शनास येते.
5. बर्फाची अनुपलब्धता :- मासे हे नाशवंत असल्याने त्यांना विक्रीसाठी जास्त वेळ बर्फात ठेवणे आवश्यक असते मात्र ग्रामीण भागातील महिलांना वेळेवर बर्फ उपलब्ध न झाल्याने कित्येक वेळा मासे खराब होतात.त्याचप्रमाणे बाजारपेठेत शीतगृहाची सोय नसते.
6. आर्थिक समस्या;- मच्छीमार महिलांचे हातावर पोट असल्याने त्यांना खूप खडतर परिश्रम करावे लागतात कमी उत्पन्न आणि कोणताही पर्यायी रोजगार उपलब्ध नसल्याने मच्छीमार महिलांच्या जीवनात अनेक गुंतागुंत निर्माण होतात.साहजिकच कर्जबाजारीपणाचे दुष्टचक्र त्यांना मोठ्या व्याजदराने सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते उत्पादनाची कमी किमत आणि खात्रीशीर बाजारपेठेचा अभाव या प्रमुख आर्थिक समस्या आहेत.
7. तांत्रिक समस्या:- वाढते तंत्रज्ञान हि काळाची गरज आहे परंतु रत्नागिरी जिल्ह्यातील महिलांना अनेक तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागते मच्छीमार महिलांना सामान्यत: तांत्रिक पर्यवेक्षण,नाविन्यपूर्ण उपकरणे आणि कार्य पद्धतीच्या अभावाचा सामना करावा लागतो.

**Conclusion**: -

भारताला मिळणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी १.०७ टक्के वाट मस्त्य व्यवसायातून मिळतो. यात महाराष्ट्राचा ७ ववा क्रमांक लागतो. २०२४-२५ मध्ये महाराष्ट्रात ३.११ लाख टन सागरी मस्त्य उत्पादन झाले जे मागील वर्षी २.११ लाख टन होते. हि वाढ सकारात्मक आहे महाराष्ट्रातून मासळीची निर्यात मोठ्या प्रमाणात होत आहे.सिल्व्हर पापलेट हा राज्य मासा म्हणून घोषित करण्यात आला आहे. या जिल्ह्यातील महिलांना मासेमारी करतांना सुविधांचा अभाव,कर्जाचा बोजा,मासळी खराब होणे,व्यवसायिक आजार या बाबत कमतरता आहे तसेच आधुनिक तंत्रज्ञान या बाबत जागरूक नाहीत.

**Suggestions: -**

रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छीमार महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी अभासाअंती काही शिफारशी पुढीलप्रमाणे: -

1. पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण:- जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी आणि मुख्य गावात सर्व सोयींनीयुक्त आदर्श मासळी बाजार उभारला जावा.मासळीची नासाडी टाळण्यासाठी मिनी कोल्ड स्टोरेज आणि आईस प्लांट ची सुविधा करावी.
2. आर्थिक सक्षमीकरण आणि वित्त पुरवठा :- मासळी खरेदी साठी सावकारा ऐवजी बँकामार्फत कमी व्याजाचे खेळते भांडवल उपलब्ध करून द्यावे. मच्छीमार महिलांसाठी विमा संरक्षण द्यावे ज्यामध्ये आजारपण आणि अपघात मुळे नुकसान भरपाई मिळेल.
3. मूल्यवर्धन आणि प्रशिक्षण:- मासे फक्त विकण्यापेक्षा त्यापासून लोणची,पापड,सुकट पदार्थ बनवण्याचे आधुनिक प्रशिक्षण महिलांना द्यावे. रत्नागिरी फिश या नावाने महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना ऑनलाईन प्लॅटफॉर्म उपलब्ध करून द्यावा.
4. डिजिटल साक्षरता आणि संघटन:- बदलत्या काळानुसार या महिलांना ऑनलाईन पेमेंट स्वीकारण्याचे प्रशिक्षण द्यावे.
5. सहकारी संस्थांचे बळकटीकरण:- महिलांच्या स्वतंत्र मच्छीमार सहकारी संस्था स्थापन करून त्याद्वारे लिलावाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवावा.जेणेकरून दलालाचे वर्चस्व कमी होईल.

मच्छीमार महिलांसाठी स्वतंत्र कल्याणकारी महामंडळ स्थापन केल्यास त्यांच्या पेन्शन, आरोग्य आणि मुलांच्या शिक्षणाचे प्रश्न अधिक प्रभावीपणे सुटू शकतील.

**Bibliography**: -

1. महाराष्ट्र शासन, मस्त्य विभाग: वार्षिक प्रशासन अहवाल(रत्नागिरी जिल्हा विशेष).
2. MSAMB महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ: मासळी बाजार आणि पायाभूत सुविधावरील अहवाल.
3. डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ(दापोली): रत्नागिरीतील मस्त्य व्यवसायावर आधारित पदव्युत्तर अभ्यास.
4. Journal of Fisheries Economics: मस्त्य व्यवसायातील महिलांचे आर्थिक योगदान आणि कर्जबाजारीपणावरील शोध निबंध.
5. कोकणातील मस्त्य व्यवसाय: लेखक –प्रा.जे.ए.साठे (स्थानिक भौगोलिक आणि आर्थिक परिस्थितीचा आढावा).
6. ICAR(भारतीय कृषी संशोधनपरिषद): महिला मच्छीमारांच्या सक्षमीकरणासाठी राबवलेल्या प्रकल्पांचे अहवाल.
7. कोकणात काम करणाऱ्या दक्षता किवा स्थानिक मच्छीमार संस्थांनी प्रकाशित केलेले छोटेखानी अहवाल(NGO).

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# विकास प्रक्रिया आणि सामाजिक चळवळींचे समाजशास्त्र : भारत व महाराष्ट्राचा अभ्यास

**ए. आर. शेळके**
सहाय्यक प्राध्यापक समाजशास्त्र विभाग , शा. घो.कला,विज्ञान व गो.प.वाणिज्य महाविद्यालय,
शिवळे.तालुका- मुरबाड. जिल्हा – ठाणे.
**Email:** shelkeashok321@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180202
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 5-7
February - 2026

***सारांश (Abstract)***

*विकास ही संकल्पना आर्थिक वाढ, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विस्ताराशी संबंधित मानली जाते. मात्र, या विकास प्रक्रियेमुळे समाजातील सर्व घटकांना समान लाभ मिळतोच असे नाही. विशेषतः भारत व महाराष्ट्राच्या संदर्भात अनेक विकास प्रकल्पांमुळे विस्थापन, पर्यावरणीय ऱ्हास, आदिवासी व ग्रामीण समाजाचे शोषण आणि सामाजिक विषमता वाढलेली दिसून येते. या पार्श्वभूमीवर विकास प्रक्रियेविरोधात किंवा पर्यायी विकासाच्या मागणीसाठी विविध सामाजिक चळवळी उदयास आल्या आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात विकास प्रक्रियेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करताना भारत व महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींची भूमिका, स्वरूप, कारणे व परिणामांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. दुय्यम साधनसामग्रीच्या आधारे हा अभ्यास करण्यात आला असून, विकास व सामाजिक चळवळी यांमधील परस्परसंबंध समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.*

**Submitted:** 15 Jan. 2026
**Revised:** 25 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

**प्रस्तावना**

स्वातंत्र्योत्तर भारतात विकास ही संकल्पना राष्ट्रनिर्माणाशी जोडलेली राहिली आहे. नियोजन आयोगाच्या माध्यमातून पाच वर्षांच्या योजनांद्वारे औद्योगिकीकरण, धरणे, रस्ते, खाणी, ऊर्जा प्रकल्प यांचा विस्तार करण्यात आला. तथापि, या विकास प्रक्रियेचा लाभ प्रामुख्याने शहरी व सत्ताधारी वर्गालाच मिळाल्याचे दिसून येते. ग्रामीण, आदिवासी, शेतकरी व कामगार वर्ग विकासाच्या प्रक्रियेत उपेक्षित राहिला. याच परिस्थितीतून सामाजिक असंतोष वाढला आणि त्यातून विविध
सामाजिक चळवळी उदयास आल्या. समाजशास्त्राच्या दृष्टीने विकास आणि सामाजिक चळवळी यांचे परस्परसंबंध समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**१) विकास प्रक्रियेची समाजशास्त्रीय संकल्पना**

समाजशास्त्रात विकास केवळ आर्थिक वाढ म्हणून न पाहता सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व पर्यावरणीय बदलांची एक व्यापक प्रक्रिया म्हणून पाहिला जातो. आधुनिकीकरण सिद्धांत, अवलंबित्व सिद्धांत आणि नव-उदारमतवादी विकास मॉडेल्स या विविध सैद्धांतिक चौकटींमधून विकासाचे विश्लेषण केले जाते. भारतातील विकास प्रक्रिया प्रामुख्याने राज्यकेंद्रित आणि भांडवलप्रधान राहिल्यामुळे सामाजिक विषमता, प्रादेशिक असमतोल आणि वर्गसंघर्ष वाढल्याचे समाजशास्त्रीय अभ्यासातून स्पष्ट होते.

**२) सामाजिक चळवळी : अर्थ व स्वरूप**

सामाजिक चळवळी म्हणजे सामाजिक अन्याय, शोषण व विषमतेविरोधात संघटितपणे करण्यात येणारा लोकसंघर्ष होये. भारतात स्वातंत्र्योत्तर काळात शेतकरी, कामगार, आदिवासी, महिला व पर्यावरणीय चळवळी मोठ्या प्रमाणात उदयास आल्या. या चळवळी केवळ विरोधात्मक नसून पर्यायी विकास मॉडेल्सची मांडणी करतात. त्यामुळे सामाजिक चळवळी विकास प्रक्रियेचे चिकित्सक परीक्षण करणारे महत्त्वाचे सामाजिक घटक ठरतात.

**Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)**
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.19325732
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*ए. आर. शेळके,सहाय्यक प्राध्यापक समाजशास्त्र विभाग , शा. घो.कला,विज्ञान व गो.प.वाणिज्य महाविद्यालय, शिवळे.तालुका- मुरबाड. जिल्हा – ठाणे.*

**How to cite this article:**
*शेळके. ए . आर. (2026). विकास प्रक्रिया आणि सामाजिक चळवळींचे समाजशास्त्र: भारत व महाराष्ट्राचा अभ्यास. Journal of Research and Development, 18(2(XIX)), 5–7. https://doi.org/10.5281/zenodo.19325732*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

**३) भारतातील विकास प्रक्रिया आणि सामाजिक चळवळी**

भारतात मोठ्या धरणांचे प्रकल्प, खाणकाम, औद्योगिक क्षेत्रांचा विस्तार आणि विशेष आर्थिक क्षेत्रे (SEZ) यांमुळे मोठ्या प्रमाणावर विस्थापन झाले. नर्मदा बचाव आंदोलन, चिपको चळवळ, सिंगूर-नंदीग्राम आंदोलन यांसारख्या चळवळी विकासाच्या एकांगी धोरणांविरोधात उभ्या राहिल्या. या चळवळींनी विकासाच्या मानवी व पर्यावरणीय पैलूंवर भर देत राज्यसत्तेला प्रश्न विचारले.

**४) महाराष्ट्रातील विकास प्रक्रिया आणि सामाजिक चळवळी**

महाराष्ट्र हे औद्योगिक व कृषी दोन्ही दृष्टिकोनातून महत्त्वाचे राज्य आहे. धरणग्रस्त चळवळी, आदिवासी हक्क चळवळी, शेतकरी आंदोलने आणि पर्यावरणीय चळवळी येथे मोठ्या प्रमाणात दिसून येतात. कोयना, जायकवाडी, ताडोबा, रायगड औद्योगिक पट्टा अशा विकास प्रकल्पांमुळे स्थानिक समाजावर विपरीत परिणाम झाले. परिणामी, महाराष्ट्रात लोककेंद्रित विकासाच्या मागणीसाठी सामाजिक चळवळी अधिक तीव्र झाल्या.

**५) विकास, राज्यसत्ता आणि सामाजिक संघर्ष**

राज्यसत्ता विकासाच्या नावाखाली भांडवलशाही हितसंबंधांना प्राधान्य देते, असा आरोप सामाजिक चळवळी करतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, विकास ही केवळ आर्थिक प्रक्रिया नसून ती सत्तासंबंधांनी नियंत्रित असते. त्यामुळे विकास प्रक्रियेतून सामाजिक संघर्ष निर्माण होणे अपरिहार्य ठरते. सामाजिक चळवळी या संघर्षांचे संघटित रूप म्हणून समोर येतात.

**संशोधनाची गृहीतके**

१) भारत व महाराष्ट्रातील विकास प्रक्रियेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करणे.
२) विकास प्रक्रियेचा सामाजिक चळवळींवर होणारा प्रभाव अभ्यासणे.
३) सामाजिक चळवळींची विकास प्रक्रियेतील भूमिका समजून घेणे.
४) विकास व सामाजिक न्याय यांतील परस्परसंबंध स्पष्ट करणे.

**संशोधनाचे उद्दिष्टे**

१ ) असमतोल विकास प्रक्रियेमुळे सामाजिक चळवळी उदयास आल्या आहेत.
२ ) विकास धोरणांतील सामाजिक-आर्थिक विषमता चळवळींना चालना देते.
३ ) प्रकल्पांमुळे विस्थापन व संघर्षात्मक चळवळी वाढल्या आहेत.
४ ) सामाजिक चळवळी विकास प्रक्रियेत सामाजिक न्यायाची मागणी करतात.

**संशोधन अध्ययन पद्धत**

या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. भारत व महाराष्ट्रातील विकास प्रक्रिया व सामाजिक चळवळी यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आढावा घेतला आहे. संशोधनात दुय्यम माहिती स्रोतांचा वापर करण्यात आला असून शासकीय अहवाल, आयोगांचे दस्तऐवज, जनगणना माहिती, संशोधन जर्नल्स व पुस्तके यांचा समावेश आहे. तुलनात्मक व सामग्री विश्लेषण पद्धतीद्वारे विकास धोरणे व सामाजिक चळवळींचे स्वरूप व परिणामांचे विश्लेषण करण्यात आले आहे

**संशोधनाचा सैद्धांतिक दृष्टिकोन**

हे संशोधन भारत व महाराष्ट्रातील विकास प्रक्रिया आणि सामाजिक चळवळी यांच्यातील परस्परसंबंध समजून घेण्यासाठी बहुआयामी समाजशास्त्रीय सैद्धांतिक चौकटीचा अवलंब करते. विकास प्रक्रिया ही केवळ आर्थिक वाढीपुरती मर्यादित नसून ती सामाजिक रचना, सत्तासंबंध, संसाधनांचे वितरण व सामाजिक न्याय यांवर परिणाम घडविणारी प्रक्रिया आहे.

या अभ्यासाचा प्रमुख सैद्धांतिक आधार मार्क्सवादी संघर्ष सिद्धांत आहे. या सिद्धांतानुसार विकास प्रक्रियेतून वर्गीय विषमता, संसाधनांवरील असमान नियंत्रण आणि शोषण वाढते. भारत व महाराष्ट्रातील औद्योगिकीकरण, भांडवली विकास आणि मोठ्या प्रकल्पांमुळे शेतकरी, कामगार, दलित व आदिवासी समुदायांमध्ये असंतोष निर्माण होऊन सामाजिक चळवळी उदयास आल्या आहेत.

यासोबतच आधुनिकीकरण सिद्धांत विकासाला सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया म्हणून स्पष्ट करतो. मात्र भारतीय विकासाचा अनुभव दर्शवितो की आधुनिकीकरणाचे लाभ सर्व समाजघटकांपर्यंत समानरीत्या पोहोचलेले नाहीत. त्यामुळे पारंपरिक उपजीविका, सामाजिक संबंध व सांस्कृतिक ओळखी धोक्यात येऊन विविध सामाजिक चळवळी उभ्या राहिल्या आहेत.

या संशोधनात नव-सामाजिक चळवळ सिद्धांत देखील महत्त्वाचा आहे. हा सिद्धांत सामाजिक चळवळींना केवळ आर्थिक मागण्यांपुरते न ठेवता पर्यावरण, ओळख, मानवी हक्क, लैंगिक समानता व लोकशाही सहभागाशी जोडतो. महाराष्ट्रातील पर्यावरणीय, आदिवासी व नागरी हक्क चळवळी विकासाच्या पर्यायी संकल्पनांची मांडणी करतात.

एकूणच, ही सैद्धांतिक चौकट विकास प्रक्रिया आणि सामाजिक चळवळी यांच्यातील संघर्ष व परस्परसंवाद स्पष्ट करते आणि सामाजिक चळवळी विकास प्रक्रियेला अधिक न्याय्य व लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न करतात, असा समाजशास्त्रीय दृष्टिकोन मांडते.

**विकास व सामाजिक चळवळीचे समाजशास्त्रीय विश्लेषण**

भारत व महाराष्ट्रातील विकास प्रक्रियेचे विश्लेषण दर्शविते की औद्योगिकीकरण, शहरीकरण व जागतिकीकरणामुळे आर्थिक वाढीसोबत सामाजिक-आर्थिक विषमता वाढली आहे. विकास धोरणांमुळे संसाधनांचे केंद्रीकरण, विस्थापन व उपजीविकेवरील परिणाम अधिक तीव्र झाले असून त्यातून विविध सामाजिक चळवळी उदयास आल्या आहेत. शेतकरी, आदिवासी, दलित, महिला व पर्यावरणीय चळवळी या विकास प्रक्रियेतील असमतोलाला प्रत्युत्तर देताना दिसतात.

महाराष्ट्रातील धरणे, औद्योगिक प्रकल्प व विशेष आर्थिक क्षेत्रांमुळे स्थानिक समाजाचे विस्थापन व पर्यावरणीय हानी वाढल्याचे आढळते. या पार्श्वभूमीवर सामाजिक चळवळींनी लोकसहभाग, सामाजिक न्याय व पर्यायी विकासाच्या संकल्पना पुढे मांडल्या आहेत. विश्लेषणातून असे स्पष्ट होते की चळवळी केवळ विरोधात्मक नसून त्या विकास धोरणांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करतात.

सैद्धांतिक दृष्टिकोनातून पाहता, संघर्ष सिद्धांत विकासातून निर्माण होणारी विषमता स्पष्ट करतो, तर नव-सामाजिक चळवळ सिद्धांत ओळख, हक्क व पर्यावरणीय मुद्द्यांचे महत्त्व अधोरेखित करतो. त्यामुळे विकास प्रक्रिया आणि सामाजिक चळवळी यांच्यात संघर्षासोबतच संवाद व परस्परावलंबनही दिसून येते. एकूणच, सामाजिक चळवळी विकास प्रक्रियेला अधिक लोकाभिमुख व समताधिष्ठित करण्याची भूमिका बजावत असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**उपाय योजना**

1. **समावेशक विकास धोरणे**
   विकास धोरणे आखताना शेतकरी, आदिवासी, दलित, महिला व वंचित घटकांचा सक्रीय सहभाग सुनिश्चित करावा, जेणेकरून विकासाचे लाभ सर्व समाजघटकांपर्यंत पोहोचतील.
2. **लोकसहभाग व विकेंद्रीकरण**
   विकास प्रकल्पांच्या नियोजन व अंमलबजावणीत स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामसभा व नागरी मंचांचा सहभाग बंधनकारक करावा.
3. **विस्थापन व पुनर्वसन धोरणे**
   धरणे, औद्योगिक व पायाभूत प्रकल्पांमुळे होणाऱ्या विस्थापनासाठी न्याय्य, पारदर्शक व हक्काधारित पुनर्वसन धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करावी.
4. **पर्यावरणीय शाश्वतता**
   विकास प्रकल्पांसाठी पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (EIA) काटेकोरपणे राबवून शाश्वत विकासाचा दृष्टिकोन स्वीकारावा.
   सामाजिक चळवळींसोबत संवाद
   सामाजिक चळवळींना विरोधक न मानता त्यांना विकास प्रक्रियेतील हितधारक म्हणून समाविष्ट करून संवाद व समन्वयाची प्रक्रिया बळकट करावी.
5. **सामाजिक न्याय व हक्क संरक्षण**
   भारतीय संविधानातील सामाजिक न्याय, समानता व मानवी हक्कांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करून विकास प्रक्रियेत सामाजिक समतोल साधावा.
6. **धोरणात्मक पारदर्शकता व जबाबदारी**
   विकासाशी संबंधित निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता वाढवून राज्य, खासगी क्षेत्र व प्रशासनाची जबाबदारी निश्चित करावी.

**निष्कर्ष**

भारत व महाराष्ट्रातील विकास प्रक्रिया ही केवळ आर्थिक वाढीपुरती मर्यादित नसून तिचे सामाजिक परिणाम खोलवर आणि दीर्घकालीन स्वरूपाचे आहेत. औद्योगिकीकरण, शहरीकरण, जागतिकीकरण आणि भांडवली विकास मॉडेलमुळे संसाधनांचे केंद्रीकरण, विस्थापन, उपजीविकेचे संकट आणि सामाजिक-आर्थिक विषमता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी, आदिवासी, दलित, महिला आणि पर्यावरणीय सामाजिक चळवळी उदयास आल्या असून त्या विकास प्रक्रियेतील असमतोल, अन्याय आणि उपेक्षेला आव्हान देताना दिसतात.

महाराष्ट्राच्या संदर्भात धरणे, औद्योगिक प्रकल्प, विशेष आर्थिक क्षेत्रे आणि शहरी विस्तारामुळे ग्रामीण व आदिवासी भागांवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे आढळते. सामाजिक चळवळींनी केवळ विरोधात्मक भूमिका न घेता लोकसहभाग, हक्काधारित विकास, पर्यावरणीय समतोल आणि सामाजिक न्याय या मूल्यांवर आधारित पर्यायी विकास संकल्पना मांडल्या आहेत. या चळवळींमुळे विकास धोरणांमध्ये काही प्रमाणात सुधारणा, जागरूकता आणि लोकशाही सहभाग वाढल्याचेही दिसून येते.

एकूणच, सामाजिक चळवळी या विकासाच्या विरोधात नसून विकास प्रक्रियेतील त्रुटी अधोरेखित करून ती अधिक समताधिष्ठित, लोकाभिमुख आणि शाश्वत करण्यासाठी कार्य करणाऱ्या महत्त्वपूर्ण सामाजिक शक्ती आहेत.

**संदर्भसूची**

१) देशपांडे, नी. स. (2008). सामाजिक चळवळी : सिद्धांत आणि व्यवहार. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.
२) फडके, य. दि. (2010). भारतामधील सामाजिक चळवळी. पुणे : साकेत प्रकाशन.
३) पाटील, ह. भ. (2012). विकास प्रक्रिया आणि सामाजिक परिवर्तन. औरंगाबाद : कैलास प्रकाशन.
४) भोळे, भा. ल. (2009). समाजशास्त्रीय सिद्धांत. नागपूर : विद्या प्रकाशन.
५) जाधव, नरेंद्र. (2011). आंबेडकर आणि सामाजिक न्याय. पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन.
६) साळुंके, डॉ. भास्कर. (2013). दलित चळवळ : इतिहास आणि विचार. पुणे : सुगावा प्रकाशन.
७) देशमुख, रा. ग. (2014). ग्रामीण समाज आणि विकास. कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
८) पवार, ग. ल. (2015). आदिवासी समाज आणि विकास. नाशिक : यशवंत प्रकाशन.
९) फुले, महात्मा जोतिराव. (2002). शेतकऱ्यांचा आसूड. पुणे : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
१०) गायकवाड, बाबा. (2010). उपेक्षितांचे प्रश्न. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.
११) देशपांडे, सुहास. (2016). महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी. पुणे : प्रतिमा प्रकाशन.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# विकसित भारत २०४७: राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० आणि ग्रंथालय विज्ञान शिक्षणाची भूमिका

**डॉ. संगिता गंगाराम उतेकर**
ग्रंथपाल द. ग. तटकरे महाविद्यालय माणगाव – रायगड
**Email:** sangitaresearchphd@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180203
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 8-13
February - 2026
**Submitted:** 15 Jan. 2026
**Revised:** 25 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***सारांश (Abstract):***

*NEP 2020 मध्ये बहुविषयक शिक्षण, संशोधन व नवोपक्रम, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, आजीवन शिक्षण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण या घटकांवर विशेष भर देण्यात आला आहे. या धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीत ग्रंथालये व ग्रंथालय विज्ञान शिक्षण (Library and Information Science – LIS) ही ज्ञानसंपत्तीची केंद्रे म्हणून महत्त्वाची भूमिका बजावतात. ग्रंथालय विज्ञान शिक्षण हे केवळ माहितीचे संकलन व व्यवस्थापन न राहता ज्ञाननिर्मिती, माहिती साक्षरता, संशोधन सहाय्य, डिजिटल ग्रंथालये आणि ज्ञान व्यवस्थापन यांसारख्या आधुनिक संकल्पनांशी जोडले गेले आहे. या संशोधन लेखाचा उद्देश विकसित भारत २०४७ च्या दृष्टीने राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० आणि ग्रंथालय विज्ञान शिक्षण यांच्यातील परस्परसंबंधाचा अभ्यास करणे हा आहे. तसेच, शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs), डिजिटल समावेशन आणि ज्ञान एकात्मिकरण यामध्ये LIS शिक्षणाचे योगदान विश्लेषित करण्यात आले आहे. या अभ्यासातून असे स्पष्ट होते की, सक्षम ग्रंथालय व्यवस्था आणि आधुनिक ग्रंथालय विज्ञान शिक्षण प्रणाली विकसित भारताच्या उभारणीत महत्त्वपूर्ण उत्प्रेरक ठरू शकते.*

***कीवर्ड्स:*** *विकसित भारत २०४७, राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२०, ग्रंथालय विज्ञान शिक्षण, ज्ञान व्यवस्थापन, डिजिटल साक्षरता, शाश्वत विकास*

## प्रस्तावना (Introduction):

स्वातंत्र्याच्या शताब्दीनिमित्त भारताने "विकसित भारत २०४७" ही संकल्पना मांडली. आर्थिक प्रगतीसोबतच सामाजिक समावेशन, ज्ञानाधारित अर्थव्यवस्था आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण हे या संकल्पनेचे मुख्य आधारस्तंभ आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० हे भारतातील शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणणारे धोरण आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीत ग्रंथालये व ग्रंथालय विज्ञान शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० चे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, चिकित्सक विचार, संशोधनवृत्ती, डिजिटल साक्षरता, मूल्यशिक्षण आणि आजीवन अध्ययनाची सवय विकसित करणे हे आहे. केवळ पदवीधारक तयार न करता ज्ञानसंपन्न, कौशल्ययुक्त व आत्मनिर्भर नागरिक घडवणे हा या धोरणाचा केंद्रबिंदू आहे. यासाठी बहुविषयक शिक्षण, लवचिक अभ्यासक्रम, तंत्रज्ञानाधारित शिक्षण आणि गुणवत्तापूर्ण संसाधनांवर भर देण्यात आला आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19325777
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ. संगिता गंगाराम उतेकर,ग्रंथपाल द. ग. तटकरे महाविद्यालय माणगाव – रायगड*

**How to cite this article:**
*उतेकर. संगिता. गंगाराम. (2026). विकसित भारत २०४७: राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० आणि ग्रंथालय विज्ञान शिक्षणाची भूमिका. Journal of Research and Development, 18(2(XIX)), 8–13. https://doi.org/10.5281/zenodo.19325777*

या संपूर्ण शैक्षणिक परिवर्तनात ग्रंथालये आणि ग्रंथालय विज्ञान शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रंथालये ही केवळ पुस्तकसंग्रहाची ठिकाणे नसून, ती ज्ञानकेंद्रे, माहिती व्यवस्थापनाची केंद्रे आणि डिजिटल शिक्षणाची आधारस्तंभे म्हणून कार्य करतात. राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मध्ये माहिती व संवाद तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, ई-लर्निंग, ओपन एज्युकेशनल रिसोर्सेस (OER), डिजिटल ग्रंथालये आणि संशोधन संस्कृती यांना विशेष महत्त्व दिले आहे. या सर्व घटकांचे व्यवस्थापन आणि प्रभावी उपयोग करण्याची जबाबदारी प्रशिक्षित ग्रंथालय व्यावसायिकांवर येते.

विज्ञान शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना माहिती साक्षरता, डिजिटल कौशल्ये, संशोधन पद्धती, माहितीचे मूल्यमापन, बौद्धिक संपदा हक्क आणि नैतिक माहिती वापर यांचे प्रशिक्षण दिले जाते. विकसित भारत २०४७ च्या दिशेने वाटचाल करताना, ज्ञानाधारित अर्थव्यवस्था (Knowledge Economy) उभारण्यासाठी अशा कुशल मनुष्यबळाची नितांत गरज आहे. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, संशोधन संस्था, सार्वजनिक आणि डिजिटल ग्रंथालये या सर्व ठिकाणी सक्षम ग्रंथालय व्यावसायिक देशाच्या बौद्धिक विकासात मोलाचे योगदान देतात.

म्हणूनच, राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० आणि ग्रंथालय विज्ञान शिक्षण यांचा परस्परसंबंध अतूट असून, दोन्ही मिळून विकसित भारत २०४७ या संकल्पनेला साकार करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. ज्ञानाचा लोकशाहीकरण, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची उपलब्धता आणि आजीवन शिक्षणाची संस्कृती निर्माण करण्यात ग्रंथालये आणि ग्रंथालय विज्ञान शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरू शकतात.

**विकसित भारत २०४७: संकल्पना आणि उद्दिष्टे:**

विकसित भारत २०४७ ही संकल्पना केवळ आर्थिक प्रगतीपुरती मर्यादित नसून, ती शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान, मानवी विकास आणि ज्ञानसंस्कृती यांच्या समन्वयातून राष्ट्रनिर्मितीची व्यापक दृष्टी मांडते. या उद्दिष्टांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शिक्षण व्यवस्था आणि ग्रंथालये यांची भूमिका अत्यंत निर्णायक ठरते. विकसित भारत २०४७ ही संकल्पना काही घटकांवर आधारित आहे ते म्हणजे १. गुणवत्तापूर्ण व समावेशक शिक्षण २. संशोधन व नवोपक्रम ३. डिजिटल परिवर्तन ४. मानवी संसाधन विकास ५. ज्ञानाधारित समाजनिर्मिती या सर्व घटकांसाठी माहितीचा योग्य वापर व व्यवस्थापन आवश्यक असून ते कार्य ग्रंथालये प्रभावीपणे करतात.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP 2020): एक आढावा:**

भारत सरकारने जुलै २०२० मध्ये लागू केलेले राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP 2020) हे २१व्या शतकातील सामाजिक, आर्थिक व तांत्रिक बदल लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले सर्वसमावेशक धोरण आहे. १९८६ नंतर प्रथमच शिक्षण क्षेत्रात इतक्या व्यापक स्वरूपाचे परिवर्तन घडवून आणणारे हे धोरण असून, शिक्षणाला कौशल्याधारित, बहुविषयक, लवचिक आणि संशोधनकेंद्री बनवणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे. NEP 2020 चा केंद्रबिंदू म्हणजे विद्यार्थी-केंद्रित शिक्षण, गुणवत्तापूर्ण अध्ययन अनुभव आणि आजीवन शिक्षणाची संकल्पना या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ग्रंथालये ही ज्ञानकेंद्रे (Knowledge Hubs) म्हणून महत्त्वाची भूमिका बजावतात. या धोरणातील ठळक म्हणजे १. बहुविषयक (Multidisciplinary) शिक्षण २. डिजिटल व तंत्रज्ञानाधारित शिक्षण ३. संशोधन व नवोपक्रमाला प्रोत्साहन ४. आजीवन शिक्षण (Lifelong Learning) ५. स्थानिक भाषांमधून शिक्षण ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ग्रंथालये ही ज्ञान केंद्रे म्हणून कार्य करतात.

**NEP 2020 आणि ग्रंथालयांची भूमिका:**

NEP 2020 ची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ग्रंथालये ज्ञाननिर्मिती व ज्ञानप्रसाराची केंद्रे म्हणून कार्य करतात. विद्यार्थी व शिक्षकांसाठी शिकण्याचे सहाय्यक वातावरण निर्माण करतात. संशोधन, नवोपक्रम व माहिती साक्षरतेला चालना देतात. शिक्षणाला समावेशक, गुणवत्तापूर्ण आणि समाजाभिमुख बनवतात.

**ग्रंथालय विज्ञान शिक्षण: स्वरूप व व्याप्ती:**

ग्रंथालय विज्ञान शिक्षण (Library and Information Science – LIS) हे माहितीच्या जीवनचक्राशी संबंधित एक बहुआयामी शास्त्र आहे. माहितीचे संकलन, वर्गीकरण, संघटन, साठवण, पुनर्प्राप्ती आणि प्रभावी प्रसार या सर्व प्रक्रियांवर हे शिक्षण आधारित आहे. पारंपरिक ग्रंथालय व्यवस्थापनाबरोबरच आधुनिक काळात LIS शिक्षणाने डिजिटल, तांत्रिक, संशोधनात्मक आणि समाजाभिमुख स्वरूप धारण केले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP 2020) नुसार ग्रंथालय विज्ञान शिक्षण हे केवळ तांत्रिक कौशल्यांपुरते मर्यादित न राहता ज्ञाननिर्मिती, संशोधन, नवोपक्रम आणि सामाजिक विकासाशी जोडलेले असावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

1. **ग्रंथालय विज्ञान शिक्षणाचे स्वरूप:**
ग्रंथालय विज्ञान शिक्षणाचे स्वरूप सतत बदलत्या माहिती तंत्रज्ञानामुळे अधिक व्यापक व गतिमान झाले आहे. पारंपरिक स्वरूपामध्ये पुस्तकांचे संकलन व निवड, वर्गीकरण (DDC, UDC, CC), कॅटलॉगिंग व अनुक्रमणिका, वाचक सेवा व संदर्भ सेवा यांचा समावेश होतो तर आधुनिक स्वरूपामध्ये डिजिटल माहितीचे व्यवस्थापन, डेटाबेस डिझाइन व माहिती प्रणाली, नेटवर्क आधारित माहिती सेवा, ई-लर्निंग व व्हर्च्युअल ग्रंथालय सेवा यांचा समावेश होतो. NEP 2020 नुसार अभ्यासक्रम बहुविषयक, लवचिक व कौशल्याधारित असावा, ज्यामुळे LIS विद्यार्थी बदलत्या समाजाच्या गरजांना सामोरे जाऊ शकतील.

2. **डिजिटल ग्रंथालये:**
डिजिटल ग्रंथालये ही आधुनिक LIS शिक्षणाचा कणा आहेत. यात ई-पुस्तके, ई-जर्नल्स, थीसिस व डिजिटल संग्रहांचे व्यवस्थापन, DSpace, Greenstone, KOHA यांसारख्या सॉफ्टवेअरचा वापर, माहितीचे डिजिटायझेशन व डिजिटल जतन (Digital Preservation), कुठेही-कधीही माहिती उपलब्ध करून देण्याची क्षमता आहे. डिजिटल ग्रंथालयांमुळे शिक्षण व संशोधन अधिक लोकशाही आणि समावेशक बनते.

3. **ई-संसाधने व ओपन ऍक्सेस:**
ई-संसाधने व ओपन ऍक्सेस ही ज्ञानप्रसाराची नवी दिशा आहे. ओपन ऍक्सेस जर्नल्स, रिपॉझिटरीज व OER, संशोधन निष्कर्ष सर्वांसाठी मुक्त करणे, खर्च कमी करून गुणवत्तापूर्ण माहितीची उपलब्धता, संशोधनाची दृश्यमानता (Visibility) वाढवणे, LIS शिक्षण विद्यार्थ्यांना ओपन ऍक्सेस धोरणे, कॉपीराइट व बौद्धिक संपदा हक्क यांचे ज्ञान देण्यात येते.

4. **माहिती साक्षरता:**
माहिती साक्षरता ही २१व्या शतकातील अत्यावश्यक कौशल्य आहे. योग्य माहिती ओळखण्याची क्षमता आणि माहितीचे मूल्यांकन व विश्लेषण करणे, चुकीच्या माहितीपासून (Fake News) संरक्षण देणे, नैतिक व कायदेशीर माहिती वापरकरणे, अश्याप्रकारे NEP 2020 नुसार विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार (Critical Thinking) विकसित करणे आवश्यक असून माहिती साक्षरतेत LIS व्यावसायिकांची भूमिका महत्वाची आहे.

5. **संशोधन पद्धती:**
ग्रंथालय विज्ञान शिक्षण संशोधनाभिमुख असणे अत्यंत आवश्यक आहे. संशोधन पद्धती, डेटा संकलन व विश्लेषण, संदर्भ लेखन व शोधनिबंध लेखन, प्लॅजिअरिझम व संशोधन नैतिकता, बिब्लिओमेट्रिक्स व सायंटोमेट्रिक्स अश्या प्रकारे NEP 2020 अंतर्गत संशोधन संस्कृतीचा विकास हा प्रमुख उद्देश असल्यामुळे LIS शिक्षण संशोधनाला चालना देते.

6. **ज्ञान व्यवस्थापन:**
ज्ञान व्यवस्थापन ही LIS शिक्षणाची वाढती व्याप्ती आहे असे म्हणणे योग्य आहे. कारण संस्थात्मक ज्ञानाचे संकलन व जतन, तज्ज्ञांचे अनुभव व कौशल्य व्यवस्थापन, निर्णयप्रक्रियेत ज्ञानाचा उपयोग, ज्ञानाधारित संस्था उभारणे विकसित भारत २०४७ साठी ज्ञानाधारित अर्थव्यवस्था उभारण्यात ज्ञान व्यवस्थापनाची भूमिका महत्त्वाची आहे.

7. **ग्रंथालय विज्ञान शिक्षणाची व्याप्ती:**
ग्रंथालय विज्ञान शिक्षणाची व्याप्ती हि अत्यंत व्यापक आहे. शैक्षणिक, सार्वजनिक, संशोधन व डिजिटल ग्रंथालये, माहिती केंद्रे, उद्योग, मीडिया व कॉर्पोरेट क्षेत्र, डेटा व्यवस्थापन, कंटेंट मॅनेजमेंट, शिक्षण, संशोधन व सामाजिक विकास या सर्वांचा समावेश यात होतो.

**विकसित भारत २०४७ साठी ग्रंथालय विज्ञान शिक्षणाची भूमिका:**

विकसित भारत २०४७ या संकल्पनेत ज्ञान, संशोधन, डिजिटल तंत्रज्ञान आणि मानवी विकास यांना मध्यवर्ती स्थान आहे. या सर्व घटकांना प्रभावीपणे एकत्र जोडण्याचे कार्य ग्रंथालय विज्ञान शिक्षण (Library and Information Science – LIS) करते. प्रशिक्षित ग्रंथालय व्यावसायिकांच्या माध्यमातून ग्रंथालये ही केवळ पुस्तकसंग्रह न राहता ज्ञाननिर्मिती, संशोधन सहाय्य आणि सामाजिक परिवर्तनाची केंद्रे बनतात.

1. **ज्ञानाधारित समाजनिर्मिती:**
ग्रंथालय विज्ञान शिक्षणामुळे नागरिकांमध्ये माहितीचा योग्य वापर करण्याची क्षमता विकसित होते. ग्रंथालये नागरिकांना विश्वसनीय, अद्ययावत आणि शास्त्रीय माहिती उपलब्ध करून देतात. माहिती साक्षरतेमुळे नागरिक माहितीचे विश्लेषण, मूल्यमापन व नैतिक वापर करू शकतात. चुकीची माहिती, अफवा व दिशाभूल यांना आळा घालण्यात ग्रंथालयांची महत्त्वाची भूमिका. सुजाण, विवेकी व निर्णयक्षम नागरिक घडवून लोकशाही मूल्ये बळकट होतात. यामुळे समाज ज्ञानाधारित, विचारशील आणि प्रगत बनतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

2. **संशोधन व नवोपक्रमाला चालना:**
संशोधन व नवोपक्रम हे कोणत्याही विकसित राष्ट्राचे बळ आहे. LIS शिक्षण संशोधन सहाय्यासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करते. उच्च शिक्षण व संशोधन संस्थांमधील ग्रंथालये ई-जर्नल्स, डेटाबेसेस, पेटंट माहिती व संशोधन साधने उपलब्ध करून देतात. संदर्भ सेवा, साहित्य सर्वेक्षण व बिब्लिओमेट्रिक विश्लेषणाद्वारे संशोधकांना दिशा मिळते. संशोधन नैतिकता, प्लॅजिअरिझम प्रतिबंध व संदर्भ लेखनाचे मार्गदर्शन. नवोपक्रम, स्टार्ट-अप्स व उद्योग-शैक्षणिक सहकार्यासाठी माहिती सहाय्य. यामुळे गुणवत्तापूर्ण संशोधन आणि नवकल्पनांचा विकास होतो.

3. **डिजिटल साक्षरता व समावेशन:**
डिजिटल युगात माहिती तंत्रज्ञानाचा वापर सर्वांसाठी सुलभ होणे आवश्यक आहे. डिजिटल ग्रंथालये, ई-पुस्तके, ई-जर्नल्स व ओपन ऍक्सेस संसाधनांचा वापर करणे, डिजिटल साक्षरता कार्यक्रमांद्वारे तंत्रज्ञान वापरण्याचे प्रशिक्षण देणे. शैक्षणिक व सामाजिक विषमता कमी करण्यास मदत होते. LIS शिक्षणामुळे ग्रंथालये डिजिटल समावेशनाची केंद्रे बनतात.

4. **शाश्वत विकासास पाठबळ:**
शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) साध्य करण्यासाठी माहिती व जनजागृती महत्त्वाची आहे. पर्यावरण संरक्षण, आरोग्य, शिक्षण, लैंगिक समानता यासंबंधी माहितीचा प्रसार करण्यास सहाय्य होते. स्थानिक समुदायांसाठी जनजागृती कार्यक्रम व माहिती सेवा, धोरणनिर्मिती व सामाजिक विकासासाठी संशोधन माहिती पुरवणे, शाश्वत विकासासाठी ज्ञानाधारित निर्णयप्रक्रियेस पाठबळ मिळते. ग्रंथालये शाश्वत विकासाची सामाजिक वाहक (Social Enablers) म्हणून कार्य करतात.

**आव्हाने:**

विकसित भारत २०४७ चे ध्येय साध्य करताना ग्रंथालये व ग्रंथालय विज्ञान शिक्षणास अनेक संरचनात्मक, तांत्रिक आणि मानवी संसाधनाशी संबंधित आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. ही आव्हाने वेळेवर ओळखून त्यावर उपाययोजना केल्यासच ग्रंथालये ज्ञानकेंद्रे म्हणून प्रभावी भूमिका बजावू शकतील.

1. **डिजिटल पायाभूत सुविधांचा अभाव:**
डिजिटल युगात ग्रंथालयांच्या कार्यक्षमतेसाठी मजबूत डिजिटल पायाभूत सुविधा अत्यावश्यक आहेत. ती म्हणजे अनेक ग्रामीण व दुर्गम भागांतील ग्रंथालयांमध्ये इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा अभाव आहे. संगणक, सर्व्हर, स्कॅनर, सॉफ्टवेअर यांची अपुरी उपलब्धता, डिजिटल ग्रंथालये, ई-संसाधने व ऑनलाइन सेवा प्रभावीपणे राबवण्यात अडथळे, डिजिटल दरी (Digital Divide) वाढण्याचा धोका या मर्यादांमुळे समावेशक शिक्षण व डिजिटल समतेच्या उद्दिष्टांना बाधा येते.

2. **प्रशिक्षित ग्रंथपालांची कमतरता:**
ग्रंथालय विज्ञान शिक्षण असूनही कुशल व अद्ययावत प्रशिक्षित ग्रंथपालांची कमतरता हे मोठे आव्हान आहे. ती म्हणजे तंत्रज्ञानाधारित सेवा हाताळण्यासाठी आवश्यक कौशल्यांचा अभाव, सतत बदलणाऱ्या माहिती तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यासाठी प्रशिक्षणाच्या संधी अपुऱ्या, ग्रामीण व लहान संस्थांमध्ये पात्र ग्रंथपालांच्या जागा रिक्त राहणे, व्यावसायिक विकास (Continuing Professional Development) कार्यक्रमांचा अभाव यामुळे ग्रंथालय सेवा गुणवत्तेच्या दृष्टीने मागे पडतात.

3. **आर्थिक मर्यादा:**
ग्रंथालयांच्या विकासातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे आर्थिक संसाधनांची कमतरता. ग्रंथालयांसाठी अपुरा निधी व कमी बजेट ची तरतूद, ई-जर्नल्स, डेटाबेसेस व सॉफ्टवेअरचे जास्त खर्चिक परवाने, पायाभूत सुविधा, डिजिटायझेशन व प्रशिक्षणासाठी निधीचा अभाव, सार्वजनिक ग्रंथालयांकडे दुर्लक्ष होणे यामुळे आर्थिक मर्यादांमुळे आधुनिक सेवा राबवणे कठीण होते.

4. **तंत्रज्ञानातील सातत्याने होणारे बदल:**
तंत्रज्ञानातील वेगवान बदल ही मोठे आव्हानही आहेत. यामध्ये नवीन सॉफ्टवेअर, प्लॅटफॉर्म्स व माहिती साधनांशी सातत्याने जुळवून घेणे, जुन्या प्रणाली लवकर अप्रचलित (Obsolete) होणे, कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा, क्लाउड कंप्युटिंगसारख्या नव्या संकल्पनांचे ज्ञान आवश्यक, सतत पुनःप्रशिक्षणाची गरज या बदलांना सामोरे जाण्यासाठी LIS अभ्यासक्रम व प्रशिक्षण पद्धती अद्ययावत असणे आवश्यक आहे.

**शिफारसी (Recommendations):**

विकसित भारत २०४७ या ध्येयाची पूर्तता करण्यासाठी ग्रंथालय विज्ञान शिक्षण (LIS) अधिक सक्षम, अद्ययावत आणि समाजाभिमुख बनवणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील शिफारसी महत्त्वपूर्ण ठरतात.

1. **LIS अभ्यासक्रम NEP 2020 शी सुसंगत करावा:**

- ग्रंथालय विज्ञान अभ्यासक्रमात NEP 2020 च्या तत्त्वांचा प्रभावी समावेश करणे आवश्यक आहे.

- बहुविषयक (Multidisciplinary) दृष्टिकोनातून अभ्यासक्रमाची पुनर्रचना.
- कौशल्याधारित, लवचिक व क्रेडिट-आधारित अभ्यासक्रम रचना.
- माहिती तंत्रज्ञान, डेटा सायन्स, डिजिटल ह्युमॅनिटीज यांसारख्या विषयांचा समावेश.
- उद्योग व समाजाच्या गरजांनुसार अभ्यासक्रमाचे सातत्याने अद्ययावतीकरण. यामुळे LIS पदवीधर अधिक रोजगारक्षम व सक्षम बनतील.

2. **डिजिटल व संशोधन कौशल्यांवर भर द्यावा:**
डिजिटल युगात ग्रंथपालांसाठी तांत्रिक व संशोधन कौशल्ये अत्यावश्यक आहेत. त्यासाठी डिजिटल ग्रंथालय व्यवस्थापन, ऑटोमेशन सॉफ्टवेअर व डेटाबेसेसचे प्रशिक्षण, संशोधन पद्धती, डेटा विश्लेषण, बिब्लिओमेट्रिक्स व रिसर्च एथिक्स, ओपन ऍक्सेस, बौद्धिक संपदा हक्क व प्लॅजिअरिझम प्रतिबंध, डिजिटल साक्षरता व माहिती साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम या सर्वांनवरभर द्यावा. यामुळे ग्रंथालये संशोधन व नवोपक्रमाचे आधारकेंद्र बनू शकतात.

3. **ग्रंथालयांना ज्ञान व नवोपक्रम केंद्र म्हणून विकसित करावे:**
ग्रंथालयांची भूमिका केवळ माहितीपुरती मर्यादित न ठेवता ज्ञाननिर्मिती व नवोपक्रम यावर केंद्रित करावी. ती म्हणजे मेकर-स्पेसेस, इनक्युबेशन सपोर्ट व लर्निंग कॉमन्सची स्थापना करणे, संशोधक, विद्यार्थी व उद्योजक यांच्यासाठी सहयोगी अध्ययन वातावरण निर्माण करणे, डिजिटल रिपॉझिटरीज व संस्थात्मक ज्ञानसाठे विकसित करणे, स्थानिक ज्ञान व नवकल्पनांचे दस्तऐवजीकरण करणे. यामुळे ग्रंथालये ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेची केंद्रे ठरतील.

4. **ग्रंथपालांसाठी सातत्यपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम राबवावेत:**
ग्रंथपालांचा व्यावसायिक विकास सातत्याने होणे अत्यावश्यक त्यासाठी काकार्यक्रम घेणे आवश्यक आहे. १.Continuing Professional Development (CPD) कार्यक्रमांची अंमलबजावणी. २.कार्यशाळा, ऑनलाइन कोर्सेस, वेबिनार्स व प्रशिक्षण शिबिरे. ३. नवीन तंत्रज्ञान, AI, डेटा मॅनेजमेंट यावरील प्रशिक्षण. ४. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी सहकार्य. सातत्यपूर्ण प्रशिक्षणामुळे ग्रंथपाल बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगत राहू शकतात.

**निष्कर्ष (Conclusion):**

आधुनिक काळातील ग्रंथालये ही केवळ पुस्तकसंग्रह नसून, ती ज्ञान व्यवस्थापन केंद्रे, डिजिटल शिक्षणाची आधारस्थाने आणि संशोधन सहाय्य प्रणाली म्हणून कार्य करीत आहेत. ग्रंथालय विज्ञान शिक्षणाद्वारे माहिती संकलन, वर्गीकरण, डिजिटल व्यवस्थापन, माहिती साक्षरता, संशोधन पद्धती आणि ज्ञान व्यवस्थापन यांसारखी कौशल्ये विकसित केली जातात. ग्रंथालय विज्ञान शिक्षणामुळे ज्ञान व्यवस्थापन प्रणाली सक्षम होतात, ज्याद्वारे संस्थात्मक व राष्ट्रीय स्तरावर ज्ञानाचे जतन, प्रसार आणि प्रभावी उपयोग शक्य होतो. तसेच डिजिटल साक्षरतेच्या माध्यमातून ग्रामीण, आदिवासी व वंचित घटकांपर्यंत ज्ञानाची समान उपलब्धता साध्य होते, ज्यामुळे सामाजिक व शैक्षणिक समावेशनाला चालना मिळते. उच्च शिक्षण व संशोधन संस्थांमधील ग्रंथालये संशोधकांना विश्वसनीय माहिती, ई-संसाधने, डेटाबेसेस आणि संदर्भ सेवा पुरवून गुणवत्तापूर्ण संशोधन व नवोपक्रम यांना आधार देतात. डिजिटल पायाभूत सुविधांचा अभाव, प्रशिक्षित ग्रंथपालांची कमतरता, आर्थिक मर्यादा आणि तंत्रज्ञानातील वेगवान बदल ही आव्हानेही लक्षात घ्यावी लागतात. यावर मात करण्यासाठी LIS अभ्यासक्रम NEP 2020 शी सुसंगत करणे, डिजिटल व संशोधन कौशल्यांवर भर देणे, ग्रंथालयांना ज्ञान व नवोपक्रम केंद्र म्हणून विकसित करणे आणि ग्रंथपालांसाठी सातत्यपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे या शिफारसी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. ग्रंथालय विज्ञान शिक्षण हे विकसित भारत २०४७ च्या दिशेने वाटचाल करताना ज्ञानाधारित समाजनिर्मिती, संशोधन व नवोपक्रम, डिजिटल समावेशन आणि शाश्वत विकास या सर्व क्षेत्रांत प्रभावी योगदान देऊ शकते. योग्य धोरणात्मक पाठबळ, गुंतवणूक आणि नवोन्मेषी दृष्टिकोन यांच्या सहाय्याने ग्रंथालय विज्ञान शिक्षण भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक मजबूत आधारस्तंभ ठरू शकते.

**संदर्भ:**

1. Gorman, M. (2015). *Our enduring values revisited: Librarianship in an ever-changing world*. Chicago: ALA Editions.
2. Government of India. (2020). *National Education Policy 2020*. Ministry of Education. https://www.education.gov.in
3. Government of India. (2021). *Implementation guidelines for National Education Policy 2020*. Ministry of Education.
4. IFLA. (2015). *IFLA trend report: Update*. International Federation of Library Associations and Institutions. https://www.ifla.org
5. Kumar, K. (2020). *Education, knowledge and information society*. New Delhi: Sage Publications.

6. Ranganathan, S. R. (2006). *The five laws of library science*. New Delhi: Ess Ess Publications. (Original work published 1931)
7. Sharma, R. N., & Singh, R. (2019). *Library and information science education in India*. New Delhi: Atlantic Publishers.
8. Singh, J. (2021). Challenges of library automation and digital libraries in India. *International Journal of Library and Information Studies*, 11(4), 55–62.
9. Singh, S. P., & Kaur, T. (2017). *Library and information science education in India*. B. R. Publishing.
10. UGC. (2020). *Quality mandate and higher education reforms under NEP 2020*. University Grants Commission, New Delhi.
11. UNESCO. (2015). *Rethinking education: Towards a global common good?* Paris: UNESCO Publishing.
12. UNESCO. (2021). *Libraries as gateways to knowledge and sustainable development*. Paris: UNESCO.
13. United Nations. (2015). *Transforming our world: The 2030 agenda for sustainable development*. United Nations.
14. Yadav, S., & Verma, M. K. (2021). Role of libraries in implementation of National Education Policy 2020. *International Journal of Library and Information Studies*, 11(3), 45–52.

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# योग, आयुर्वेद आणि सर्वांगीण शिक्षण : एक अभ्यास

**ज्ञानेश्वर गोविंदराव मुंढे**
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग, शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालय, पाली-सुधागड, जि. रायगड
**ईमेल-** dgmundhe11@gmail.com

**Manuscript ID:** JRD -2026-180204
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 14-17
February - 2026
**Submitted:** 15 Jan. 2026
**Revised:** 25 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

**प्रास्ताविक:**

योग, आयुर्वेद आणि समग्र शिक्षण ही एक व्यापक, प्राचीन भारतीय प्रणाली आहे जी शरीर, मन आणि आत्मा यांना एकात्मिक मानून संपूर्ण आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी तयार केलेली आहे. या पद्धती वेदांमध्ये रुजलेल्या आहेत आणि तीन दोष (वात, पित्त, कफ) संतुलित जीवनशैलीद्वारे दीर्घायुष्य, रोग प्रतिबंधक आणि आत्म-साक्षात्काराचे उद्दिष्ट ठेवतात. योग, आयुर्वेद आणि समग्र शिक्षण शारीरिक, मानसिक आणि भावनिक कल्याण वाढविण्यासाठी प्राचीन, विज्ञानदर्शी पद्धती एकत्रितपणे कार्य करतात. या प्राचीन भारतीय दर्शनातून विकसित झालेल्या पद्धती असून या पद्धतीतून रोगप्रतिबंध, प्रतिकारक्षमता वाढवणे, मानसिक आरोग्य सदृढ करणे, विषमुक्ती करणे, शारीरिक लवचिकता वाढविणे आणि आत्मजागरूकता निर्माण करणे इत्यादी दीर्घकालीन लाभ यातून मिळतात. योग आणि आयुर्वेदाच्या अवलंबामुळे समृद्ध वैचारिकता, सकारात्मक विचार निर्णय प्रक्रियेतील स्पष्टता चैतन्यमय मानसिकता आणि संतुलित जीवनशैली विकसित होते

**सारांश (Abstract):**

भारतीय ज्ञानपरंपरेमध्ये योग अभ्यासाचे सात लोकप्रिय प्रकार अधोरेखित केलेले आहे ज्यामध्ये हठ (पायाभूत), विन्यास (प्रवाह), अष्टांग (संरचित क्रम), अय्यंगार (प्रोप्ससह संरेखन लक्ष केंद्रित करणे), बिक्रम/गरम (गरम खोली), कुंडलिनी (ऊर्जा/श्वासोच्छवासाचे काम) आणि यिन/पुनर्स्थापित (खोल ताणणे/विश्रांती) इत्यादींचा समावेश होतो. प्रत्येक मार्ग शारीरिक शक्ती आणि लवचिकतेपासून ते मानसिक शांतता आणि आध्यात्मिक जागृतीपर्यंत, विविध गरजा पूर्ण करण्यासाठी वेगवेगळे लक्ष केंद्रित करतो.

**उद्दिष्टे: (Objectives)**

१. आयुर्वेद - जीवनाचे विज्ञान, योग - संघटनाचे विज्ञान यांचा अभ्यास करणे.
२. एकात्मिक समग्र आरोग्याचा अभ्यास करणे,
३. समग्र शिक्षण, शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गांचा अभ्यास करणे,
४. योगाचे प्रकार अभ्यासणे.
५. समग्र शिक्षण, योग आणि आयुर्वेद एकात्मतेचे फायदे यावर अभ्यास करणे

**१. आयुर्वेद: जीवनाचे विज्ञान**

'आयुर्वेद' ही भारताची स्वदेशी चिकित्सा व्यवस्था आहे. आयुर्वेद ही ५,००० वर्षे जुनी प्रणाली आहे जी संतुलन, आरोग्य आणि दीर्घायुष्य राखण्यावर लक्ष केंद्रित करते. आयुर्वेद, सिद्ध, युनानी आणि योग इत्यादी पद्धतीची एक समृद्ध परंपरा भारतीयांना लाभलेली आहे.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*ज्ञानेश्वर गोविंदराव मुंढे,सहा. प्राध्यापक, मराठी विभाग, शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालय, पाली-सुधागड, जि. रायगड*

**How to cite this article:**
*मुंढे, ज्ञानेश्वर. गोविंदराव. (2026). योग, आयुर्वेद आणि सर्वांगीण शिक्षण: एक अभ्यास. Journal of Research and Development, 18(2(XIX)), 14–17.* https://doi.org/10.5281/zenodo.19325813

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19325813
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

'शरीर-इंद्रिय-मन आणि आत्मा यांच्या संयोगाला 'आयु' असे संबोधले जाते.

'आयु' हे धर्म, अर्थ आणि सुखाचे साधन आहे. या 'आयु' ची प्राप्ती ज्या ज्ञानाच्या साह्याने होते ते ज्ञान म्हणजे 'वेद' होय.'[१] असा 'आयुर्वेद' या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करता येतो. आयुर्वेद ही केवळ उपचार पद्धती नसून; शारीरिक मानसिक आजार उत्पन्न न होऊ देण्याची सरळ आणि सुरक्षित पद्धती आहे. आयुर्वेदाच्या अनुसार आपले भौतिक शरीर-देह इंद्रिय, मन आणि आत्मा इत्यादींनी तयार झालेले असते. त्यामध्ये मानसिक, शारीरिक व अध्यात्मिक भाव समाविष्ट होतात. मानव शरीर पंच भौतिक तत्त्वांपासून म्हणजेच पंचमहाभूतांपासून तयार झालेले आहे. पंचमहाभूतांपासून त्रिगुण-त्रिदोष (वात, पित्त, कफ) धातू आणि मल उत्पन्न होतात. हे त्रिदोष आपल्या शरीराच्या सर्व गुणधर्मांचे संचालन करतात आणि शरीरामध्ये होणाऱ्या बदलांना कारणीभूत ठरतात. असंतुलित आहार आणि असंतुलित जीवनशैली म्हणजेच विहार या त्रिदोषांची सम अवस्था विचलित करतात; त्यामुळे आपल्या शरीरावर त्याचा विपरीत परिणाम होतो. आयुर्वेद आपल्या शरीरातील या त्रिगुणांना संतुलित करण्याचे काम करतात. आयुर्वेदिक औषधी ही निसर्गातून प्राप्त होत असल्याने या औषधीचा दीर्घकालीन लाभ मिळतो.

**प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक:** ते दिनचर्या (दैनिक दिनचर्या), ऋतुचार्य (हंगामी अनुकूलन) आणि आहार (आहार) द्वारे रोग रोखण्यावर भर देते.

**उपचार पद्धती:** तंत्रांमध्ये पंचकर्म (विषमुक्ती), हर्बल उपचार, अभ्यंग (मालिश) आणि सात्विक आहार यांचा समावेश आहे.

**मुख्य संकल्पना:** आरोग्य सुनिश्चित करण्यासाठी अग्नि (पाचन अग्नि), धातु (शरीराच्या ऊती) आणि माळ (कचरा उत्पादने) यांचे व्यवस्थापन केले जाते.

**२. योग: एकतेचे विज्ञान**

शरीर श्वास आणि मन यांची संतुलित अवस्था म्हणजे योग होय. योग हे एक विज्ञान आहे; त्याचबरोबर शारीरिक, मानसिक, नैतिक आणि आध्यात्मिक रूपाने निरोगी राहण्याची एक कला आहे. "योगश्चित्तवृत्तिनिरोध:"[२] (योग ऐसी विधि है, जो मन में वह शक्ति विकसित करती है; जिससे चेतना में विचारों के उतार-चढ़ाव का निरोध होता है, जिससे व्यक्ति को उसे चेतना के साथ जुड़ने में मदद मिलती है; जो कहीं भी पहुंच जानेवाली मन इंद्रिय बुद्धि तथा मैं हू से बनी होती है। यौगिक पद्धतियों के पालन से व्यक्ति चेतना के उतार चढ़ाव, भटकाव, परीवर्तन और सुधार में मुक्त रखना सीख जाता है।) असे योग या संज्ञाचे स्पष्टीकरण बी. के. एस. आयंगार यांनी केलेले आहे. योग विज्ञान जात, धर्म, पंथ, लिंग, वय इत्यादी भेदांनी प्रभावित होत नसून जी व्यक्ती निरोगी आणि अर्थपूर्ण जीवन जगण्याची आकांक्षा ठेवते त्या सर्वांसाठी योग अभ्यास लाभदायक ठरतो. आयुर्वेदाचे "भगिनी विज्ञान" मानले जाणारे योग मन, शरीर आणि आत्मा यांना एकत्र करण्यावर लक्ष केंद्रित करते. व्यक्तीच्या संपूर्ण विकासासाठी योगाला आठ स्तरांमध्ये विभाजित केल्या गेलेले आहे; ज्यांना अष्टांग योग असे म्हणतात. त्यामध्ये यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी इत्यादींचा समावेश होतो. या सर्वांना एकत्रितपणे योग असे म्हणतात.

- **यम-नियम :** यम हे योगाचे प्रथम अंग मानले जाते. काय करू नये या तत्त्वाचे पालन म्हणजेच यम होय. कायिक, वाचिक आणि मानसिक संयमांना यम म्हणतात. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य अपरिग्रह, सौच, संतोष, तप स्वाध्याय इत्यादींचा सातत्यपूर्ण अभ्यास म्हणजे यम-नियम होय. "अहिंसासत्यास्तेय ब्रह्मचर्यापरिग्रहा: यमाह:"[३] एकाग्रतेची शक्ती, मनाची शुद्धता आणि स्थिरता यातून हा योगमार्ग प्रशस्त होत जातो. यम-नियम ही योगाची प्राथमिक तथा महत्वपूर्ण अवस्था मानल्या जाते.
- **आसन :** आसन म्हणजे शरीराच्या विशिष्ट मुद्रा होय. शरीर आणि मन यांना विशिष्ट अवस्थेत स्थिर करून शारीरिक पेशी-कोषिकांवर तणाव आणि संतुलन निर्माण करणे आसन या अवस्थेचे उद्दिष्ट असते. आसन ही केवळ शारीरिक अवस्था नसून शरीर आणि मन यांची संयुक्त अवस्था असते. पतंजली ऋषींनी आसन ही संज्ञा स्पष्ट करताना "स्थिरसुखमासनम्"[४] अर्थात निश्चयपूर्वक आणि सुखपूर्वक बसणे म्हणजेच आसन होय. हठयोगामध्ये आसनाचे अनेक फरक विशद केलेले आहेत. तात्पर्य या स्थितीमध्ये आपण सुखाने, शरीराची हालचाल न करता दीर्घकाळ बसू शकतो त्या स्थितीला आसन म्हणतात. पद्मासन, अर्धपद्मासन, भद्रासन, स्वस्तिकासन, दण्डासन, सुखासन इत्यादी आसनाचे ८४ प्रकार प्रसिद्ध आहेत.
- **प्राणायाम :** "तस्मिन् सति श्वासप्रश्वासयोर्गतिविच्छेद: प्राणायाम:"[५] प्राणायाम हे योगाचे चौथे अंग असून यात श्वासाचे नियंत्रण महत्त्वाचे असते. श्वास, प्राण किंवा जीवनशक्तीला नियंत्रित करून त्यावरती नियंत्रण प्राप्त करण्याचे विज्ञान म्हणजे प्राणायाम होय. सामान्यपणे श्वसनाचे तीन भाग पडतात; त्यामध्ये श्वास घेणे (पूरक), श्वास थांबवणे (कुंभक) आणि श्वास सोडणे (रेचक) अशा तीन अवस्था असतात. श्वासाची दुसरी अवस्था कुंभक म्हणजेच श्वास थांबवून धरणे याला प्राणायाम मध्ये अत्यंत महत्त्व असते.
- **ध्यान :** ध्यान ही मनाची उच्च अवस्था मानल्या जाते. यामध्ये शारीरिक इंद्रियांना बाह्य विषयांपासून अलिप्त करून मानसिक क्रियांद्वारा नियंत्रित केल्या जाते. "देशबन्धश्चित्तस्य धारणा"[६] देश, स्थल, क्षेत्र, चित्त इत्यादीं संबंधी धारण निश्चित करने ध्यान होय.

- योग विज्ञानानुसार अधिकांश रोग हे मानसिक, शारीरिक अथवा मनोशारीरिक असतात. अति विचार, असंतुलित आहार-विहार इत्यादींमुळे शरीरामध्ये दोष निर्माण होतात. असे दोष योगाद्वारा दूर केल्या जाऊ शकतात.
- **योगाचे प्रकार**

१. हठ: मूलभूत आसन (आसन) आणि श्वासोच्छवास (प्राणायाम) यांचा सौम्य परिचय, नवशिक्यांसाठी चांगला.

२. विन्यास: श्वासाला हालचालीशी जोडणारे द्रव, गतिमान वर्ग, बहुतेकदा संगीतावर आधारलेले.

३. अष्टांग: शारीरिकदृष्ट्या मागणी असलेला, आसनांचा एक क्रम, शिस्त आणि ताकदीवर भर देतो.

४. अय्यंगार: अचूक संरेखनावर लक्ष केंद्रित करते, योग्य स्वरूप प्राप्त करण्यासाठी ब्लॉक्स आणि पट्ट्यांसारख्या प्रॉप्सचा वापर करते.

५. बिक्रम/गरम योग: गरम खोलीत सराव केला जातो, ज्यामध्ये २६ आसनांची विशिष्ट मालिका (बिक्रम) किंवा विविध क्रम (गरम योग) समाविष्ट असतात.

६. कुंडलिनी: जप, ध्यान आणि विशिष्ट श्वासोच्छवासाच्या तंत्रांद्वारे आंतरिक ऊर्जा जागृत करण्याचे उद्दिष्ट आहे.

७. यिन/पुनर्स्थापना: खोल ऊतींना लक्ष्य करण्यासाठी आणि विश्रांतीला प्रोत्साहन देण्यासाठी दीर्घकाळ जमिनीवर ताणून धरून मंद, ध्यान पद्धती.

**३. एकात्मिक समग्र आरोग्य: (Integrated Holistic Health)**

योग आणि आयुर्वेदाचे संयोजन निरोगीपणासाठी एक सहक्रियात्मक दृष्टिकोन निर्माण करते. आयुर्वेद निदान आणि वैद्यकीय चौकटी म्हणून काम करते, तर योग मानसिक आणि आध्यात्मिक शुद्धीकरणासाठी व्यावहारिक साधने प्रदान करते.

**अनुकूलित सराव:** योग आसने आणि प्राणायाम एखाद्या व्यक्तीच्या दोषांवर आधारित सानुकूलित केले जाऊ शकतात (उदा., ग्राउंडिंग, वातासाठी मंद योग; थंडपणा, पित्तसाठी सौम्य योग; ऊर्जावान, कफसाठी गरम योग).

**हंगामी अनुकूलन:** पद्धती ऋतूनुसार समायोजित केल्या जातात—जसे की उन्हाळ्यात थंड होण्याच्या पद्धती (पित्त) आणि वसंत ऋतूमध्ये तापमानवाढ, विषारी पदार्थ काढून टाकण्याच्या दिनचर्या (कफ).

**मानसिक आरोग्य:** ध्यान आणि सात्विक जीवनशैली यासारख्या तंत्रांमुळे भावनिक त्रास, चिंता आणि नैराश्य व्यवस्थापित करण्यास मदत होते.

**४. समग्र शिक्षण: (Holistic Education)**

या प्राचीन प्रणालींना शिक्षणात समाविष्ट केल्याने संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकास (शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक) होतो.

**एनईपी २०२० एकात्मता:** भारतातील राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० योग आणि आयुर्वेदासह मुख्य प्रवाहातील अभ्यासक्रमात भारतीय स्वदेशी ज्ञान प्रणाली (आयकेएस) समाविष्ट करण्यास समर्थन देते.

**विद्यार्थ्यांसाठी फायदे:** शाळांमध्ये नियमित योग आणि माइंडफुलनेस प्रशिक्षण लक्ष कालावधी सुधारते, स्मरणशक्ती वाढवते, ताण कमी करते आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देते.

**शिक्षक भूमिका:** शिक्षकांना सारथी (मार्गदर्शक) म्हणून काम करण्यासाठी प्रशिक्षित केले जाते, विद्यार्थ्यांना त्यांच्या आंतरिक आणि बाह्य जगाशी सुसंगत राहण्यास मदत करते, केवळ माहिती हस्तांतरणाच्या पलीकडे जाते.

**उच्च शिक्षण:** पतंजली विद्यापीठ आणि विविध आयुर्वेद महाविद्यालये सारख्या संस्था योग आणि आयुर्वेदात विशेष पदव्या (बीएएमएस) आणि डिप्लोमा देतात.

**५. शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्ग:**

**अभ्यासक्रम:** कार्यक्रम शरीरशास्त्र, शरीरक्रियाविज्ञान, पॅथॉलॉजी, पंचकर्म, योग तत्वज्ञान आणि मानसशास्त्र यावर लक्ष केंद्रित करतात.

**करिअरच्या संधी:** पदवीधर आयुर्वेदिक डॉक्टर, योग प्रशिक्षक, कल्याण प्रशिक्षक किंवा सल्लागार बनू शकतात.

**प्रमुख संस्था:** अखिल भारतीय आयुर्वेद संस्था (एआयआयए), कैवल्यधाम, पतंजली विद्यापीठ आणि जगभरातील विविध आयुर्वेद आणि योग अकादमी.

**योग आणि आयुर्वेद एकत्रीकरणाचे फायदे:**

**शारीरिक आरोग्य:** नियमित सरावामुळे लवचिकता, सांधे आरोग्य आणि ताकद सुधारते. ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, वजन कमी करण्यास मदत करते आणि रक्तदाब कमी करून हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्य वाढवते.

**मानसिक आणि भावनिक कल्याण:** योग मानसिकतेद्वारे चिंता आणि नैराश्य कमी करते, तर आयुर्वेद मानसिक आरोग्य व्यवस्थापित करण्यासाठी आहार आणि जीवनशैलीचा वापर करते. हे संयोजन आंतरिक शांती वाढवते, ताण कमी करते आणि भावनिक लवचिकता मजबूत करते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

**विषबाधकता आणि पचन:** योग आसन (आसन) आणि श्वासोच्छवासाच्या तंत्रे (प्राणायाम) लसीका प्रणालीला उत्तेजित करतात, तर आयुर्वेदिक औषधी वनस्पती आणि दिनचर्या शरीर स्वच्छ करतात. ते पचन आणि चयापचय सुधारते.

**वैयक्तिकृत कल्याण:** आयुर्वेद वैयक्तिक दोष (संविधान) प्रकार ओळखतो, ज्यामुळे विशिष्ट गरजा पूर्ण करणाऱ्या वैयक्तिकृत योग पद्धतींना परवानगी मिळते.

**दीर्घकालीन रोग प्रतिबंधक:** केवळ लक्षणांऐवजी आजारांच्या मूळ कारणांना संबोधित करून, या पद्धती दीर्घकालीन आजारांना प्रतिबंधित करणाऱ्या आरोग्यासाठी एक व्यापक दृष्टिकोन देतात.

● **समग्र शिक्षणाचे फायदे:**

- समग्र विकास: हे केवळ बौद्धिक क्षमतेपेक्षा संपूर्ण व्यक्तीचा - शारीरिक, मानसिक, भावनिक आणि आध्यात्मिक - विकास करण्यावर लक्ष केंद्रित करते.
- आत्म-जागरूकता आणि लवचिकता: विद्यार्थी सखोल आत्म-जागरूकता विकसित करतात, ज्यामुळे त्यांना आधुनिक जीवनातील आव्हानांना तोंड देण्यास आणि माहितीपूर्ण आरोग्य निवडी करण्यास सक्षम करते.
- सुधारित लक्ष आणि स्पष्टता: योग-केंद्रित शिक्षणात शिकवल्या जाणाऱ्या तंत्रांमुळे मानसिक स्पष्टता आणि एकाग्रता वाढते.
- निसर्गाशी संतुलन: ते शाश्वत कल्याणासाठी, व्यक्तींना त्यांच्या दैनंदिन दिनचर्या नैसर्गिक लयींशी जुळवून घेण्यास शिकवते.

**निष्कर्ष:**

योग, आयुर्वेद आणि समग्र शिक्षणाचे एकत्रीकरण वैयक्तिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी एक व्यापक चौकट प्रदान करते, ज्याचे उद्दिष्ट शरीर, मन आणि आत्म्याच्या सुसंवादी विकासाचे आहे. आयुर्वेद आरोग्य देखभाल आणि वैयक्तिक संविधान (दोष) साठी मूलभूत "जीवनाचे विज्ञान" प्रदान करते, तर योग आसन, प्राणायाम आणि ध्यानाद्वारा मानसिक-शारीरिक एकात्मता आणि आध्यात्मिक वाढीसाठी साधने प्रदान करते.

**संदर्भसूची**

१. 'आयुर्वेद', आयुर्वेदिक एवं युनानी सेवाएँ, सहस्त्रधारा रोड, देहरादून, उत्तराखंड, पृ. क्र. ५

२. 'पतंजली योगसूत्र', बी. के. एस. आयंगार, प्रभात प्रकाशन दिल्ली पृ. क्र. १६

३. तत्रैव, पृ. क्र. ३६

४. 'पातंजल योगसूत्र : साधनापाद', इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय, दिल्ली, पृ. क्र. ६

५. तत्रैव, पृ. क्र. ६

६. 'पतंजली योगसूत्र', उनि, पृ. क्र. ४५

इतर संदर्भ : www.yogainternational.com

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# परंपरागत विपणन आणि आधुनिक विपणनातील आयाम

**डॉ. प्रशांत म. पुराणिक**
(सहाय्यक अधिव्याख्याता वाणिज्य विभाग) गुरुकुल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदा
तालुका: कोरपणा, जिल्हा चंद्रपूर
**Email:** prashantpuranik1970@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180205
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 18-24
February - 2026

**Submitted:** 15 Jan. 2026
**Revised:** 25 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***गोषवारा:***

*विपणन ही संज्ञा अत्यंत व्यापक असून यात उत्पादन केलेला माल हा उत्पादन क्षेत्रापासून म्हणजेच कारखान्यापासून ते ग्राहकांपर्यंत सुनिश्चित पद्धतीने पोहोचविला जातो. उत्पादित केलेल्या वस्तू ज्या माध्यमाच्या सहाय्याने ग्राहकांपर्यंत पोहोचवल्या जातात त्या माध्यमांना विपणानाची माध्यमे असे म्हणतात. विपणनाच्या माध्यमांमध्ये प्रामुख्याने वस्तूचे उत्पादन, वस्तूची जाहिरात, ठोक व्यापारी, किरकोळ व्यापारी, ग्राहकांना वस्तूची विक्री, ग्राहकांना वस्तू विकल्यानंतर त्या वस्तूबद्दल ग्राहकांचे मत जाणून घेणे व सदर वस्तूला शक्य तितक्या लवकर पुनः मागणी आली पाहिजे यासाठी प्रयत्न करणे आणि ही फेर मागणी म्हणजेच पुनः मागणी जर निर्माण झाली नाही तर त्या मागची कारणे शोधणे हे देखील विपणनाचे एक अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य आहे.*

*बदलत्या परिस्थितीनुसार विपणन पद्धतीतदेखील अनेक बदल झाले आहेत. पूर्वीची परंपरागत विपणन पद्धती आता आधुनिक झाली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, विविध क्षेत्रांची सांख्यिकीय माहिती, या माहितीच्या आधारे दरवर्षी उत्पादकाद्वारे केले जाणारे विक्रीचे नियोजन, स्पर्धक उत्पादकांची व्यूहरचना, ज्या बाजारपेठेत आपण आपल्या वस्तू विक्रीसाठी नेणार आहोत त्या बाजारपेठेचे स्वरुप व तेथील स्पर्धेची तीव्रता, बाजारपेठेत कायम स्थान प्राप्त केलेल्या वस्तू, देशातील अर्थव्यवस्थेचा विपणनाशी संबंधित असलेल्या विविध घटकांवर पडणारा परिणाम, सरकारचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय करविषयक धोरण इत्यादी विविध बाबींचा व घटकांचा आधुनिक विपणन व्यवस्थेमध्ये अंतर्भाव होतो. पूर्वीची परंपरागत विपणनाची पद्धती आणि आजची आधुनिक विपणन पद्धती यात नेमका कोणता बदल झाला आहे? हे अभ्यासण्यासाठी या संशोधनाच्या विषयाची निवड केलेली आहे.*

***बीजशब्द:*** *पंचवार्षिक, औद्योगिक, अर्थव्यवस्था, पॅकेज, शैली*

**प्रस्तावना:**

सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सरकारने औद्योगिक विकास घडवून यावा यासाठी मोठे अनुदान म्हणजेच पॅकेज दिल्याने थोड्याफार प्रमाणात का होईना पण भारतात औद्योगिकरणाचे वारे वाहू लागले. अगदी सुरुवातीला लहान उद्योग अस्तित्वात आले. कारण इंग्रजांनी जवळपास अडीचशे वर्ष राज्य केल्यानंतर भारताची अर्थव्यवस्था ही पूर्णपणे मोडकळीस आली होती. त्यामुळे मोठ्या उद्योगांसाठी भांडवल कुठून आणावे? ही एक मोठी समस्या सरकार समोर उभी होती. ही एक मोठी समस्या होती.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. प्रशांत म. पुराणिक, (सहाय्यक अधिव्याख्याता वाणिज्य विभाग) गुरुकुल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदा तालुका: कोरपणा, जिल्हा चंद्रपूर*

**How to cite this article:**
*पुराणिक. प्रशांत. म. (2026). परंपरागत विपणन आणि आधुनिक विपणनातील आयाम. Journal of Research and Development, 18(2(XIX)), 18–24. https://doi.org/10.5281/zenodo.19325846*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.19325846
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

कारण पहिल्या ते पाचव्या पंचवार्षिक योजनांमध्ये कृषी क्षेत्राच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात सरकारने पॅकेज घोषित केले होते. या कालावधीमध्ये भारतातील कृषी क्षेत्र हे विकसित झाले होते. परंतु आता आवश्यकता होती ती औद्योगिक विकासाची व प्रगतीची. उद्योगांना मोठ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध व्हावे तसेच मोठ्या प्रमाणात मोठे उद्योग उभारले जावेत यासाठी 19 जुलै 1969 मध्ये 14 राष्ट्रीय बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. परिणामतः भारतासारख्या विकसनशील देशातही मोठे मोठे उद्योग उभारल्या गेल्यामुळे देशात मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण घडून आले. परंतु हे जरी खरी असले तरी झालेले उत्पादन हे ग्राहकांपर्यंत नेण्यासाठी परंपरागत पद्धतीचाच उपयोग केला जात असे. जसे ठोक किंवा घाऊक व्यापारी ही संकल्पनाच पहिले अस्तित्वातच नव्हती. आवश्यकतेनुसार किरकोळ व्यापारी सरळ उत्पादन स्थळावर म्हणजेच कारखान्यात जाऊन वस्तूंची खरेदी करत असे. तसेच वस्तूची जाहिरात करण्यासाठी उत्पादक तयार नसत. कारण हा एक अनावश्यक खर्च आहे असे उत्पादकांचे मत असे. विक्रय किंवा विपणान कर्मचारी यांची नियुक्ती केल्यास मोठ्या प्रमाणात वस्तू ग्राहकांपर्यंत पोहोचू शकतात ही संकल्पना मुळातच अनेकांना मान्य नव्हती. परिणामतः औद्योगिक संघटनेमध्ये सुद्धा म्हणजेच कारखान्यांमध्ये सुद्धा विपणन विभाग आणि विक्रय विभाग यांची स्वतंत्र स्थापना केली जात नसे. कारण विपणन आणि विक्रय विभाग हे वेगवेगळे असण्यापेक्षा केवळ विक्री विभागच कारखान्यात असावा असे उद्योजकांचे मत असे. यामागे प्रमुख कारण म्हणजे उद्योजकांना स्वतःच विपणन आणि विक्री या दोन्ही वेगळया संकल्पना आहेत याचेच ज्ञान नव्हते.

कालांतराने भारतामध्ये मोठमोठे उद्योग स्थापन झाल्यामुळे परंपरागत विपणनाऐवजी आधुनिक विपणन पद्धतीचा अवलंब केल्यास उत्पादित वस्तू ग्राहकांपर्यंत लवकरात लवकर पोहोचवणे शक्य होईल. त्यामुळे वेळ, पैसा व श्रम याचीसुद्धा बचत होईल, असे मत अनेक व्यवस्थापन तज्ञ व विपणन तज्ञांनी मांडले आणि खऱ्या अर्थाने भारतात आधुनिक विपणन पद्धतीचा उदय झाला. आजच्या आधुनिक विपणन शैलिचे स्वरूप अभ्यासल्यास लक्षात येणारी एक अत्यंत महत्त्वपूर्ण म्हणजे उत्पादकाच्या आणि विपणन आणि विक्रय व्यवस्थापकांच्या कौशल्यामुळे आज उत्पादन क्षेत्र ते ग्राहक हे अंतर दिवसेंदिवस कमी होत आहे. वस्तू वितरणामध्ये एक पद्धतशीरपणा आलेला आहे. यामुळे बाजारपेठेतील स्पर्धेचे देखील संतुलन राखणे शक्य झाले आहे. पूर्वीसारखा एकाधिकार आज नामशेष झाला आहे. कारण ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार, आवडीनिवडीनुसार आणि आर्थिक परिस्थितीनुसार वस्तू खरेदी करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. यामुळेसुद्धा विपणनाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले आहे आणि ते जास्त आधुनिक होत आहे.

शोध प्रकल्पाची उद्दिष्ट्ये:

या शोध प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत

१. परंपरागत विपणन शैली लक्षात घेणे.

२. आधुनिक विपणनशैलीची संकल्पना लक्षात घेणे.

३. परंपरागत विपणन शैली आणि आधुनिक विपणन शैली यातील प्रमुख फरक लक्षात घेणे.

४. आधुनिक विपणन शैलीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला सकारात्मक परिणाम अभ्यासणे.

५. आधुनिक विपणन शैलीचा उत्पादकांना झालेला फायदा अभ्यासणे.

**गृहीतकृत्य:**

या शोध प्रकल्पामध्ये पुढील गृहीतकृत्ये घेतली आहे.

१. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये परंपरागत विपणनात अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या.

२. आधुनिक विपणनामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम झालेला आहे.

**संशोधन पद्धती:**

सदर संशोधन प्रकल्पामध्ये महत्त्वाची माहिती गोळा करण्यासाठी द्वितीय स्त्रोतांचा आधार घेतल्या गेला आहे.

विपणन पद्धतीशी संबंधित विविध घटक:

पूर्वीच्या परंपरागत विपणन पद्धती कशी होती? आणि त्यावेळी सदर विपणन पद्धतीला परंपरागत पद्धती का म्हटले जायचे? हे अभ्यासण्यासाठी आपल्याला विपणन पद्धतीशी संबंधित अन्य घटकांचा अभ्यास करावा लागेल. या घटकांमध्ये आर्थिक घटक, सामाजिक घटक, भौगोलिक घटक आणि मानसशास्त्रीय घटक या तीन घटकांचा प्रामुख्याने समावेश होतो.

**आर्थिक घटक:**

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील जनतेची आर्थिक परिस्थिती अगदी सरासरी होती. त्याकाळी देशाचे राष्ट्रीय उत्पन्न अत्यंत कमी होते. दरडोई उत्पन्न देखील कमी असल्यामुळे अनेक लोक दारिद्र्यरेषेखाली होते. म्हणजेच पूर्वी खूप कमी लोक श्रीमंत या वर्गात गणले जायचे. कुटुंबामधील व्यक्तींची संख्या ही देखील जास्त होती. कुटुंबातील एकूण आर्थिक आवक ही कमी होती आणि कुटुंबातील व्यक्ति मात्र जास्त होते. त्यामुळे चांगल्या दर्जाच्या वस्तू व अन्नधान्य खरेदी करण्यापेक्षा स्वस्त व मध्यम स्वरूपाच्या वस्तू व अन्नधान्य खरेदी करण्याकडे कुटुंबीयांचा कल होता. हातावर कमावणे आणि हातावर खाणे हेच प्रत्येकाच्या जीवनाचे प्रमुख उद्दिष्ट होते. उत्पादकाची देखील तीच परिस्थिती होती. सरासरी दर्जाचा कच्चामाल आणून उत्पन्न करण्याकडे पूर्वी उत्पादकांचा कल होता. सरासरी दर्जाच्या कच्च्या मालापासून उत्पादित केलेल्या वस्तूसुद्धा अगदीच सरासरी होत्या. त्यामुळे अशा सरासरी वस्तूंचे विपणन करण्यास उत्पादक सहजासहजी तयार होत नसत. कारण उत्पादकांची आर्थिक परिस्थिती देखील खूपच वाईट होती. त्यामुळे तेव्हाचे उत्पादक सुद्धा वस्तूचे विपणन करण्यासाठी उदासीनच होते. या सर्व प्रकारांमुळे अनेक बाजारपेठांमध्ये मोठमोठे घाऊक किंवा ठोक व्यापारी आणि किरकोळ व्यापारी बाजारपेठांमधील एका विशिष्ट वस्तूंचा मोठ्या प्रमाणात साठा केवळ आपल्याकडेच राहावा यासाठी सतत प्रयत्नशील असत. जेव्हा बाजारपेठेत एखाद्या विशिष्ट वस्तूची विक्री करण्याचा हक्क हा केवळ एका विक्रेत्याकडे असतो किंवा त्या बाजारपेठेमध्ये एकाधिकार अस्तित्वात आहे, असे म्हटले जाते. स्वातंत्र्योत्तर काळात बऱ्याचशा शहरी आणि ग्रामीण बाजारपेठांमध्ये मक्तेदारी अस्तित्वात होती. त्यामुळे एक विक्रेता आणि असंख्य ग्राहक अशी विषम परिस्थीती निर्माण होत असे. मक्तेदारीमध्ये वस्तूची किंमत किती ठेवायची आणि कोणत्या ग्राहकाला वस्तूचा पुरवठा किती करायचा हे सर्व किरकोळ विक्रेताच ठरवित असे. त्यामुळे नाईलाजाने ग्राहकांना जास्त किमतीमध्ये वस्तूचा पुरवठा केला जात असे. सुरुवातीला वस्तूची किंमत कमी ठेवणे आणि नंतर एकदा ती वस्तू ग्राहकांना पसंत पडल्यानंतर आणि ग्राहकांनी त्या वस्तूला पुन्हा मागणी केल्यानंतर वस्तूच्या किमती भरमसाठ वाढवणे हे पूर्वीच्या एकाधिकार पद्धतीमध्ये सहज घडून येत असे. अशाप्रकारे किरकोळ विक्रेते शहरात आणि ग्रामीण भागात देखील ग्राहकांची पिळवणूक करत असे. मात्र आज सर्वच बाजारपेठांचे स्वरूप पूर्णपणे बदललेले आहे. एकाच वस्तूचे शेकडो बँड्स आज बाजारपेठेमध्ये उपलब्ध असल्यामुळे बाजारपेठेतील स्पर्धा तीव्र स्वरूपात वाढली आहे. त्यामुळे कोणत्याच बाजारपेठेमध्ये परंपरागत पद्धतीने चालत आलेली एकाधिकाराची पद्धती आज अस्तित्वात नाही. तर ती नामशेष झाली आहे.

अनेकदा परंपरागत विपणन पद्धतीतील एकाधिकार पद्धती ही आता पूर्णतः नामशेष झाली आहे असे म्हटले जात असले तरी ही बाब पूर्णतः सत्य नाही. कारण अनेकदा बाजारपेठेत नव्याने आलेल्या वस्तूंची किंमत कमी ठेवून आणि त्या वस्तूवर मोठ्या प्रमाणात विविध योजना देऊन ग्राहकांना आकर्षित केले जाते. मात्र एकदा ग्राहकांनी त्या वस्तूची फेर मागणी केली म्हणजेच पुन्हा मागणी केली की उत्पादक त्या वस्तूच्या किमतीमध्ये वाढ करतात. ग्राहकांचे हे आर्थिक शोषण केवळ उत्पादकाद्वारे होते असे नाही तर ठोक किंवा घाऊक आणि किरकोळ विक्रेत्यांद्वारे सुद्धा ग्राहकांचे आर्थिक शोषण केले जाते. अनेकदा जीवनावश्यक वस्तूंचा आणि अन्नधान्यांचा कृत्रिम साठा करून ठोक किंवा घाऊक आणि किरकोळ विक्रेते ग्राहकांचे आर्थिक शोषण करतात. कृत्रिम साठा बाजारपेठेत निर्माण करून हे ठोक किंवा घाऊक आणि किरकोळ विक्रेते वस्तूंच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढवतात. अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास बाजारपेठांमध्ये वस्तूंची मागणी जास्त आणि पुरवठा मात्र कमी यामुळे वस्तूंच्या किमतीमध्ये मोठी वाढ होते.

काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात ठोक किंवा घाऊक आणि किरकोळ विक्रेत्यांनी डाळीचा मोठ्या प्रमाणात कृत्रिम तुटवडा निर्माण केला होता. अशाप्रकारे कृत्रिम तुटवडा निर्माण केल्यामुळे ग्राहकांना अनेक महिने खूप जास्त किमतीत डाळ खरेदी करावी लागली होती. अशाप्रकारे जीवनावश्यक वस्तूंचा अतिरिक्त साठा ठेवल्यामुळे कृत्रिम तुटवडा निर्माण करून अनेकदा ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात वाजवीपेक्षा जास्त रक्कम घेतली जाते.

सामाजिक घटक:

समाजामध्ये आपले स्थान चांगले राहावे, समाजामध्ये मानाचे स्थान प्राप्त व्हावे व इतर प्रतिष्ठित व्यक्तीप्रमाणे आपलीदेखील प्रतिष्ठा वाढावी यासाठी आज प्रत्येक व्यक्ती प्रयत्नशील असतो. यामुळेदेखील काहीही आवश्यकता नसताना अनेकदा ग्राहकांमार्फत वस्तू खरेदी केल्या जातात. साधारणत: स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्राहकांचा विचार केल्यास लक्षात येण्याजोगी बाब म्हणजे आपल्याला परवडेल अशाच वस्तू ते खरेदी करत असत. म्हणजेच आपण महिन्याला किती मासिक वेतन मिळवतो याचा अंदाज घेऊनच पूर्वीचे ग्राहक वस्तूची खरेदी करत असत. त्यामुळे पूर्वीची परंपरागत विपणन पद्धती ही जास्त सक्रिय नव्हती. मागील काही महिन्यांत किंवा वर्षांत एकूण किती विक्री झाली त्या विक्रीची सरासरी काढूनच तेवढा माल ठोक किंवा घाऊक विक्रेत्याकडे ठेवला जात असे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

आज माणसाचे श्रेष्ठत्व हे ज्याप्रमाणे आर्थिक बाबीवरून ठरते त्याचप्रमाणे ते सामाजिक बाबीवरूनसुद्धा ठरत असते. समाजात राहताना मानाने व प्रतिष्ठेने जगावे यासाठी आज अनेक लोक लाखो रुपये खर्च करीत आहेत. आपल्या शेजारी राहणाऱ्या व्यक्तीने जर एखादी अशी वस्तू खरेदी केली की ज्यामुळे त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होणार असेल, तर ती वस्तू किंवा त्यापेक्षा जास्त किमतीची आणि चांगल्या दर्जाची वस्तू आपल्याकडे सुद्धा असावी यासाठी व्यक्ती प्रयत्नशील असतात. पुरुष ग्राहकांपेक्षात्या स्त्री ग्राहकांमध्ये वस्तू खरेदीची वरील प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात आढळून येते. अशाप्रकारे सामाजिक दर्जा वाढवणाऱ्या वस्तूमध्ये साधारणतः चांगल्या दर्जाचा लॅपटॉप, कॉम्प्युटर, कार, पीओपी, सोफासेट, टेलिव्हिजन, रेफ्रिजरेटर इत्यादी विविध वस्तूंचा प्रामुख्याने समावेश होतो. ग्राहकांची आर्थिक परिस्थिती, आवडीनिवडी आणि गरजा लक्षात घेऊनच उत्पादक आपल्या वस्तू बाजारपेठेत विक्रीस आणतात.

भौगोलिक घटक:

भौगोलिक घटकात झालेला बदलसुद्धा परंपरागत विपणन पद्धतीचे आधुनिक विपणनामध्ये रूपांतर करण्यासाठी सहाय्यक ठरला. परंपरागत विपणन पद्धतीमध्ये येणारा मोठा अडथळा म्हणजे वाहतूक व दळणवळणाचा होता. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये रस्त्यांचे रुंदीकरण झालेले नव्हते. त्यामुळे वाहतूक व दळणवळणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. ग्रामीण भागात तर ही परिस्थिती अधिकच बिकट होती. आपण उत्पादित केलेला शेतमाल हा अत्यंत खडबडीत रस्त्याने बाजारपेठेपर्यंत विक्रीस न्यावा लागत असे. नदीनाल्यांना आलेल्या पुरामुळे व सततधार पावसामुळे अनेकदा शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची गावातीलच व्यापाऱ्यांना कमी किमतीत विक्री करावी लागत असे. कमी प्रमाणात कोठारे असल्यामुळे वस्तूंची साठवणूक कशी करायची? हा एक मोठा प्रश्न विपणनासमोर निर्माण झाला होता. त्यांचा शेतमाल बाजारपेठेत नेतांना रस्त्यातच खराब होत असे. त्या काळात रस्त्यांचे डांबरीकरण झालेले नव्हते. त्यामुळे उत्पादन क्षेत्रापासून म्हणजेच कारखान्यापासून उत्पादित झालेल्या वस्तू या बाजारपेठेपर्यंत नेण्यात मोठे अडथळे येत असत. तसेच कारखान्यापासून बाजारपेठांचे अंतर देखील फार दूर होते. वाहतुकीच्या साधनांचा अभाव ही देखील एक मोठी समस्या पूर्वी वस्तूचे विपणन करताना येत होती. त्यामुळे वस्तूच्या विपणनापेक्षा वस्तूची विक्री करण्याकडे उत्पादकाचे तसेच किरकोळ व्यापाऱ्याचे प्रमुख उद्दिष्ट होते.

आजच्या आधुनिक विपणनाचा विचार केल्यास लक्षात येण्याजोगी बाब म्हणजे आधुनिक विपणन पद्धती ही पूर्वीच्या परंपरागत विपणन पद्धतीपेक्षा अत्यंत आधुनिक झालेली आहे. ग्राहकांना त्यांना पाहिजे असलेली वस्तू घाऊक किंवा ठोक व्यापाऱ्याकडे तसेच किरकोळ व्यापाऱ्याकडे उपलब्ध असावी की जेणेकरून ग्राहकांनी मागणी करता क्षणीच वस्तूंचा पुरवठा करता यावा यासाठी प्रत्येक उत्पादक आज प्रयत्नशील आहे. आधुनिक विपणनाच्या भौगोलिक घटकांचा अभ्यास करताना त्यात प्रामुख्याने रस्त्यांचा विकास, वाहतूक व दळणवळणाच्या साधनांचा विकास, ग्राहकांच्या संशोधनाचे वाढलेले महत्त्व, नद्यांच्या धरणांची वाढलेली संख्या, शहरालगत उत्पादन क्षेत्र किंवा कारखाना बांधण्यासाठी उद्योजकाने दिलेली प्राथमिकता, उत्पादन साधनांचा व स्त्रोतांचा पूर्ण उपयोग इत्यादी विविध घटकांचा समावेश होतो. या उत्पादन साधनांमुळे व स्त्रोतांमुळे येत्या काही दशकांमध्ये विपणन प्रणालीमध्ये आधुनिकता आलेली आहे. परिणामतः नवनवीन उद्योजकांनी विविध उद्योग उभारले आहेत.

मानसशास्त्रीय घटक:

पूर्वीच्या परंपरागत विपणन पद्धतीमध्ये ग्राहकांच्या मानसशास्त्राला जास्त महत्त्व दिले जात नसे. ग्राहकांच्या आवडीनिवडी, गरजा, ग्राहकांच्या वस्तुबद्दलच्या अपेक्षा, अपेक्षित ग्राहक हा कायम ग्राहक होण्यासाठी करण्यात येणारे प्रयत्न, विक्रय्योत्तर सेवा, विपणन व विक्री संशोधन या संकल्पनाच पूर्वी अस्तित्वात नव्हत्या. कारण पूर्वीच्या बाजारपेठा या ग्राहककेंद्री नसून उत्पादककेंद्री होत्या. उत्पादककेंद्री बाजारपेठा याचा अर्थ उत्पादक त्याला वाटेल त्या वस्तू उत्पादित करत असे आणि त्या वस्तू ग्राहकांना खरेदी कराव्या लागत असे. ग्राहकांचे उत्पन्न अत्यंत मर्यादित असल्यामुळे व्यापाऱ्यांकडून वस्तू खरेदी करताना त्यांना अनेकदा जास्त किमतीत खरेदी करावी लागत असे. उधारीत वस्तू मिळत आहेत असे माहीत झाल्यामुळे अनेक ग्राहक वस्तूंची किंमत न विचारताच वस्तूची खरेदी करत असे. विक्रेतासुद्धा ग्राहकांना मोठ्या प्रमाणात वस्तूंची उधारीवर विक्री करीत असे. मात्र अश्या प्रकारे उधारीवर घेतलेल्या वस्तूंची मोठ्या प्रमाणात किंमत आकार असे. अशाप्रकारे पूर्वीच्या विक्रेताकेंद्रीत बाजारपेठांमुळे विपणनाच्या कार्यात कोणतीच आधुनिकता नव्हती. परिणामतः पूर्वीचे उत्पादक देखील बाजारपेठेत आपल्या वस्तू ग्राहकांपर्यंत पोहोचती करण्यासाठी परंपरागत विपणन पद्धतीचाच जास्त उपयोग करत असे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

आजच्या आधुनिक युगामध्ये परंपरागत विपणनशैली जवळ जवळ नामशेष झाली आहे. आधुनिक विपणन पद्धतीमध्ये विपणन संशोधनाला जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यात प्रामुख्याने बाजारपेठेतील स्पर्धा संशोधन, किंमत संशोधन, जाहिरात संशोधन, स्पर्धकांच्या व्युहरचनेचे संशोधन, स्पर्धक संशोधन, ग्राहकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे संशोधन, वस्तू संवर्धनाचे संशोधन, विक्रय संशोधन इत्यादी संशोधनांचा समावेश होतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास, विपणन संशोधनाशिवाय आधुनिक विपणन पद्धती अस्तित्वातच येऊ शकत नाही. त्यातील सर्वात महत्त्वाचे संशोधन म्हणजे ग्राहकांचे संशोधन होय. आजच्या घडीला ग्राहक हा बाजारपेठेचा राजाच नव्हे तर सम्राट देखील आहे. कारण उत्पादकाने कितीही चांगले उत्पादन केले परंतु त्याचे विपणन संशोधन केले नाही, तर बदलत्या परिस्थितीमुळे विपणनात अनेक अडथळे येऊ शकतात. सदर विपणनातील अडथळे कसे दूर करायचे? याची पूर्वतयारीसुद्धा विपणन संशोधनाद्वारे वस्तूचे प्रत्यक्ष विपणन करण्या अगोदरच केली जाते. रस्त्यांचे रुंदीकरण, वाहतूक व दळणवळणाची अद्ययावत साधने, मोठमोठी गोदामे व शीतगृहे, बाजारपेठेत मोठ्या संख्येत असलेले किंवा ठोक आणि किरकोळ व्यापारी, संदेशवहनाची उत्कृष्ट जाण व कला असलेले विक्रय प्रतिनिधी, चतुरस्त्र विषयाचे ज्ञान असलेले उत्पादक, अत्यंत चौकस बुद्धी चा ग्राहकवर्ग आणि विविध ग्राहक न्यायालयाने ग्राहकांना प्रदान केलेली सुरक्षितता व त्यामुळे वस्तू खरेदी करताना त्यांना मिळालेले वस्तूवरील किमतीची सौदेबाजी करण्याचे स्वातंत्र्य यामुळे आधुनिक विपणन पद्धती ही केवळ उत्पादकासाठीच नव्हे तर विपणनाच्या प्रत्येक घटकासाठी अत्यंत फायदेशीर ठरली आहे.

आपल्या देशाची अर्थव्यवस्था देखील आधुनिक विपणन पद्धतीमुळे मोठ्या प्रमाणात प्रभावित झाली आहे. आधुनिक विपणन पद्धतीमुळे विपणनाचे विविध घटक अत्यंत सक्रिय झाले आहेत. परिणामतः ग्राहकांच्या सतत येणाऱ्या पुन्हा मागणीमुळे उद्योग कायमचे बंद होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले आहे. कारण आधुनिक विपणनाद्वारे उत्पादनक्षेत्र किंवा कारखान्यातून उत्पादित झालेल्या वस्तू या सुनियोजित पद्धतीने ग्राहकांपर्यंत पोहोचतात व त्या वस्तूंपासून त्यांना महत्तम समाधान प्राप्त होते. या सर्व आधुनिक विपणन प्रक्रियेमुळे ग्राहकांच्या समाधानात सतत वाढ होत असून त्यांच्या जीवनशैलीत देखील मोठी सुधारणा झाली आहे.

परंपरागत विपणन पद्धतीवर आणि आधुनिक विपणन पद्धतीवर प्रभाव टाकणारे उपरोक्त घटक अभ्यासल्यानंतर अन्य घटकांचा दोन्ही विपणन पद्धतीवर काय परिणाम झाला? हे देखील अभ्यासणे तितकेच महत्त्वाचे आहे. हे अन्य घटक पुढीलप्रमाणे

वस्तूचे पुन्हा उत्पादन किंवा पर्यायी वस्तूचे उत्पादन:

उत्पादन क्षेत्रापासून म्हणजेच कारखान्यापासून उत्पादित झालेल्या वस्तू या ग्राहकांपर्यंत पोहोचविणे एवढेच मर्यादित कार्य व उद्दिष्ट पूर्वीच्या परंपरागत विपणन पद्धतीचे होते. ग्राहकांच्या आवडीनिवडी, त्यांच्या मानसशास्त्राचा अभ्यास, ठोक किंवा घाऊक आणि किरकोळ व्यापाऱ्यांच्या समस्या, विक्रय कर्मचाऱ्यांना बाजारपेठेत ठोक किंवा घाऊक व्यापाऱ्यांशी संपर्क साधताना येणाऱ्या समस्या इत्यादी विविध घटकासंबंधी अधिक माहिती जाणून घ्यायची कोणतीही आवश्यकता पूर्वीच्या पालकांना वाटत नसल्यामुळे वस्तू बाजारपेठेत नेणे आणि त्यांची विक्री करणे एवढाच मर्यादित हेतू पूर्वीच्या उत्पादन प्रणालीचा होता. त्यामुळे वस्तूच्या पुन्हा उत्पादनाला किंवा पर्यायी वस्तूच्या उत्पादनाला शून्य महत्व दिले गेले.

आजच्या आधुनिक युगामध्ये आधुनिक विपणन शैलीचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे. आजचा उद्योजक म्हणजेच उत्पादक देखील अत्यंत चौकस झाला आहे. आधुनिक विपणन प्रक्रियेमध्ये उद्योजक विपणन करत असताना त्याला आपल्या पर्यायी वस्तू काय असू शकतात याचे ज्ञान मिळते. औद्योगिक संघटनेमध्ये जे विविध विभाग असतात त्यातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण विभाग म्हणजे कच्चा माल खरेदी खाते विभाग होय.

ग्राहकांनी वस्तूची खरेदी केल्यानंतर त्या वस्तूंना पुन्हा मागणी यावी असे प्रत्येक उत्पादकाला वाटत असते. यासाठी प्रत्येक उत्पादक सतत प्रयत्नशील असतो. एवढेच नव्हे तर वस्तूला ग्राहकांकडून पुन्हा मागणी आल्याबरोबर त्यांना वस्तूचा शक्य तितक्या लवकर पुरवठा करण्यात यावा यासाठी त्या वस्तूंचा मोठ्या प्रमाणात साठा ठोक व्यापारी आणि किरकोळ व्यापाऱ्याकडे देखील असला पाहिजे. तेव्हाच ग्राहकांनी मागणी करताक्षणीच त्यांना वस्तूचा पुरवठा करता येईल.

अनेक वस्तू अशा असतात की ज्यांचे उत्पादन झाल्यानंतर शिल्लक राहिलेल्या कच्च्या मालापासून पुन्हा नवीन वस्तूंचे उत्पादन घेतले जाते. या वस्तूंमध्ये प्रामुख्याने उसाच्या मळीपासून कागद, जाड खरडा आणि विविध वस्तू तयार करता येतात. तसेच मोठमोठ्या राईस मिलमध्ये तांदूळ वेगळा काढल्यानंतर तांदळाचे जे साल किंवा टरफल शिल्लक राहते त्यापासूनही तेल निर्मिती केल्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

जाते. अशाप्रकारे आपल्या वस्तू उत्पादित केल्यानंतर जो शिल्लक माल राहतो त्यापासूनसुद्धा नवीन उत्पादन घेण्यास प्राधान्य मिळते. यासाठी देखील आधुनिक विपणन प्रक्रियेची मदत घेतली जाते.

मोठ्या प्रमाणात रोजगार प्राप्त होतो:

काही दशकांआधी भांडवलाअभावी उद्योगाचे क्षेत्र हे अत्यंत मर्यादित होते. उद्योगाचे क्षेत्र हे लहान असल्यामुळे विपणनाचे क्षेत्र देखील लहान होते व म्हणून पर्यायाने रोजगाराच्या संधीसुद्धा खूपच कमी होत्या.

आजच्या आधुनिक विपणनाचे क्षेत्र हे खूप विस्तारित असल्यामुळे कारखान्यात प्रत्येक विभागात विशिष्ट कला गुण, प्रशिक्षण आणि योग्य अनुभव असलेल्या कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते. जसे प्रामुख्याने कच्च्या वस्तू खरेदी विभाग, भांडार विभाग, उत्पादन विभाग, विक्री विभाग, उत्पादन दर्जा तपासणी विभाग, लेखा विभाग, अंकेक्षण विभाग इत्यादी. याव्यतिरिक्त वस्तूची वाहतूक करण्यासाठी आवश्यक असलेले वाहतूक क्षेत्र, वस्तूची जाहिरात करण्यासाठी योग्य असे जाहिरात क्षेत्र, वस्तूला विविध प्रमाप देण्यासाठी सरकारची विशिष्ट कार्यालये, अन्न व रसायन विभाग इत्यादी विविध सरकारी कार्यालयांमध्ये आणि विभागांमध्ये कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात नियुक्ती झालेली आहे. परिणामतः देशातील सुशिक्षित बेकारीचे प्रमाण कमी झालेले आहे.

सदर शोध प्रकल्पाचा सारांश तयार करणे आणि त्यावरून योग्य निष्कर्ष काढणे हा या संशोधनाचा शेवटचा टप्पा आहे.

**निष्कर्ष:**

अठराव्या शतकातील औद्योगिक क्रांतीमुळे भारतासारख्या विकसनशील देशात मोठ्या प्रमाणात उद्योग व व्यवसाय वाढले. परिणामतः उत्पादित वस्तू उत्पादन क्षेत्रापासून म्हणजेच कारखान्यापासून बाजारपेठेत ग्राहकांपर्यंत योग्य प्रकारे देण्यात यावी आणि ग्राहकांना जास्तीत जास्त समाधान प्राप्त व्हावे यासाठी एका सुनियोजित पद्धतीने त्या वस्तू ग्राहकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक होते. यातूनच विपणनाची उत्पत्ती झाली. अगदी सुरुवातीच्या काळात भारतातील उद्योग लहान असल्याने उत्पादन देखील कमी प्रमाणात होत होते. त्यामुळे विपणनाचे क्षेत्रदेखील मर्यादित स्वरूपाचे होते. कालांतराने जसजशी कारखान्याची संख्या वाढायला लागली, तसे विपणनाचे क्षेत्र वाढले. तरीसुद्धा भारताच्या क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार केल्यास ही उद्योगांची संख्या खूप कमी होती. त्यामुळे विपणनाच्या आधुनिकतेकडे मात्र दुर्लक्ष झाले. उद्योग व व्यवसाय विस्तारासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता होती. परंतु भांडवलाच्या कमतरतेमुळे विकासात्मक योजना राबविण्यात अनेक अडचणी निर्माण झाल्या. खडबडीत व कच्चे रस्ते, वाहतूक व दळणवळणाचे प्रश्न, शीतगृहांची मर्यादीत संख्या, बाजारातील अडते, विपणन संशोधनाचा अभाव, उत्पादकांची आणि विक्रेत्यांची मर्यादित संख्या, ग्राहकांच्या आवडीनिवडीकडे झालेले दुर्लक्ष, ग्राहकांच्या महत्तम म्हणजेच जास्तीत जास्त समाधानापेक्षा वस्तू विक्रीवर उत्पादकाने दिलेले महत्त्व हे पूर्वीच्या परंपरागत विपणनासमोरील प्रमुख अडथळे होते.

उद्योगांना मोठ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध व्हावे तसेच मोठ्या प्रमाणात मोठे उद्योग उभारले जावेत यासाठी 19 जुलै 1969 मध्ये 14 खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. तसेच भारतातील राष्ट्रीयकृत बँकांप्रमाणेच खाजगी वित्तीय संस्थांमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढ झाली. अनेक औद्योगिक बँकांची स्थापना झाल्यामुळे देशातील उद्योग वाढण्यास सुरुवात झाली. कालांतराने परिणामतः भारतासारख्या विकसनशील देशातही मोठे मोठे उद्योग उभारल्या गेल्यामुळे देशात मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण घडून आले. जसजशी कारखान्याची संख्या वाढायला लागली, तसे विपणनाचे क्षेत्र देखील वाढले. रस्त्यांचे रुंदीकरण, वाहतुकीची नवनवीन व जलद साधने, शीतगृहांची वाढती संख्या, घाऊक किंवा ठोक विक्रेत्यांची वाढती संख्या, जाहिरातींचे वाढते महत्त्व, विपणन घटकाच्या संशोधनाचे वाढते महत्व, ग्राहकांच्या आवडीनिवडीनुसार उत्पादन करण्याकडे असलेला उत्पादकाचा कल, ग्राहकांना वस्तूंची विक्री करण्यापेक्षा ग्राहकांच्या समाधानाकडे उत्पादकांनी दिलेले लक्ष आणि प्राथमिकता या व यासारख्या विविध घटकांमुळे परंपरागत विपणनाचे आधुनिक विपणनामध्ये रूपांतर झाले आहे.

आज भारतीय बाजारपेठांचा व त्या बाजारपेठांमधील ग्राहकांचा विचार केल्यास लक्षात येण्याजोगी बाब म्हणजे भारतातील जास्तीत जास्त ग्राहक हे चीन या देशाने उत्पादित केलेल्या वस्तू खरेदी करण्यास प्राथमिकता देत आहेत. वस्तू वापरा आणि फेकून द्या म्हणजेच युज अँड थ्रो हे ब्रीद असलेली संकल्पना आज भारतातील बहुतांश ग्राहकाने अंगिकारली आहे. यासाठी चीन या देशाने आधुनिक विपणनाचा आधार घेतला आहे. परंतु त्यामुळे भारतातील उद्योग व व्यवसायाला तसेच सर्व प्रकारच्या विक्रेत्यांना मोठा धोका निर्माण झाला आहे.

एवढेच नव्हे तर भारतातील हंगामी विक्रेत्यांच्या व्यवसायाला देखील मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला आहे. कारण सुयोग्य व आधुनिक विपणनाचा आधार घेऊन चीन सारखा देश भारतातील बाजारपेठांवर वर्चस्व निर्माण करू पाहत आहे. सरकारने योग्य ती कारवाई करून चीन निर्मित वस्तूंच्या उत्पादनावर बंदी घालायला हवी व भारतातील ग्राहकांना जास्तीत जास्त प्रमाणात भारतीय वस्तू खरेदी करण्यासाठी प्रेरणात्मक कार्यक्रम राबवायला हवे.

ई-कॉमर्स व एम. कॉमर्समुळे ग्राहक बाजारपेठेत जाण्यापेक्षा घरी कॉम्प्युटरवर आणि मोबाईलवर वस्तू खरेदी करणे पसंत करत आहे. या आधुनिक प्रवृत्तीमुळेसुद्धा भारतातील उद्योग व्यवसायाला एक मोठा धोका निर्माण झाला आहे. सरकारने यावर नियंत्रण आणायला हवे.

**संदर्भ (Reference)**

१. विपणान व्यवस्थापन : डॉ. मेघा कानेटकररजनी प्रकाशन, नागपूर
२. Marketing Management : Philip Kotler
३. सामाजिक संशोधन पद्धती : डॉ. प्रदीप आगलावे, साईनाथ प्रकाशन, नागपूर
४. विपणनाची मूलतत्वे : डॉ. प्रभाकर देशमुख दासागणू प्रकाशन, नागपूर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# नव्या भारतातील उद्योजकता आणि स्टार्ट परिसंस्था

**रुपाली प्रशिल पाटील**[1] **डॉ. लतिका ज्ञानेश्वर गायकवाड**[2]
[1]संशोधक विद्यार्थी (अर्थशास्त्र), मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
[2]सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
**Email:** rupali.patil@vivacollege.org

**Manuscript ID:** JRD -2026-180206
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 25-29
February - 2026
**Submitted:** 15 Jan. 2026
**Revised:** 25 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***सारांश :***

*भारतीय उद्योजकतेला चालना देण्यासाठी एक धोरणात्मक पाऊल म्हणून २०१६ मध्ये 'स्टार्टअप इंडिया' हा उपक्रम सुरू झाला. भारताच्या उद्योजकीय आणि नवोन्मेष परिसंस्थेवर महत्त्वपूर्ण प्रभाव टाकणारा जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वात वैविध्यपूर्ण स्टार्टअप परिसंस्थांपैकी एक म्हणून स्टार्टअप इंडिया हा उपक्रम विकसित झाला आहे. डिसेंबर २०२५पर्यंत त्यात २ लाखांहून अधिक मान्यताप्राप्त स्टार्टअपचा समावेश आहे. विकसित भारत २०४७चे ध्येय प्राप्त करण्यासाठी भारताच्या आर्थिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणून स्टार्टअप उदयास आले आहे. त्याद्वारे नवोन्मेष, रोजगारनिर्मिती आणि सर्वसमावेशक विकासाला चालना मिळत आहे. प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील उद्योजकतेच्या संदर्भात आर्थिक परिवर्तनाचा एक महत्वपूर्ण भाग म्हणून स्टार्टअप परिसंस्थेचा अभ्यास करण्यात आला आहे.*

***मुख्य शब्द*** *- उद्योजकता, स्टार्टअप परिसंस्था*

**प्रस्तावना :**

एकविसाव्या शतकात भारतात वेगाने आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिक परिवर्तन घडवून आले आहे. भारत ही जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. नवा भारत या संकल्पनेत केवळ विकास अंतर्भूत नसून आत्मनिर्भरता, नाविण्य, डिजिटल सक्षमीकरण आणि रोजगार निर्मिती हे घटक केंद्रस्थानी आहेत. या परिवर्तनात उद्योजकता आणि स्टार्टअप परिसंस्था महत्त्वपूर्ण ठरली आहे. जागतिक उद्योजकता विकास संस्थेनुसार १३७ देशांपैकी भारताचा ६८वा क्रमांक लागतो (Deepak Kumar Adhana, Alisha Kumar, 2020 ). माहिती, तंत्रज्ञान, आरोग्यसेवा आणि जीवन विज्ञान, शिक्षण, कृषी आणि बांधकाम क्षेत्रे ही सर्वाधिक स्टार्टअप केंद्रीय क्षेत्रे आहेत. आर्थिक वर्ष २०२३मध्ये स्टार्टअपने भारतीय अर्थव्यवस्थेत सुमारे १४० अब्ज डॉलरचे योगदान दिले आहे. जे २०३० पर्यंत एक ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. आर्थिक वर्ष २०१६ ते २०२३दरम्यान भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीमध्ये स्टार्टअपने १० ते १५% योगदान दिले आहे (Exploring India's dynamic Start-up Ecosystem , 2024).

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

1. उद्योजकतेचा अर्थ आणि वैशिष्ट्ये समजून घेणे.
2. भारतीय स्टार्टअप परिसंस्थेविषयी माहिती मिळविणे.
3. भारतीय स्टार्ट परिसंस्थेला पाठिंबा देणारे समुदाय तसेच सरकारी उपक्रम आणि सहाय्य यांविषयी आढावा घेणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19325882
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*रुपाली प्रशिल पाटील,संशोधक विद्यार्थी (अर्थशास्त्र), मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,*

**How to cite this article:**
*पाटील. रुपाली. प्रशिल., & गायकवाड. लतिका. ज्ञानेश्वर. (2026). नव्या भारतातील उद्योजकता आणि स्टार्ट परिसंस्था. Journal of Research and Development, 18(2(XIX)), 25–29. https://doi.org/10.5281/zenodo.19325882*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

**संशोधन साहित्याचा आढावा :**

१. Deepak Kumar Adhana, Alisha Kumar यांचा प्रस्तुत शोधनिबंध भारतात स्टार्टअप परिसंस्थेची सखोल माहिती देतो आणि कामगिरीचा अभ्यास करतो. हा शोधनिबंध यशस्वी व्यावसायिक उपक्रम निर्माण करण्यात आणि त्यांचे संगोपन करण्यात इन्क्यूबेटर्सच्या भूमिकेवर चर्चा करतो. तसेच, उद्योजकता संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि विद्यापीठांमध्ये व्यवसाय इन्क्यूबेटर्सची स्थापना करण्यासाठी सरकारच्या धोरणात्मक उपायांचाही अभ्यास करतो. शेवटी, हा शोधनिबंध शैक्षणिक संस्थांना त्यांच्या आवारात इन्क्यूबेटर्सची स्थापना करण्यासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानांवर चर्चा करतो. प्रस्तुत शोधनिबंधातून काढण्यात आलेले प्रमुख निष्कर्ष म्हणजे, इनक्यूबेटरच्या माध्यमातून, उद्योजक अधिक तांत्रिक स्वरूप विकसित करू शकतात आणि विद्यापीठे अधिक व्यावसायिक वर्तन अंगीकारू शकतात. त्याच वेळी, तंत्रज्ञान-आधारित उद्योग आणि विद्यापीठे यांच्यात प्रभावी संवाद साधण्यासाठी इनक्यूबेटर ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण यंत्रणा आहे. उद्योगाच्या गरजा अधोरेखित करणे आवश्यक आहे. सल्लागार सेवा इत्यादी क्षेत्रांमध्ये संपर्क शोधले पाहिजेत. विद्यापीठ हे सेवांच्या आंतरविद्याशाखीय नेटवर्कचा एक भाग आहे, जे सहाय्यक संस्थेला प्रोत्साहन देते. (Deepak Kumar Adhana, Alisha Kumar, 2020 )

२. Mahesh V. R, Dr. Vinay S. यांच्या शोधनिबंधाचा उद्देश भारतातील स्टार्टअप परिसंस्थेच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे आणि भारतातील स्टार्टअप्सना मदत करणाऱ्या सरकारी योजना व गुंतवणूकदारांनी देऊ केलेल्या निधीच्या पर्यायांचा शोध घेणे आहे. हा एक वर्णनात्मक अभ्यास आहे. ज्यासाठी दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला. भारतीय सरकार नावीन्य आणि गुंतवणुकीसाठी एक मजबूत परिसंस्था निर्माण करण्याकरिता स्टार्टअप्सना सक्रियपणे प्रोत्साहन आणि पाठिंबा देत आहे. जानेवारी २०१६ मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'स्टार्टअप इंडिया' उपक्रमामुळे स्टार्टअप क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि सहाय्य पुरवण्यात सरकारची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित होते. सरकारने देशभरात स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी स्टार्टअप इंडिया ॲक्शन प्लॅन, फंड ऑफ फंड्स फॉर स्टार्टअप्स (FFS) योजना, क्रेडिट गॅरंटी स्कीम फॉर स्टार्टअप्स (CGSS), स्टार्टअप इंडिया हब, राष्ट्रीय स्टार्टअप सल्लागार परिषद, अटल इनोव्हेशन मिशन, समृद्ध योजना इत्यादी अनेक उल्लेखनीय योजना हाती घेतल्या आहेत. भारत ही जगातील सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था आहे, जिथे विपुल संधी असलेले एक चैतन्यपूर्ण उद्योजक वातावरण आहे. DPIIT मध्ये नोंदणीकृत स्टार्टअप्सनी १२.४ लाख प्रत्यक्ष रोजगार निर्माण केले आहेत, ज्यात महाराष्ट्र राज्य रोजगार निर्मितीमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे, तर कर्नाटक आणि दिल्ली दुसऱ्या स्थानावर आहेत. फोनपे, स्विगी, झोमॅटो, फ्लिपकार्ट हे सर्वात यशस्वी युनिकॉर्न आहेत. एंटरप्राइझ टेक आणि फिनटेक क्षेत्रात गुंतवणूकदारांकडून सर्वाधिक निधी मिळाला आहे, तर ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म फ्लिपकार्ट आणि एडटेक क्षेत्रातील बायजूजला सर्वाधिक निधी प्राप्त झाला आहे. सरकारच्या 'स्टार्टअप इंडिया' उपक्रमाद्वारे केलेल्या या सर्व प्रयत्नांमुळे देशात अधिक तरुण उद्योजक तयार होत आहेत, ज्यामुळे देशाच्या शाश्वत विकासाला चालना मिळत आहे, हे मुख्य निष्कर्ष प्रस्तुत शोधनिबंधातून काढण्यात आले आहेत. (Mahesh V. R. Dr. Vinay S., 2025)

३. **Gauri Maheshwari** यांच्या शोधनिबंधाची प्रमुख उद्दिष्टे 'स्टार्टअप इंडिया' मोहिमेसारख्या सरकारी उपक्रमांचा उद्योजकतेला चालना देण्यासाठी होणारा परिणाम अभ्यासणे, भारतीय स्टार्टअप्ससमोर असलेल्या आव्हानांची माहिती मिळवणे, भारतीय स्टार्टअप्सचा तंत्रज्ञान-आधारित सेवा, फिनटेक, हेल्थ टेक आणि शाश्वत उपाय यांसारख्या विविध क्षेत्रांमधील उदयोन्मुख प्रवृत्तींचा शोध घेणे ही आहेत. प्रस्तुत शोधनिबंध भारतामधील स्टार्टअप्सवर सरकारी नियमांच्या सखोल परिणामावर प्रकाश टाकतो. प्रमुख निष्कर्षांमध्ये असे आढळून येते की, स्टार्टअप्सना अनुपालन आवश्यकता, कर धोरणे, बौद्धिक संपदा संरक्षण, कामगार कायदे आणि निधीविषयक नियमांसारख्या असंख्य आव्हानांना सामोरे जावे लागते. ही आव्हाने केवळ मोठा प्रशासकीय भारच टाकत नाहीत, तर खर्चही वाढवतात, नाविण्य आणि वाढीमध्ये अडथळा निर्माण करतात आणि परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्याच्या स्टार्टअप्सच्या क्षमतेवर प्रतिकूल परिणाम करतात. या संशोधनात सादर केलेले केस स्टडीज नियामक हस्तक्षेपांचे वैयक्तिक स्टार्टअप्सवरील मूर्त परिणाम अधिक दृढपणे सिद्ध करतात. (Maheshwari, 2023)

**उद्योजकता** :

उद्योजकता प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. उद्योजकता ही वाढीव संपत्ती निर्माण करण्याची गतिमान प्रक्रिया आहे. त्यासाठी नवीन कल्पना आणि सर्जनशील उपायांच्या निर्मिती आणि अंमलबजावणीसाठी ऊर्जा आणि उत्कटतेचा वापर आवश्यक आहे. (India, 2024)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

जोसेफ ए. शुम्पीटर यांच्यामते, "उद्योजकता हे कोणत्याही प्रकारची नाविण्यपूर्ण कार्ये आहेत, जी उद्योजकाच्या कल्याणावर परिणाम करू शकतात."

**उद्योजकतेची वैशिष्ट्ये :**

**१. नवनिर्मिती**

उद्योजकता ही देशाच्या आर्थिक विकासाला चालना देणारी एक नवनिर्मितीची प्रक्रिया आहे. शुम्पीटरच्यामते, नवीन वस्तूंची निर्मिती, कच्च्या मालाचे नवीन स्त्रोत, नवीन बाजारपेठांचा शोध, नवीन संघटन रचना, उत्पादनाच्या नवीन पद्धती यांचा समावेश नवनिर्मितीत होतो.

**२. जोखीम स्वीकारणे**

उद्योजकांना बाजारपेठेतील अनेक प्रकारच्या जोखीम स्वीकाराव्या लागतात. उदा. बाजारपेठेतील स्पर्धा, ग्राहकांच्या आवडी-निवडीतील बदल, सरकारी धोरणे, तंत्रज्ञानातील बदल इत्यादी.

**३. योग्य निर्णय**

उद्योजकाला योग्य वेळी, योग्य निर्णय घ्यावे लागतात. उत्पादनाचे घटक, भांडवल, तंत्रज्ञान, विपणन व्यवस्थापन इत्यादीबाबत घेतलेल्या योग्य निर्णयांवर उद्योगाचे यश अवलंबून असते.

**४. गतिमान प्रक्रिया**

परिस्थिती व काळानुसार उद्योजकतेमध्ये बदल होत असल्यामुळे उद्योजकता ही गतिमान प्रक्रिया आहे.

**५. संधी ओळखण्याची क्षमता**

उद्योजकतेत नवनवीन व्यवसाय संधींचा शोध घ्यावा लागतो.

**६. संघटनप्रक्रिया व व्यवस्थापन**

नवनवीन उपक्रम सुरू करताना विविध घटकांचे कार्यक्षमतेने संघटन व व्यवस्थापन करावे लागते.

थोडक्यात कोणत्याही अर्थव्यवस्थेत उद्योजकतेच्या विकासाद्वारे नवनिर्मितीला चालना मिळते. देशातील भौतिक व मानवी साधनसंपत्तीचा कार्यक्षमतेने वापर करता येतो. उद्योजकतेमुळे देशात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन बेरोजगारीचे प्रमाण कमी होते. भांडवल निर्मितीचा वेग वाढतो. दुर्मिळ साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर करता येतो. रोजगार निर्मिती झाल्यामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. परिणामी त्यांची वस्तू सेवा खरेदी करण्याची क्षमता वाढून लोकांच्या राहणीमान पातळीत वाढ होते. नाविन्यपूर्ण वस्तूंच्या निर्मितीसाठी संशोधनाला चालना मिळते. तसेच प्रादेशिक संतुलित विकास होऊ लागतो.

**स्टार्टअप परिसंस्था : भारताच्या प्रगतीला चालना देणारी महत्त्वपूर्ण परिसंस्था :**

स्टार्टअप म्हणजे एक नव्याने स्थापन झालेली कंपनी, जी विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात असते आणि प्रस्थापित उद्योगांमध्ये बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने नाविण्यपूर्ण उत्पादने किंवा सेवा तयार करण्यावर लक्ष केंद्रित करते. (Mahesh V. R. Dr. Vinay S., 2025)

भारतात दिनांक १६ जानेवारी २०१६ रोजी वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाने सुरू केलेला स्टार्टअप इंडिया उपक्रम देशाच्या आर्थिक वाढ आणि रोजगार निर्मितीचे एक नवीन इंजिन बनला आहे. भारतीय स्टार्टअप्सनी १६ हजार ४००हून अधिक नवीन पेटंट अर्ज दाखल केले आहेत. २०१६मध्ये देशाच्या केवळ चार राज्यांमध्ये असलेली स्टार्टअप प्रणाली आज भारताच्या जवळपास सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये असल्याचे आढळते. भारत ही जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था असल्याचे म्हटले जात असून १००हून अधिक युनिकॉर्न (एक अब्ज डॉलरपेक्षा जास्त मूल्यांकनासह कंपन्या) आहेत.

**स्टार्टअप आणि रोजगार निर्मिती**

स्टार्टअप्स मोठ्या प्रमाणात नोकऱ्या निर्माण करत आहेत. स्टार्टअप्सद्वारे निर्माण झालेल्या रोजगाराच्या संख्येत २०१७ मध्ये ४३ हजार, २०१८ मध्ये ८८ हजार, २०२१ मध्ये १ लाख ९८ हजार, २०२२ मध्ये २ लाख ६९ हजारपर्यंत वाढ झाल्याचे आढळून आले.

**स्टार्टअप्स आणि संशोधन**

संशोधन हा स्टार्टअप्सचा पाया असून ते नवीन कल्पनांना व्यवहारिक उत्पादनांमध्ये रूपांतरित करण्यास मदत करते. कृषी तंत्रज्ञान, एआय आणि आरोग्य याक्षेत्रांमध्ये वैज्ञानिक संशोधनावर आधारित स्टार्टअप्सना मोठी मागणी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

असल्याचे आढळते. स्टार्टअपच्या यशासाठी तांत्रिक संशोधन आवश्यक असून उद्योजकीय संस्कृती समजून घेणे आवश्यक ठरते.

**स्टार्टअप आणि उद्योग समूह**

वाणिज्य मंत्रालयाच्या अहवालानुसार भारतातील ५९० जिल्ह्यांमध्ये किमान एक नोंदणीकृत स्टार्टअप आहे. भारतातील स्टार्टअप मुख्यत्वे महानगरांमध्ये विशेषतः दिल्ली, बंगळूर आणि मुंबईत केंद्रीत आहेत. २०१८ ते २०२० दरम्यान सुरू करण्यात आलेल्या स्टार्टअपमध्ये या क्षेत्रांचा वाटा ८३% असून ९२% निधी उभारण्यात आला.

**भारतातील स्टार्टअप परिसंस्थेला पाठिंबा देणारे समुदाय :**

भारतात CII (Confederation of Indian Industry), TiE (The Indus Entrepreneurs), NASSCOM (National Association of Software and Service Companies), Indian Start-ups, Entrepreneurs Association of India, Start-up India Hub असे महत्त्वपूर्ण समुदाय भारतीय स्टार्टअप परिसंस्थेला सक्रियपणे पाठिंबा देत आहेत. सर्व उद्योजकांना यशस्वी होण्यासाठी मदत करणाऱ्या या समुदायांच्या देशभरात आणि जगभरात शाखा आहेत.

**स्टार्टअपसाठी सरकारी उपक्रम आणि सहाय्य :**

**१. स्टार्टअप इंडिया स्पीड फंड योजना (STSFS)**

२०२१ मध्ये सुरू झालेल्या या योजनेचा उद्देश विकासाच्या विविध टप्प्यांवरील उद्योगांना पाठिंबा देऊन भारताच्या नाविण्यपूर्ण स्टार्टअप परिसंस्थेला चालना देणे हा आहे. या योजनेसाठी ९४५ कोटी निधी असून हा निधी सुरुवातीच्या संकल्पनांची पडताळणी करणे, प्रारंभिक प्रोटोटाईप तयार करणे, उत्पादनाच्या चाचणी घेणे, बाजारात प्रवेश सुलभ करणे, व्यावसायिक कार्यांचा विस्तार करणे इत्यादींसाठी सहाय्य करतो. २०२४च्या अखेरीस या उपक्रमांतर्गत वितरित केलेल्या ४६७ कोटी रुपये निधीचा लाभ २६२२ हून अधिक उदयोन्मुख स्टार्टअप्सना झाला आहे.

**२. स्टार्टअप्ससाठी क्रेडिट गॅरंटी योजना (CGSS)**

भारत सरकारने DPIIT द्वारे मान्यताप्राप्त स्टार्टअप्सना क्रेडिट गॅरंटी देण्यासाठी एक स्वतंत्र निधी तयार करण्याच्या उद्देशाने क्रेडिट गॅरंटी योजना सुरू केली. या योजनेने अनुसूचित व्यावसायिक बँका, गैर-बँकिंग वित्तीय कंपन्या आणि SEBI अंतर्गत नोंदणीकृत पर्यायी गुंतवणूक निधीमधील व्हेंचर डेट फंडांना स्टार्टअप्सना कर्ज देण्याची परवानगी दिली. जानेवारी २०२५पर्यंत स्टार्टअप इंडिया सीड फंड योजनेने २०९ कोटी रुपये रकमेची कर्जे दिली आहेत. या योजनेमुळे तरुण कंपन्यांना वित्तीय संस्थांकडून निधी मिळण्यास मदत झाली असून अनेक नाविण्यपूर्ण कल्पनांना व्यवसायिक रूप मिळाले आहे.

**३. स्टार्टअप्ससाठी निधी योजना (FFS)**

स्टार्टअप्ससाठी हा एक प्रमुख उपक्रम आहे. त्याचे व्यवस्थापन SEBI द्वारे केले जाते. २०१६ मध्ये १० हजार कोटी रुपयेच्या निधीसह स्टार्टअप्स निधी योजना स्थापन झाली. ही योजना स्टार्टअप्ससाठी देशांतर्गत भांडवलाची उपलब्धता वाढवते. ही योजना SEBI- नोंदणीकृत पर्यायी गुंतवणूक निधींना भांडवल पुरवते. देशांतर्गत जोखीम भांडवल उपलब्धता वाढवणे आणि उद्योग परिसंस्था मजबूत करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. या योजनेद्वारे १३७०हून अधिक स्टार्टअप्समध्ये २५,५०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली आहे.

**४. स्टार्टअप्स इंडिया हब**

भारतीय उद्योजक परिसंस्थेतील सर्व भागधारकांना एकमेकांना जोडले जाण्यासाठी आणि संवाद साधण्यासाठी स्टार्टअप इंडिया हब हे महत्त्वपूर्ण डिजिटल व्यासपीठ आहे. हे व्यासपीठ निधी संस्था, शैक्षणिक संस्था, कॉर्पोरेट्स आणि शासकीय विभागांना एकत्र आणून भारतीय नवोद्योजकांना सहाय्य करते.

**५. राज्य स्टार्टअप क्रमवारी आराखडा (SRF)**

स्पर्धात्मक संघराज्यवादाला प्रोत्साहन मिळण्यासाठी राज्य स्टार्टअप क्रमवारी आराखडाअंतर्गत राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे त्यांच्या स्टार्टअप अनुकूल धोरणे आणि अंमलबजावणीच्या आधारावर मूल्यांकन केले जाते. ज्यामुळे भारताची उद्योजक परिसंस्था मजबूत करता येईल. या आराखड्यानुसार सर्वोत्तम कामगिरी करणारे, शीर्ष कामगिरी करणारे, अग्रणी, उदयोन्मुख अग्रणी आणि नव्याने विकसित होणाऱ्या स्टार्टअप परिसंस्था यांसारख्या श्रेणींमध्ये राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे वर्गीकरण केले जाते. ज्यामुळे स्टार्टअप उपक्रमांमध्ये निरोगी स्पर्धा निर्माण होऊन सुधारणेस प्रोत्साहन मिळते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

**६. राष्ट्रीय मार्गदर्शन पोर्टल (MAARG)**

देशभरातील स्टार्टअप्सना सहज मार्गदर्शन उपलब्ध व्हावे यासाठी मेंटॉरशीप, ॲडव्हायझरी, असिस्टन्स अँड ग्रोथ हा कार्यक्रम विकसित करण्यात आला आहे. देशभरातील उद्योजकांना अनुभवी मार्गदर्शकांशी जोडून स्टार्टअप्सच्या वाढीस पाठिंबा देणे, धोरणात्मक मार्गदर्शन करणे व उद्योजक संस्था परिसंस्थांना मजबूत करणे हा या पोर्टलचा मुख्य उद्देश आहे.

थोडक्यात स्टार्टअप इंडिया उपक्रमाच्या नऊ वर्षांच्या पूर्तीनंतर मान्यताप्राप्त स्टार्टअपच्या वाढत्या संख्येमुळे भारताने जागतिक उद्योजकतेचे केंद्र म्हणून आपला दर्जा निश्चित केला आहे. स्टार्टअप्स उपक्रमामुळे नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असल्यामुळे आणि सर्वसमावेशक उद्योजक संस्कृतीला चालना मिळाल्याने स्टार्टअप इंडिया उपक्रम भारतीय अर्थव्यवस्थेच्या वृद्धीचा कणा बनला आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

1. Exploring India's dynamic Start-up Ecosystem . (2024). Retrieved From https://assets.kpmg.com/content/dam/kpmgsites/in/pdf/2024/12/exploring-indias-dynamic-start-up-ecosystem.pdf
2. Deepak Kumar Adhana, Alisha Kumar. (2020 ). START-UP ECOSYSTEM IN INDIA: A STUDY WITH FOCUS ON ENTREPRENEURSHIP AND UNIVERSITY BUSINESS INCUBATORS . AEGAEUM JOURNAL, 8(9), 754- 772. Retrieved from https://www.researchgate.net/publication/347014151_Start-Up_Ecosystem_in_India_A_Study_With_Focus_on_Entrepreneurship_and_University_Business_Incubators
3. India, T. &. (2024). Entrepreneurship- Concept, Functions, Need And It's Relevance in Indian Society. TAXMANN. Retrieved from https://www.taxmann.com/post/blog/entrepreneurship-concept-functions-need-and-its-relevance-in-indian-society
4. Mahesh V. R. Dr. Vinay S. (2025, June ). EXPLORING THE NEW DYNAMICS OF STARTUP ECOSYSTEMS IN INDIA:TRENDS AND INNOVATIONS. Adarsh Journal of Management Research, 17(1), 80-90. Retrieved from https://www.adarshjournals.in/index.php/ajmr/article/view/173255
5. Maheshwari, G. (2023, December). Startups and New Entrepreneurship in India | Volume , Issue | Page no. IJCRT, 11(12), a954-a972. Retrieved from https://ijcrt.org/papers/IJCRT2312111.pdf

**संकेतस्थळे :**

1. नवोन्मेषाचा विस्तार, भारताच्या विकास गाथेला आकार देत आहे.
https://www.pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=2215775&reg=6&lang=11
2. नवोन्मेष आणि भारताच्या प्रगतीला चालना देणारी 'स्टार्टअप्स' परिसंस्था
https://www.mahamtb.com/Encyc/2026/1/16/indias-startup-journey-from-vision-to-global-impact.html
3. भारताच्या स्टार्टअप परिसंस्थेचे विश्लेषण
https://www.orfonline.org/marathi/expert-speak/decoding-india-s-startup-ecosystem0
4. उद्योजक समुदाय आणि भारतीय स्टार्टअप संस्कृती
https://ciiblog.in/entrepreneurial-communities-and-indian-startup-culture/
5. भारताच्या आर्थिक विकासात स्टार्टअप्सची भूमिका
https://www.ibef.org/blogs/the-role-of-startups-in-india-s-economic-growth

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# ग्रामीण उपजीविकेमध्ये महिला शेतकरी आणि लिंगाधारित भूमिका

(Women Farmers and Gender Roles in Rural Livelihoods)

**डॉ. रेखा दत्तात्रय आपटे**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांगली.
**Email** - rekhadeodhar55@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180207
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 30-34
February - 2026
**Submitted:** 15 Jan. 2026
**Revised:** 25 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***सारांश :***

*भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेती हा कणा मानला जातो आणि या शेतीव्यवस्थेत महिलांचे योगदान केवळ श्रमापुरते मर्यादित नसून ते बहुआयामी स्वरूपाचे आहे. बीजरोपण, रोपांची लागवड, तणनियंत्रण, कापणी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, अन्नप्रक्रिया, पाणी व इंधन संकलन अशा विविध टप्प्यांवर महिला सक्रिय भूमिका बजावतात. अनेकदा घरगुती जबाबदाऱ्या आणि शेतीकाम यांचा दुहेरी भार महिलांवर येतो, तरीही त्यांच्या श्रमांना औपचारिक मान्यता मिळत नाही. ग्रामीण भागात महिलांचे काम बहुतेक वेळा 'अदृश्य श्रम' म्हणून गणले जाते, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक योगदानाचे योग्य मूल्यमापन होत नाही. परिणामी, शेती उत्पादन वाढविण्यातील त्यांचा वाटा असूनही सामाजिक प्रतिष्ठा, निर्णयप्रक्रियेत सहभाग आणि संसाधनांवर नियंत्रण यामध्ये त्या मागे राहतात.*

*लिंगाधारित भूमिका आणि सामाजिक-सांस्कृतिक रचना यांचा ग्रामीण उपजीविकेच्या संपूर्ण व्यवस्थेवर खोलवर प्रभाव पडतो. जमीन मालकी, कर्जसुविधा, आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि कृषीविषयक माहिती यांपर्यंत महिलांचा मर्यादित प्रवेश ही मोठी अडचण ठरते. या पार्श्वभूमीवर महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण हे शाश्वत ग्रामीण विकासासाठी अत्यावश्यक आहे. धोरणात्मक हस्तक्षेपांद्वारे महिलांना मालकी हक्क, आर्थिक स्वावलंबन, निर्णयप्रक्रियेत समान सहभाग आणि कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध करून दिल्यास शेतीक्षेत्र अधिक समावेशक आणि उत्पादक बनू शकते. त्यामुळे महिला सक्षमीकरण, लिंगसमता आणि ग्रामीण विकास यांमधील परस्परसंबंध समजून घेणे हे केवळ सामाजिक न्यायासाठीच नव्हे, तर दीर्घकालीन आर्थिक व पर्यावरणीय शाश्वततेसाठीही महत्त्वाचे ठरते.*

***महत्वाचे शब्द (Keywords):*** *महिला शेतकरी, ग्रामीण उपजीविका, लिंगाधारित भूमिका, महिला सक्षमीकरण, शेती व विकास, सामाजिक-आर्थिक स्थिती*

**प्रस्तावना :**

भारत हा कृषिप्रधान देश असून ग्रामीण भागातील शेती व शेतीपूरक व्यवसाय हेच बहुसंख्य लोकसंख्येच्या उपजीविकेचे मुख्य साधन आहेत. या व्यवस्थेमध्ये महिलांचे योगदान अत्यंत व्यापक आणि महत्त्वाचे आहे. बी पेरणी, रोपांची लागवड, तण काढणे, कापणी, पशुपालन, दुग्धव्यवसाय तसेच अन्नप्रक्रिया यांसारख्या अनेक श्रमप्रधान कामांमध्ये महिला मोठ्या प्रमाणावर सहभागी असतात. तरीदेखील त्यांच्या कामाकडे अनेकदा "घरगुती मदत" किंवा "अदृश्य श्रम" म्हणून पाहिले जाते, ज्यामुळे त्यांची स्वतंत्र शेतकरी म्हणून ओळख निर्माण होत नाही. पुरुषप्रधान सामाजिक रचना आणि पितृसत्ताक मूल्यांमुळे महिलांचे श्रम औपचारिक अर्थव्यवस्थेत नोंदले जात नाहीत,

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. रेखा दत्तात्रय आपटे, सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांगली.*

**How to cite this article:**
*आपटे. रेखा. दत्तात्रय. (2026). ग्रामीण उपजीविकेमध्ये महिला शेतकरी आणि लिंगाधारित भूमिका (Women Farmers and Gender Roles in Rural Livelihoods). Journal of Research and Development, 18(2(XIX)), 30–34. https://doi.org/10.5281/zenodo.19325919*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19325919
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

परिणामी त्यांच्या योगदानाचे सामाजिक व आर्थिक मूल्यमापन होत नाही.

ग्रामीण उपजीविकेमधील लिंगाधारित भूमिका या परंपरा, संस्कृती, सामाजिक संकेत आणि आर्थिक संरचनेतून निर्माण झालेल्या आहेत. महिलांना प्रामुख्याने कष्टाची, वेळखाऊ कामे दिली जातात, तर जमीन मालकी, निर्णयप्रक्रिया, कर्जव्यवस्था आणि बाजाराशी संबंधित व्यवहारांवर पुरुषांचे नियंत्रण राहते. या असमानतेमुळे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनावर मर्यादा येतात तसेच त्यांना आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि शासकीय योजनांचा पुरेसा लाभ मिळत नाही. त्यामुळे महिला शेतकऱ्यांची भूमिका, त्यांच्या समोर असलेल्या सामाजिक-आर्थिक अडचणी आणि त्यांच्यासाठी उपलब्ध संधी यांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते. अशा अभ्यासातून लिंगसमतेच्या दिशेने धोरणात्मक उपाययोजना सुचविता येतील आणि ग्रामीण विकास अधिक समावेशक व शाश्वत होण्यास मदत होईल. या पार्श्वभूमीवर महिला शेतकऱ्यांची भूमिका, त्यांच्यासमोरील अडचणी आणि संधी यांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

- **महिला शेतकऱ्यांची संकल्पना व व्याख्या :**

**महिला शेतकरी म्हणजे केवळ शेतात काम करणारी स्त्री नव्हे, तर शेतीशी निगडित सर्व उपजीविका क्रियाकलापांमध्ये सक्रिय सहभाग घेणारी स्त्री होय.**

महिला शेतकरी ही संकल्पना केवळ शेतात प्रत्यक्ष श्रम करणाऱ्या स्त्रीपुरती मर्यादित नसून ती शेतीशी संबंधित सर्व उपजीविका क्रियाकलापांमध्ये सक्रिय सहभाग घेणाऱ्या स्त्रीचा व्यापक अर्थ व्यक्त करते. पीक लागवड, कापणी, तणनियंत्रण यांसारखी प्रत्यक्ष शेतीकामे तसेच पशुपालन, दुग्धव्यवसाय, अन्न साठवण व प्रक्रिया, बी-बियाण्यांचे संवर्धन आणि विविध शेतीपूरक उद्योगांमध्ये महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. या सर्व कार्यांमुळे शेती उत्पादनाची साखळी अखंडित राहते आणि ग्रामीण कुटुंबांच्या अन्नसुरक्षा व उत्पन्ननिर्मितीत महिलांचे मोलाचे योगदान दिसून येते. अनेक वेळा महिलांकडे पारंपरिक ज्ञान, स्थानिक संसाधनांचे व्यवस्थापन आणि शाश्वत शेती पद्धतींचा अनुभव असतो, जो शेतीच्या दीर्घकालीन विकासासाठी उपयुक्त ठरतो.

- **ग्रामीण उपजीविकेची रचना आणि लिंगाधारित विभागणी :**

ग्रामीण उपजीविका ही बहुआयामी स्वरूपाची असून त्यामध्ये शेती, रोजंदारी मजुरी, हस्तकला, वनउपज संकलन, पशुपालन व शेतीपूरक व्यवसायांचा समावेश होतो. या सर्व उपजीविका क्रियाकलापांमध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर आढळतो. तथापि, लिंगाधारित कामांची विभागणी स्पष्टपणे दिसून येते. महिलांना प्रामुख्याने कमी मोबदला असलेली, श्रमप्रधान व वेळखाऊ कामे दिली जातात, तर पुरुष यांत्रिकीकरणाशी संबंधित, तांत्रिक निर्णय घेणारी आणि बाजारव्यवहाराशी निगडित कामे करतात. त्यामुळे उत्पन्ननिर्मितीच्या महत्त्वाच्या स्रोतांवर पुरुषांचे वर्चस्व राहते.

याशिवाय महिलांवर घरकाम आणि शेतीकाम अशी दुहेरी जबाबदारी असते, ज्यामुळे त्यांचा दैनंदिन कामाचा कालावधी पुरुषांच्या तुलनेत अधिक असतो. पाणी आणणे, इंधन गोळा करणे, स्वयंपाक, मुलांची देखभाल यांसोबतच शेतीतील विविध कामे महिलांना करावी लागतात. तरीदेखील या सर्व श्रमांना सामाजिक व आर्थिक पातळीवर अपेक्षित मान्यता मिळत नाही. परिणामी महिलांचे श्रम 'स्वाभाविक' किंवा 'घरगुती' म्हणून गृहीत धरले जातात, ज्यामुळे त्यांच्या कष्टांचे मूल्यांकन होत नाही आणि ग्रामीण विकास प्रक्रियेत त्यांचा सहभाग दुय्यम ठरतो.

- **शेती क्षेत्रातील महिलांचे योगदान :**

शेती क्षेत्रात महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे व व्यापक आहे. बी पेरणी व रोप लावणीपासून ते तण काढणे, कापणी व मळणीपर्यंत बहुतांश कामांमध्ये महिला सक्रिय सहभाग घेतात. या कामांसाठी मेहनत, संयम आणि कौशल्य लागते, जे महिला मोठ्या जबाबदारीने पार पाडतात. तसेच पशुखाद्य संकलन, जनावरांची देखभाल आणि दुग्ध उत्पादन ही कामेही प्रामुख्याने महिलाच करतात. ग्रामीण भागात कुटुंबाच्या उपजीविकेसाठी शेती आणि पशुपालन या दोन्ही क्षेत्रांचा समतोल सांभाळण्याचे काम महिला समर्थपणे करतात.

अनेक अभ्यासांनुसार भारतातील एकूण शेती श्रमशक्तीपैकी सुमारे ४० ते ५० टक्के हिस्सा महिलांचा आहे. तरीही त्यांचे योगदान अनेकदा अधिकृत आकडेवारीत किंवा धोरणात्मक निर्णयांमध्ये योग्य प्रकारे नोंदवले जात नाही. महिलांना शेतमजूर म्हणून ओळख मिळत नाही, तसेच जमीनधारणा, कर्ज, प्रशिक्षण व आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभही कमी प्रमाणात मिळतो. त्यामुळे शेती क्षेत्राचा खरा विकास साधायचा असेल, तर महिलांच्या कामाची दखल घेणे, त्यांना समान संधी देणे आणि त्यांच्या योगदानाला योग्य मान्यता देणे अत्यावश्यक आहे.

- **जमीनधारणा आणि मालकी हक्कातील असमानता :**

महिला शेतकऱ्यांसमोरील सर्वात मोठी आणि मूलभूत समस्या म्हणजे जमीनधारणेचा अभाव होय. बहुतांश वेळा महिला प्रत्यक्ष शेतीकाम करत असल्या तरी जमिनीची मालकी त्यांच्या नावावर नसते. यामुळे त्यांना अधिकृतरीत्या "शेतकरी" म्हणून ओळख

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

मिळत नाही. जमीन मालकी नसल्याने बँकांकडून कर्ज मिळवणे कठीण होते, कारण कर्जासाठी जमीन ही हमी म्हणून आवश्यक असते. परिणामी महिलांना सावकारांवर अवलंबून राहावे लागते, ज्यामुळे त्यांचे आर्थिक शोषण होण्याची शक्यता वाढते.

जमीनधारणेच्या अभावामुळे महिला शेतकऱ्या अनेक शासकीय योजना, अनुदाने, पीकविमा आणि प्रशिक्षण कार्यक्रमांपासून वंचित राहतात. तसेच कुटुंबातील व शेतीसंबंधी निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग मर्यादित राहतो. जमीन मालकी ही महिलांच्या सक्षमीकरणाची किल्ली मानली जाते, कारण ती आत्मविश्वास, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक प्रतिष्ठा देते. महिलांच्या नावावर जमीन असल्यास त्या आर्थिकदृष्ट्या अधिक स्वतंत्र बनू शकतात आणि शेती विकासात प्रभावी भूमिका बजावू शकतात.

- **लिंगभेद आणि सामाजिक-सांस्कृतिक अडथळे :**

ग्रामीण समाजात खोलवर रुजलेले लिंगभेद महिलांच्या सर्वांगीण प्रगतीस मोठा अडथळा ठरतात. याचे विविध स्वरूप खालील मुद्द्यांतून स्पष्ट होते :

**मुख्य अडथळे:**

- शिक्षणातील असमानता – मुलांच्या तुलनेत मुलींचे शिक्षण लवकर थांबवले जाते.
- बालविवाह – कमी वयात लग्न झाल्यामुळे शिक्षण, आरोग्य व करिअरवर परिणाम होतो.
- आरोग्य सुविधांचा अभाव – महिलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते.
- पुरुषसत्ताक निर्णयप्रणाली – कुटुंब व समाजातील निर्णय प्रामुख्याने पुरुष घेतात.

या सामाजिक-सांस्कृतिक अडथळ्यांमुळे महिलांना स्वतःच्या क्षमतांचा विकास करण्याची संधी मिळत नाही. शिक्षणातील असमानतेमुळे महिलांना माहिती, तंत्रज्ञान आणि रोजगाराच्या संधींपासून दूर ठेवले जाते. बालविवाहामुळे महिलांवर लवकर जबाबदाऱ्या येतात, ज्याचा त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. आरोग्य सुविधांचा अभाव असल्याने कुपोषण, आजारपण आणि मातृमृत्यूचे प्रमाण वाढते.

पुरुषसत्ताक निर्णयप्रणालीमुळे महिलांच्या मतांना महत्त्व दिले जात नाही. घरकाम, शेतीकाम आणि कुटुंबाची काळजी घेणे ही कामे महिलांचे "नैसर्गिक कर्तव्य" म्हणून पाहिली जातात, त्यामुळे त्यांच्या श्रमाचे आर्थिक किंवा सामाजिक मूल्यांकन होत नाही. परिणामी महिला मेहनत करूनही अदृश्य राहतात. या अडथळ्यांवर मात करण्यासाठी लिंगसमता, शिक्षण, जागृती आणि महिलांच्या हक्कांना प्रोत्साहन देणे अत्यंत आवश्यक आहे.

**महिला शेतकरी आणि आर्थिक सक्षमीकरण :**

आर्थिक सक्षमीकरण म्हणजे केवळ उत्पन्न मिळवणे नव्हे, तर त्या उत्पन्नावर महिलांचे नियंत्रण असणे, बचत करण्याची सवय, गुंतवणुकीचे निर्णय घेण्याची क्षमता आणि आर्थिक बाबींमध्ये स्वायत्तता मिळवणे होय. आर्थिकदृष्ट्या सक्षम महिला कुटुंबाच्या तसेच समाजाच्या विकासात सक्रिय सहभाग घेऊ शकते. यामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्या स्वतःच्या गरजा व हक्कांसाठी ठामपणे उभ्या राहू शकतात.

**महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वाची साधने :**

- स्वयंसहायता गट (SHG) – बचत, कर्ज व परस्पर सहकार्याची संधी
- सूक्ष्म वित्तपुरवठा – कमी व्याजदरात आर्थिक मदत
- महिला उत्पादक कंपन्या – उत्पादन, प्रक्रिया व विक्रीत सहभाग

स्वयंसहायता गट, सूक्ष्म वित्तपुरवठा आणि महिला उत्पादक कंपन्यांमुळे महिलांना विविध उत्पन्ननिर्मितीच्या संधी उपलब्ध होतात. शेतीपूरक व्यवसाय, लघुउद्योग, हस्तकला, दुग्ध व्यवसाय यांसारख्या उपक्रमांमुळे महिलांचे नियमित उत्पन्न वाढते. या माध्यमातून महिलांना आर्थिक व्यवहारांचे ज्ञान मिळते, तसेच नेतृत्व कौशल्य आणि संघटन क्षमता विकसित होते.

या प्रक्रियेमुळे महिलांमध्ये सामाजिक आत्मविश्वास निर्माण होतो. त्या केवळ कुटुंबापुरत्याच मर्यादित न राहता ग्रामसभा, स्थानिक संस्था आणि विकास प्रक्रियेत सहभाग घेऊ लागतात. आर्थिक सक्षमीकरणामुळे महिलांचा दर्जा उंचावतो आणि समाजात त्यांना सन्मानाची व समानतेची वागणूक मिळण्यास मदत होते. त्यामुळे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण हे शाश्वत व समावेशक विकासाचे महत्त्वपूर्ण पाऊल ठरते.

**तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि महिलांचा सहभाग :**

हरितक्रांतीनंतर शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला. सुधारित बियाणे, यांत्रिकीकरण, सिंचन व्यवस्था, कीटकनाशके, तसेच डिजिटल तंत्रज्ञानामुळे शेती उत्पादनात वाढ झाली. मात्र या प्रगतीचा लाभ सर्वांपर्यंत समानरीत्या पोहोचलेला नाही. विशेषतः महिला शेतकरी आणि शेतमजूर या तंत्रज्ञानाच्या प्रवाहापासून अनेकदा दूर राहिलेल्या दिसून येतात.

**महिलांना भेडसावणाऱ्या अडचणी :**

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

• कृषी प्रशिक्षणाची कमतरता – महिलांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमांचा अभाव
• माहितीपर्यंत मर्यादित प्रवेश – बाजारभाव, योजना व नवतंत्रज्ञानाची माहिती कमी मिळणे
• डिजिटल दरी (Digital Divide) – मोबाईल, इंटरनेट व डिजिटल साक्षरतेचा अभाव

कृषी विस्तार सेवा व प्रशिक्षण कार्यक्रम बहुतेक वेळा पुरुषकेंद्रित असतात, त्यामुळे महिलांना आधुनिक शेतीतंत्राचे ज्ञान मिळत नाही. माहितीच्या अभावामुळे महिला पारंपरिक पद्धतींवर अवलंबून राहतात, ज्याचा त्यांच्या उत्पादनक्षमतेवर परिणाम होतो. तसेच डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर असूनही महिलांकडे स्मार्टफोन, इंटरनेट किंवा डिजिटल कौशल्ये नसल्याने त्या अनेक शासकीय योजना, ऑनलाइन सेवा आणि बाजाराशी जोडल्या जात नाहीत.

या डिजिटल दरीमुळे तंत्रज्ञानाचा लाभ महिलांपर्यंत पोहोचत नाही आणि शेतीतील लिंगभेद अधिक तीव्र होतो. महिलांसाठी स्वतंत्र प्रशिक्षण, स्थानिक भाषेत माहिती, आणि डिजिटल साक्षरता कार्यक्रम राबविल्यास ही दरी कमी होऊ शकते. महिलांना तंत्रज्ञानाशी जोडणे हे शेतीच्या शाश्वत विकासासाठी आणि महिला सक्षमीकरणासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**सरकारी धोरणे आणि महिला शेतकरी :**

भारत सरकारने महिला शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवल्या आहेत:

1. राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान
2. महिला किसान सशक्तीकरण योजना
3. स्वयं सहायता गट आधारित कार्यक्रम

तथापि, अंमलबजावणीतील त्रुटींमुळे अपेक्षित परिणाम दिसून येत नाहीत.

- **शाश्वत ग्रामीण विकासात महिलांची भूमिका :**

भारत सरकारने महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत त्यांचा सहभाग वाढवण्यासाठी विविध योजना सुरू केल्या आहेत. या योजनांचा उद्देश महिलांना आर्थिक, सामाजिक व तांत्रिकदृष्ट्या सक्षम करणे हा आहे. स्वयंरोजगार, उत्पन्नवाढ, कौशल्य विकास आणि संघटन यांवर या योजनांचा भर असतो.

**महत्वाच्या शासकीय योजना :**

- राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (NRLM) – स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून रोजगार व उत्पन्ननिर्मिती
- महिला किसान सशक्तीकरण योजना (MKSP) – महिला शेतकऱ्यांना प्रशिक्षण, तंत्रज्ञान व शेतीपूरक उपक्रमांची मदत
- स्वयं सहायता गट आधारित कार्यक्रम – बचत, कर्ज व नेतृत्व विकासाला प्रोत्साहन

या योजनांमुळे अनेक महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी, आर्थिक मदत आणि संघटनाची ताकद मिळाली आहे. महिलांना शेतीपूरक व्यवसाय, पशुपालन, दुग्ध व्यवसाय, प्रक्रिया उद्योग यांसारख्या क्षेत्रांत सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करण्यात येतो. यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता विकसित होण्यास मदत होते.

तथापि, या योजनांच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी दिसून येतात. योग्य माहितीचा अभाव, प्रशिक्षणाची मर्यादा, प्रशासकीय अडथळे आणि स्थानिक पातळीवरील उदासीनता यांमुळे अपेक्षित परिणाम साध्य होत नाहीत. काही वेळा योजना कागदोपत्रीच मर्यादित राहतात. त्यामुळे योजनांची प्रभावी अंमलबजावणी, महिलांपर्यंत थेट पोहोच, आणि स्थानिक गरजांनुसार सुधारणा करणे आवश्यक आहे. असे केल्यास महिला शेतकऱ्यांचे खरे सक्षमीकरण साध्य होऊ शकते.

**निष्कर्ष :**

ग्रामीण उपजीविकेमध्ये महिला शेतकरी या केवळ सहाय्यक घटक नसून शेतीव्यवस्थेच्या केंद्रस्थानी आहेत. बी पेरणी, रोपलागवड, तणनियंत्रण, कापणी, पशुपालन, दुग्धव्यवसाय, अन्नप्रक्रिया तसेच पाणी-इंधन संकलन यांसारख्या विविध कामांमध्ये महिलांचा सक्रिय व सातत्यपूर्ण सहभाग असतो. यासोबतच घरगुती जबाबदाऱ्या सांभाळण्याचा दुहेरी भार महिलांवर येतो. तरीही पितृसत्ताक सामाजिक रचना, लिंगाधारित कामवाटप आणि पारंपरिक सामाजिक दृष्टिकोनामुळे महिलांचे श्रम “नैसर्गिक” किंवा “घरगुती” मानले जातात. परिणामी त्यांच्या श्रमांचे आर्थिक मूल्यमापन होत नाही आणि त्यांची स्वतंत्र शेतकरी म्हणून ओळख निर्माण होत नाही. जमीन मालकीचा अभाव, कर्ज व संसाधनांवर मर्यादित नियंत्रण, शिक्षण व प्रशिक्षणातील असमानता आणि तंत्रज्ञानापर्यंत अपुरा प्रवेश यांमुळे महिला शेतकऱ्यांची पूर्ण क्षमता वापरात येत नाही, हे या अभ्यासातून अधोरेखित होते.

महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण हे केवळ सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट नसून शाश्वत ग्रामीण विकासाची मूलभूत अट आहे. महिलांना जमीन मालकी हक्क, आर्थिक स्वावलंबन, आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल साक्षरता, कौशल्यविकास आणि निर्णयप्रक्रियेत समान सहभाग मिळाल्यास शेती उत्पादनक्षमता वाढू शकते आणि ग्रामीण कुटुंबांची अन्नसुरक्षा अधिक भक्कम होऊ शकते. स्वयंसहायता गट,

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

महिला उत्पादक कंपन्या आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी ही या दृष्टीने महत्त्वाची साधने ठरू शकतात. तसेच धोरणात्मक पातळीवर लिंगसमतेचा दृष्टिकोन स्वीकारून महिलाकेंद्रित प्रशिक्षण, माहितीप्रसार आणि संसाधनवाटप केल्यास ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक समावेशक, समताधिष्ठित आणि शाश्वत बनू शकते. त्यामुळे महिला शेतकरी, लिंगाधारित भूमिका आणि ग्रामीण उपजीविका यांचा परस्परसंबंध समजून घेणे हे दीर्घकालीन आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय विकासासाठी अत्यंत आवश्यक ठरते.

**संदर्भ :**

1. स्वामिनाथन, एम. एस. (२००५) – *हरितक्रांती ते सदाहरित क्रांती*, अकॅडमिक फाउंडेशन.
2. केळकर, गोपिका (२००९) – *आशियातील शेतीचे स्त्रीकरण*, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP).
3. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालय (NSSO) (२०१४) – *भारतामधील रोजगार व बेरोजगारी परिस्थिती*, सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय.
4. भारत सरकार (२०१९) – *महिला शेतकरी व कृषी विकास*, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली.
5. अग्रवाल, बीना (१९९४) – *दक्षिण आशियातील जमीन हक्क आणि लिंगसमता*, केंब्रिज विद्यापीठ प्रकाशन.
6. अन्न व कृषी संघटना (FAO) (२०११) – *शेतीतील महिला : लिंगदरी कमी करून विकास साधणे*, संयुक्त राष्ट्र संघ.
7. राव, नित्या (२०१२) – *महिलांचा जमिनीवरील हक्क : आशियाई दृष्टिकोन*, आशिया-पॅसिफिक विकास जर्नल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# सिनेमा, डिजिटल मीडिया और समाज(Cinema, Digital Media and Society)

**माधुरी परशुराम कांबळे**
सहयोगी प्राध्यापक – हिंदी
श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांगली
**ई–मेल:** madhurikamble.29@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180208
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 35-39
February - 2026

**Submitted:** 15 Jan. 2026
**Revised:** 25 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***सारांश (Abstract) :***

*समकालीन समाज में सिनेमा और डिजिटल मीडिया केवल मनोरंजन या सूचना संप्रेषण के साधन नहीं रह गए हैं, बल्कि वे सामाजिक चेतना, सांस्कृतिक राजनीति, पहचान निर्माण तथा लोकतांत्रिक विमर्श के प्रभावशाली माध्यम बन चुके हैं। बीसवीं शताब्दी में सिनेमा ने औद्योगिक आधुनिकता, राष्ट्रवाद और सामाजिक असमानताओं को दृश्यात्मक रूप प्रदान किया, जबकि इक्कीसवीं शताब्दी में डिजिटल मीडिया ने संचार की गति, पहुँच और भागीदारी को अभूतपूर्व रूप से विस्तारित किया है। सोशल मीडिया, ओटीटी प्लेटफॉर्म, मोबाइल तकनीक और एल्गोरिदमिक संरचनाओं ने न केवल सिनेमा के निर्माण और वितरण को बदला है, बल्कि दर्शक की भूमिका को भी निष्क्रिय उपभोक्ता से सक्रिय सहभागी में रूपांतरित किया है।*

*यह शोध लेख सिनेमा, डिजिटल मीडिया और समाज के अंतर्संबंधों का आलोचनात्मक एवं विश्लेषणात्मक अध्ययन प्रस्तुत करता है। अध्ययन का उद्देश्य यह समझना है कि किस प्रकार सिनेमा सामाजिक यथार्थ का प्रतिनिधित्व करता है और डिजिटल मीडिया उस प्रतिनिधित्व को पुनर्परिभाषित, चुनौती या विस्तार देता है। मैनुअल कास्टेल्स के नेटवर्क समाज सिद्धांत, स्टुअर्ट हॉल की सांस्कृतिक पहचान की अवधारणा, नील पोस्टमैन की तकनीकी आलोचना तथा आंद्रे बाज़ां और सत्यजीत रे के फिल्म-सिद्धांतों के आलोक में यह लेख यह तर्क प्रस्तुत करता है कि डिजिटल युग में सिनेमा सामाजिक विमर्श का केन्द्रीय मंच बन गया है। साथ ही, फेक न्यूज़, एल्गोरिदमिक नियंत्रण, निगरानी संस्कृति और सांस्कृतिक एकरूपता जैसी चुनौतियों का भी समालोचनात्मक मूल्यांकन किया गया है।*

***बीज शब्द :*** *सिनेमा, डिजिटल मीडिया, समाज, संस्कृति, OTT प्लेटफॉर्म, सोशल मीडिया, पहचान, वैश्वीकरण*

**परिचय :**

सिनेमा और समाज के बीच का संबंध केवल प्रतिनिधित्व तक सीमित नहीं है, बल्कि वह सामाजिक चेतना के निर्माण और पुनर्निर्माण की प्रक्रिया से गहराई से जुड़ा हुआ है। **समाजशास्त्री पीयर बोरद्यू के अनुसार, "सांस्कृतिक उत्पाद केवल मनोरंजन नहीं होते, वे सामाजिक शक्ति-संरचनाओं को वैधता भी प्रदान करते हैं।"** *(1)* इस दृष्टि से सिनेमा को एक ऐसे वैचारिक उपकरण के रूप में देखा जा सकता है जो जाति, वर्ग, लिंग और सत्ता-संबंधों को दृश्यात्मक रूप प्रदान करता है।

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*माधुरी परशुराम कांबळे ,सहयोगी प्राध्यापक – हिंदी,श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांगली*

**How to cite this article:**
*कांबळे. माधुरी. परशुराम. (2026). सिनेमा, डिजिटल मीडिया और समाज (Cinema, Digital Media and Society). Journal of Research and Development, 18(2(XIX)), 35–39. https://doi.org/10.5281/zenodo.19325961*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19325961
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

हिंदी सिनेमा के संदर्भ में श्याम बेनेगल और गोविंद निहलानी जैसे फिल्मकारों का कार्य इस बात का प्रमाण है कि सिनेमा सामाजिक यथार्थ की आलोचनात्मक व्याख्या कर सकता है, न कि केवल उसका सरलीकृत प्रतिबिंब प्रस्तुत करता है।

डिजिटल मीडिया के आगमन ने इस सिनेमा–समाज संबंध को एक नई विमर्शात्मक दिशा दी है। मार्शल मैकलुहान का प्रसिद्ध कथन, "माध्यम ही संदेश है," डिजिटल युग में और अधिक प्रासंगिक हो जाता है, क्योंकि अब कंटेंट से अधिक उसका प्लेटफॉर्म सामाजिक व्यवहार को आकार देता है। सोशल मीडिया, ओटीटी प्लेटफॉर्म और यूज़र-जेनरेटेड कंटेंट ने दर्शक को केवल उपभोक्ता नहीं, बल्कि सहभागी (participant) बना दिया है। ***विशेषज्ञ हेनरी जेनकिंस के अनुसार,* "डिजिटल संस्कृति सहभागिता की संस्कृति है, जहाँ दर्शक अर्थ-निर्माण की प्रक्रिया में सक्रिय भूमिका निभाता है।"** (2) इससे सिनेमा का प्रभाव एकरेखीय न रहकर बहुदिशात्मक हो गया है।

राजनीतिक और वैचारिक दृष्टि से देखा जाए तो सिनेमा और डिजिटल मीडिया आज प्रतिरोध, असहमति और वैकल्पिक आख्यानों के सशक्त मंच बन चुके हैं। ***मिशेल फ़ूको के सत्ता–विमर्श सिद्धांत के अनुसार,* जहाँ सत्ता होती है, वहाँ प्रतिरोध भी जन्म लेता है।**(3) डिजिटल स्पेस ने उन आवाज़ों को दृश्यता प्रदान की है जिन्हें पारंपरिक मीडिया लंबे समय तक हाशिये पर रखता रहा। दलित सिनेमा, स्त्रीवादी फिल्में और वैकल्पिक डॉक्यूमेंट्रीज़ इसी प्रक्रिया का परिणाम हैं। इस प्रकार सिनेमा और डिजिटल मीडिया न केवल समाज को प्रतिबिंबित करते हैं, बल्कि सामाजिक चेतना, राजनीतिक विमर्श और सांस्कृतिक पहचान के निर्माण में सक्रिय हस्तक्षेप भी करते हैं।

**सिनेमा और समाज :**

सिनेमा और समाज के संबंध पर वैश्विक स्तर पर व्यापक शोध कार्य हुआ है। ***आंद्रे बाज़ां (1967)*** ने सिनेमा को यथार्थवादी कला के रूप में परिभाषित किया, जबकि सर्गेई आइज़नस्टीन ने इसे वैचारिक मोंटाज का माध्यम माना। भारतीय संदर्भ में ***सत्यजीत रे (1976)*** ने सिनेमा की सामाजिक जिम्मेदारी पर बल दिया।

डिजिटल मीडिया के संदर्भ में ***मैनुअल कास्टेल्स (1996)*** का नेटवर्क समाज सिद्धांत अत्यंत महत्वपूर्ण है, जो यह स्पष्ट करता है कि आधुनिक समाज में शक्ति और संचार नेटवर्क्स के माध्यम से संचालित होती है। ***स्टुअर्ट हॉल (1990)*** ने सांस्कृतिक पहचान को एक गतिशील प्रक्रिया बताया, जो मीडिया प्रतिनिधित्व के माध्यम से निरंतर पुनर्निर्मित होती है। नील ***पोस्टमैन (1992)*** ने तकनीक-प्रधान संस्कृति की आलोचना करते हुए चेतावनी दी कि तकनीक जब संस्कृति पर हावी हो जाती है, तब वह लोकतांत्रिक मूल्यों के लिए खतरा बन जाती है।

यह अध्ययन मूलतः गुणात्मक और सैद्धांतिक विश्लेषण पर आधारित है, क्योंकि सिनेमा और डिजिटल मीडिया जैसे सांस्कृतिक माध्यमों को मात्र सांख्यिकीय आँकड़ों के आधार पर नहीं समझा जा सकता। इसी दृष्टिकोण के अंतर्गत चयनित फिल्मों और ओटीटी कंटेंट का पाठ्य (textual) तथा वैचारिक (ideological) विश्लेषण किया गया है, जिससे यह स्पष्ट हो सके कि ये माध्यम किस प्रकार सामाजिक संरचनाओं, पहचान और सत्ता-संबंधों को रूपायित करते हैं। यह पद्धति शोधकर्ता को अर्थ, प्रतीकों और प्रतिनिधित्व की गहराई तक पहुँचने में सक्षम बनाती है।

इसके अतिरिक्त, डिजिटल अभियानों और ऑनलाइन विमर्शों के अध्ययन के लिए द्वितीयक स्रोतों—जैसे पुस्तकें, शोध लेख और संस्थागत रिपोर्ट्स—का सहारा लिया गया है। ***स्टुअर्ट हॉल के प्रतिनिधित्व सिद्धांत के अनुसार,* "मीडिया वास्तविकता को प्रतिबिंबित नहीं करता, बल्कि उसका निर्माण करता है।"** *(3)* इस सिद्धांत को आधार बनाकर यह विश्लेषण किया गया है कि डिजिटल मीडिया में प्रसारित कथ्य किस प्रकार सामाजिक विचारधाराओं को सुदृढ़ या चुनौती देते हैं। समाजशास्त्रीय और सांस्कृतिक अध्ययन के क्षेत्र में यह पद्धति व्यापक रूप से स्वीकार्य है, क्योंकि यह शोध को केवल वर्णनात्मक न बनाकर आलोचनात्मक और व्याख्यात्मक स्वर प्रदान करती है।

**उद्देश्य :**

1. सिनेमा और डिजिटल मीडिया के सामाजिक प्रभावों का विश्लेषण करना।
2. डिजिटल युग में सिनेमा की बदलती भूमिका को समझना।
3. पहचान निर्माण और सांस्कृतिक राजनीति में मीडिया की भूमिका का अध्ययन करना।
4. डिजिटल मीडिया से जुड़ी सामाजिक चुनौतियों का आलोचनात्मक मूल्यांकन करना।

**सामाजिक प्रतिनिधित्व के रूप में सिनेमा :**

सिनेमा सामाजिक प्रतिनिधित्व का एक सशक्त माध्यम है, जो समाज की जटिल संरचनाओं—वर्ग, जाति, लिंग और सत्ता-संबंधों—को कथा और दृश्यात्मक भाषा के माध्यम से अभिव्यक्त करता है। ***फिल्म सिद्धांतकार स्टुअर्ट हॉल के अनुसार,* "प्रतिनिधित्व केवल यथार्थ का प्रतिबिंब नहीं, बल्कि अर्थ-निर्माण की एक सक्रिय प्रक्रिया है।"**(4) इस संदर्भ में भारतीय सिनेमा की यथार्थवादी परंपरा विशेष

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

रूप से उल्लेखनीय है। बिमल रॉय की *दो बीघा ज़मीन* वर्ग-संघर्ष और किसान की त्रासदी को उजागर करती है, जबकि श्याम बेनेगल की *अंकुर* सामंती सत्ता और जातीय उत्पीड़न की संरचनाओं को प्रश्नांकित करती है। ये फिल्में दर्शक को केवल देखने का अनुभव नहीं करातीं, बल्कि सामाजिक चेतना के स्तर पर हस्तक्षेप करती हैं।

इसी प्रकार, **सत्यजीत रे की *पाथेर पांचाली*** ग्रामीण जीवन के संघर्षों को मानवीय संवेदनशीलता के साथ प्रस्तुत करती है, जो सिनेमा को सामाजिक दस्तावेज़ के रूप में स्थापित करती है। स्वयं **सत्यजीत रे** का यह कथन कि **"एक ईमानदार फिल्मकार अपने समाज की सच्चाइयों से मुँह नहीं मोड़ सकता,"**[5] सिनेमा की सामाजिक जिम्मेदारी को स्पष्ट करता है। फिल्म आलोचक आंद्रे बाज़ां भी मानते हैं कि यथार्थवादी सिनेमा दर्शक को सामाजिक यथार्थ से नैतिक और बौद्धिक संवाद में संलग्न करता है। इस प्रकार, सिनेमा केवल मनोरंजन का माध्यम न होकर सामाजिक संरचनाओं की आलोचनात्मक व्याख्या और पुनर्पाठ का प्रभावी औज़ार बन जाता है।

**डिजिटल मीडिया और नेटवर्क :**

डिजिटल मीडिया ने पारंपरिक संचार संरचनाओं को तोड़ते हुए सूचना के प्रवाह को विकेंद्रीकृत किया है, जिससे अभिव्यक्ति के नए सार्वजनिक क्षेत्र (public sphere) का निर्माण हुआ है। सोशल मीडिया प्लेटफॉर्म्स ने आम नागरिक को केवल सूचना का उपभोक्ता न रखकर उसे सक्रिय वक्ता और विमर्श-निर्माता बना दिया है। ***मैनुअल कास्टेल्स के अनुसार,* "नेटवर्क समाज में सत्ता का मूल स्रोत सूचना के प्रवाह को आकार देने और नियंत्रित करने की क्षमता में निहित होता है।"** [6] इस संदर्भ में डिजिटल मीडिया लोकतांत्रिक संभावनाओं को विस्तार देता है, क्योंकि हाशिये पर स्थित समूह अब अपनी आवाज़ को व्यापक दर्शक-समूह तक पहुँचा सकते हैं।

हालाँकि, यह विकेंद्रीकरण पूर्णतः मुक्त नहीं है, बल्कि इसके भीतर नए प्रकार के नियंत्रण और निगरानी की संरचनाएँ भी निहित हैं। ***शोषाना ज़ुबॉफ़ के 'निगरानी पूँजीवाद' सिद्धांत के अनुसार,* "डिजिटल प्लेटफॉर्म मानव व्यवहार को डेटा में बदलकर उसे आर्थिक और राजनीतिक नियंत्रण के साधन के रूप में उपयोग करते हैं।"**[7] एल्गोरिदमिक फिल्टर, डेटा मॉनिटरिंग और प्लेटफॉर्म-केंद्रित सत्ता नेटवर्क समाज में अभिव्यक्ति की स्वतंत्रता को सूक्ष्म रूप से सीमित करते हैं। इस प्रकार डिजिटल मीडिया एक द्वंद्वात्मक स्थिति उत्पन्न करता है—जहाँ एक ओर लोकतांत्रिक भागीदारी के नए अवसर जन्म लेते हैं, वहीं दूसरी ओर सत्ता के नए, अदृश्य रूप भी विकसित होते हैं।

**सिनेमा और ओटीटी प्लेटफॉर्म :**

ओटीटी (Over-The-Top) प्लेटफॉर्म्स के उदय ने सिनेमा के वितरण तंत्र और दर्शक अनुभव दोनों को मूलतः पुनर्परिभाषित किया है। पारंपरिक थिएटर-केंद्रित व्यवस्था के विपरीत, ओटीटी ने समय, स्थान और सेंसरशिप की सीमाओं को आंशिक रूप से शिथिल किया है। ***मीडिया विद्वान हेनरी जेनकिंस के अनुसार,* "डिजिटल प्लेटफॉर्म्स ने कंटेंट उपभोग को एकरेखीय प्रक्रिया से सहभागितामूलक अनुभव में बदल दिया है।"**[2*] इस परिवर्तन ने दर्शकों को चयन की स्वतंत्रता दी है, वहीं फिल्मकारों को कथ्य, शैली और विषय-वस्तु के साथ प्रयोग करने का नया अवसर प्रदान किया है।

इसके परिणामस्वरूप क्षेत्रीय और वैकल्पिक सिनेमा को वैश्विक दृश्यता प्राप्त हुई है, जो पहले मुख्यधारा वितरण प्रणालियों से वंचित रहता था। तेलुगु, मराठी, मलयालम और अन्य क्षेत्रीय भाषाओं की फिल्में अब अंतरराष्ट्रीय दर्शकों तक पहुँच रही हैं, जिससे सांस्कृतिक बहुलता को बढ़ावा मिला है। ***फिल्म समीक्षक गायत्री चक्रवर्ती स्पिवाक* के प्रतिनिधित्व विमर्श के संदर्भ में कहा जा सकता है कि "जब हाशिये की आवाज़ें मंच पाती हैं, तब सांस्कृतिक लोकतंत्र सशक्त होता है।"** [8] इस प्रकार ओटीटी प्लेटफॉर्म्स न केवल सिनेमा के उपभोग के स्वरूप को बदल रहे हैं, बल्कि सांस्कृतिक पहचान और वैकल्पिक आख्यानों के विस्तार में भी महत्वपूर्ण भूमिका निभा रहे हैं।

**युवा और डिजिटल संस्कृति की पहचान :**

डिजिटल मीडिया के प्रसार ने पहचान-निर्माण की प्रक्रिया को निजी अनुभव से निकालकर सार्वजनिक और संवादात्मक क्षेत्र में स्थापित कर दिया है, विशेषतः युवाओं के संदर्भ में। ***समाजशास्त्री एंथनी गिडेंस का मानना है कि* "आधुनिकता में आत्म-पहचान एक सतत आत्मपरियोजना है, जिसे व्यक्ति सामाजिक संवादों के माध्यम से निरंतर पुनर्गठित करता है।"**[9] फिल्मों, वेब-सीरीज़ और सोशल मीडिया पर प्रसारित कथाएँ, जीवन-शैलियाँ और सांस्कृतिक प्रतीक युवा वर्ग के लिए आदर्श और प्रतिरूप का कार्य करते हैं। इन माध्यमों के ज़रिये युवा अपनी आकांक्षाओं, लैंगिक पहचान, वर्गीय स्थिति और सांस्कृतिक संबद्धता को अभिव्यक्त करते हैं, जिससे डिजिटल संस्कृति उन्हें दृश्यता और आत्म-अभिव्यक्ति का अवसर प्रदान करती है।

परंतु यह प्रक्रिया केवल सशक्तिकरण तक सीमित नहीं रहती, बल्कि इसके साथ उपभोक्तावादी दबाव और सांस्कृतिक मानकीकरण भी जुड़ जाते हैं। ***ज़िग्मंट बॉमन के अनुसार,* "उपभोक्ता समाज में पहचान एक स्थायी अवस्था नहीं, बल्कि बाज़ार द्वारा लगातार निर्मित की जाने वाली वस्तु बन जाती है।"**[10] सोशल मीडिया प्लेटफॉर्म्स पर लाइक्स, फॉलोअर्स और ट्रेंड्स युवाओं को

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

तुलनात्मक प्रतिस्पर्धा और ब्रांड-केंद्रित जीवन-शैली की ओर प्रेरित करते हैं। इस प्रकार डिजिटल मीडिया एक द्वंद्वात्मक भूमिका निभाता है—जहाँ एक ओर वह युवा पहचान को सशक्त करता है, वहीं दूसरी ओर उसे बाज़ारवादी अपेक्षाओं और सांस्कृतिक दबावों के अधीन भी कर देता है।

**चुनौतियाँ :**

डिजिटल मीडिया के विस्तार के साथ अनेक गंभीर चुनौतियाँ और चिंताएँ भी उभरकर सामने आई हैं, जिनमें फेक न्यूज़ का प्रसार, एल्गोरिदमिक पक्षपात, निगरानी संस्कृति और निजता का हनन प्रमुख हैं। सूचना समाज के संदर्भ में नील पोस्टमैन की तकनीकी आलोचना आज पहले से कहीं अधिक प्रासंगिक प्रतीत होती है। ***पोस्टमैन का यह कथन कि* "तकनीक हर समस्या का समाधान नहीं, बल्कि वह नई समस्याओं को जन्म देने की क्षमता भी रखती है,"** *(11)* डिजिटल मीडिया के वर्तमान परिदृश्य को सटीक रूप से रेखांकित करता है। सोशल मीडिया प्लेटफॉर्म्स पर असत्यापित सूचनाएँ न केवल जनमत को प्रभावित करती हैं, बल्कि लोकतांत्रिक विमर्श की गुणवत्ता को भी कमजोर करती हैं।

इसके अतिरिक्त, एल्गोरिदमिक संरचनाएँ सूचना के चयन और प्रसार में अदृश्य पक्षपात को बढ़ावा देती हैं, जिससे वैचारिक ध्रुवीकरण और 'इको-चैंबर' की स्थिति उत्पन्न होती है। ***शोषाना ज़ुबॉफ़ के अनुसार,* "निगरानी पूँजीवाद में व्यक्तिगत डेटा सत्ता और मुनाफ़े का मुख्य स्रोत बन जाता है।"** *(7)* इस संदर्भ में निजता का हनन केवल व्यक्तिगत समस्या न रहकर एक सामाजिक और राजनीतिक चिंता बन जाता है। डिजिटल मीडिया इस प्रकार एक द्वंद्वात्मक स्थिति निर्मित करता है—जहाँ वह सूचना और अभिव्यक्ति की स्वतंत्रता का विस्तार करता है, वहीं साथ-साथ नियंत्रण, निगरानी और असमान शक्ति-संबंधों को भी सुदृढ़ करता है।

**निष्कर्ष :**

इस अध्ययन से यह स्पष्ट होता है कि सिनेमा और डिजिटल मीडिया समाज के केवल दर्पण मात्र नहीं हैं, बल्कि वे सामाजिक चेतना, सांस्कृतिक पहचान और सत्ता-संबंधों के निर्माण में सक्रिय हस्तक्षेप करते हैं। सिनेमा वर्ग, जाति, लिंग और सत्ता जैसी सामाजिक संरचनाओं को कथा और दृश्यात्मक भाषा के माध्यम से रूपायित कर सामाजिक यथार्थ की आलोचनात्मक व्याख्या प्रस्तुत करता है। वहीं डिजिटल मीडिया ने संचार के विकेंद्रीकरण के माध्यम से बहु-स्वरीय सार्वजनिक विमर्श को जन्म दिया है, जहाँ हाशिये पर स्थित समूहों को भी अपनी आवाज़ रखने का अवसर मिला है। ओटीटी प्लेटफॉर्म्स ने सिनेमा के वितरण और उपभोग के स्वरूप को बदलते हुए क्षेत्रीय और वैकल्पिक सिनेमा को वैश्विक मंच प्रदान किया है, जिससे सांस्कृतिक बहुलता और प्रतिनिधित्व की संभावनाएँ सुदृढ़ हुई हैं।

साथ ही यह अध्ययन यह भी रेखांकित करता है कि डिजिटल युग में सशक्तिकरण के साथ नई चुनौतियाँ और चिंताएँ भी उत्पन्न हुई हैं। युवाओं में पहचान-निर्माण की प्रक्रिया सार्वजनिक और संवादात्मक तो हुई है, किंतु वह उपभोक्तावादी दबावों, एल्गोरिदमिक नियंत्रण और सांस्कृतिक मानकीकरण से भी प्रभावित हो रही है। फेक न्यूज़, निगरानी संस्कृति और निजता के हनन जैसी समस्याएँ लोकतांत्रिक विमर्श के लिए गंभीर चुनौती प्रस्तुत करती हैं। इस प्रकार सिनेमा और डिजिटल मीडिया एक द्वंद्वात्मक भूमिका निभाते हैं—जहाँ वे सामाजिक परिवर्तन, अभिव्यक्ति और सांस्कृतिक लोकतंत्र को सशक्त करते हैं, वहीं साथ-साथ नई असमानताओं और नियंत्रण की संरचनाओं को भी जन्म देते हैं। इसलिए इन्हें आलोचनात्मक, समाजशास्त्रीय और सांस्कृतिक दृष्टि से समझना अत्यंत आवश्यक है।

**संदर्भ सूची :**

1. **बोरद्यू, पीयर.** (1984). *डिस्टिंक्शन: ए सोशल क्रिटिक ऑफ द जजमेंट ऑफ टेस्ट.* कैम्ब्रिज: हार्वर्ड यूनिवर्सिटी प्रेस.
2. **जेनकिंस, हेनरी.** (2006). *कन्वर्जेंस कल्चर: वेयर ओल्ड एंड न्यू मीडिया कोलाइड.* न्यूयॉर्क: न्यूयॉर्क यूनिवर्सिटी प्रेस.
3. **फूको, मिशेल.** (1977). *डिसिप्लिन एंड पनिश: द बर्थ ऑफ द प्रिजन.* न्यूयॉर्क: विंटेज बुक्स.
4. **हॉल, स्टुअर्ट.** (1997). *रिप्रजेंटेशन: कल्चरल रिप्रेजेंटेशन एंड सिग्निफाइंग प्रैक्टिसेस.* लंदन: सेज पब्लिकेशंस.
5. **रे, सत्यजीत.** (1976). *आवर फिल्म्स, देयर फिल्म्स.* कोलकाता: ओरिएंट लॉन्गमेन.
6. **कास्टेल्स, मैनुअल.** (1996). *द राइज ऑफ द नेटवर्क सोसाइटी.* ऑक्सफोर्ड: ब्लैकवेल.
7. **जुबॉफ़, शोषाना.** (2019). *द एज ऑफ सरवेलेन्स कैपिटलिज्म.* न्यूयॉर्क: पब्लिक अफेयर्स.
8. **स्पिवाक, गायत्री चक्रवर्ती.** (1988). *कैन द सबाल्टर्न स्पीक?.* शिकागो: यूनिवर्सिटी ऑफ इलिनोइस प्रेस.
9. **गिडेंस, एंथनी.** (1991). *मॉडर्निटी एंड सेल्फ-आइडेंटिटी: सेल्फ एंड सोसाइटी इन द लेट मॉडर्न एज.* स्टैनफोर्ड: स्टैनफोर्ड यूनिवर्सिटी प्रेस.
10. **बॉमन, ज़िग्मंट.** (2000). *लिक्विड मॉडर्निटी.* कैम्ब्रिज: पॉलिटी प्रेस.
11. **पॉस्टमैन, नील.** (1992). *टेक्नोपोली: द सरेंडर ऑफ कल्चर टू टेक्नोलॉजी.* न्यूयॉर्क: विंटेज बुक्स.

12. **आईज़नस्टीन, सर्गेई.** (1949). *फिल्म फॉर्म: Essays in Film Theory*. न्यूयॉर्क: हारकोर्ट ब्रेस.

13. **बाज़ां, आंद्रे.** (1967). *व्हाट इज सिनेमा?* (खंड 1). बर्कले: यूनिवर्सिटी ऑफ कैलिफोर्निया प्रेस.

14. **मैकलुहान, मार्शल.** (1964). *अंडरस्टैंडिंग मीडिया: द एक्सटेंशन ऑफ मैन*. न्यूयॉर्क: मैकग्रा-हिल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# स्पर्धा परीक्षांच्या यशामध्ये महाविद्यालयीन ग्रंथालयाची भूमिका आणि विद्यार्थांचे अभ्यासाचे नियोजन : एक अभ्यास

**सुभाष एकनाथ निकम[1] डॉ.दादासाहेब आर.पवार[2]**
[1]शिक्षणशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ, छ.संभाजीनगर
[2]सहाय्यक प्राध्यापक, ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालय, ता. सोयगाव जि. छ. संभाजीनगर
**Email:** subhashnikam124@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180209
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 40-42
February - 2026
**Submitted:** 15 Jan. 2026
**Revised:** 25 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***सारांश :***

*महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षा अभ्यासाचे नियोजन आणि स्पर्धा परीक्षा अभ्यासासाठी ग्रंथालयाची भूमिका या विषय या पेपर मध्ये अभ्यास करण्यात आला आहे.स्पर्धा परीक्षा विषय संदर्भ साहित्य मोठ्या प्रमाणात महाविद्यालयीन ग्रंथालयात उपलब्धत असतात. या संशोधन कार्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. माहिती संकलित करण्यासाठी विद्यार्थी प्रश्नावली या साधनाचा वापर करण्यात आला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी,ग्रंथालय आणि स्पर्धा परीक्षा या विषय १२५ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकिडून प्रश्नावली या साधनाद्वारे माहिती संकलित करण्यात आली. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून निष्कर्ष काढण्यात आले. निष्कर्षावरून असे लक्षात येते की, बहुसंख्य विद्यार्थी अभ्यासाचे नियोजन करून अभ्यासासाठी महाविद्यालयीन ग्रंथालयाचा उपयोग करतात.*

***कीवर्ड :*** *स्पर्धा परीक्षा,महाविद्यालय, ग्रंथालय,विद्यार्थी, अभ्यास, नियोजन*

**प्रस्तावना :**

आजच्या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थ्यांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत आहे. समाजात बेरोजगारीचे प्रमाण वाढल्यामुळे विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत आहे. स्पर्धा परीक्षा अभ्यासासाठी विद्यार्थी महाविद्यालयातील ग्रंथालयाचा अभ्यासासाठी उपयोग करत आहे. कुटुंबाची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे आणि स्पर्धा परीक्षांसाठी लागणारे साहित्य विद्यार्थी खरेदी करू शकत नाही. त्यामुळे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी महाविद्यालयातील ग्रंथालयाचा उपयोग अभ्यासासाठी मोठ्या प्रमाणात करतात. ग्रंथालयात स्पर्धा परीक्षा अभ्यासाठी मोठ्या प्रमाणात स्पर्धा परीक्षेविषय संदर्भ मिळतात. त्यामुळे स्पर्धा परीक्षेच्या यशामध्ये ग्रंथालयाची भूमिका खूप महत्वाची आहे. आज अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षा अभ्यासासाठी ग्रंथालयाचा वापर करतात. ग्रंथालय हे ज्ञानाचें भांडार आहे. त्याचा उपयोग कसा करायचा हे विद्यार्थ्याने ठरवले पाहिजेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षेसाठी अभ्यासाचे नियोजन कसे आहेत. आणि तो अभ्यासासाठी ग्रंथालयाचा किती उपयोग करतो हे अभ्यासण्यासाठी प्रश्नावली या साधनाद्वारे माहिती संकलित करण्यात आली.

**संशोधांचे उदिष्टे :**

१. स्पर्धा परीक्षा तयारीसाठी ग्रंथालयातील साधन सामुग्रीचा अभ्यास करणे.
२. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या नियोजनात ग्रंथालयातील वातावरणाचा होणारा परिणाम तपासणे.
३. ग्रंथालयात असणाऱ्या असणाऱ्या सोयी सुविधामधील त्रुटी शोधणे आणि उपाय योजना सुचविणे.

**गृहीतके :**

- महाविद्यातील ग्रंथालयातील संदर्भग्रंथ आणि मासिके विद्यार्थ्यांच्या यशात महत्वाची भूमिका बजावतात.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*सुभाष एकनाथ निकम,शिक्षणशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ, छ.संभाजीनगर*

**How to cite this article:**
निकम. सुभाष. एकनाथ. & पवार. दादासाहेब. आर. (2026). स्पर्धा परीक्षांच्या यशामध्ये महाविद्यालयीन ग्रंथालयाची भूमिका आणि विद्यार्थांचे अभ्यासाचे नियोजन: एक अभ्यास. Journal of Research and Development, 18(2(XIX)), 40–42. https://doi.org/10.5281/zenodo.19326002

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19326002
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

- जे विद्यार्थी ग्रंथालयाचा नियमितपणे अभ्यासासाठी उपयोग करतात त्यांचे अभ्यासाचे नियोजन अधिक शिस्तबद्ध असते.

**परिकल्पना :**

१. स्पर्धा परीक्षा अभ्यास तयारीसाठी महाविद्यालयातील ग्रंथालयात साधनसामुग्री उपलब्ध आहे.

२. स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाचे विद्यार्थी नियोजन करतात.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची साधने :**

प्रस्तुत संशोधन कार्याची माहिती संकलित करण्यासाठी विद्यार्थी प्रश्नावली या साधनाचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाचा न्यादर्श :**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी छत्रपती संभाजीनगर शहरातील पदवी महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे करणारे १२५ विद्यार्थी हा संशोधनाचा नमुना आहे.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :**

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही छत्रपती संभाजीनगर या शहरापुर्तीच मर्यादित असून छत्रपती संभाजीनगर शहरातील स्पर्धा परीक्षेच्या यशामध्ये महाविद्यालयातील ग्रंथालयाची भूमिका आणि विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे नियोजन या पुरतेच मर्यादित आहे.

**सांख्यिकीय परिमाण :**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला असून संशोधन कार्याची माहिती संकलित करण्यासाठी विद्यार्थी प्रश्नावली या संशोधन साधनांचा वापर करण्यात आला आहे. प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी या परिमाणाचा वापर करण्यात आला आहे. शेकडेवारी या सांख्यिकीय परिमाणाच्या सहाय्याने स्पर्धा परीक्षेच्या यशामध्ये महाविद्यालयातील ग्रंथालयाची भूमिका आणि विद्यार्थ्याचे अभ्यासाचे नियोजन या विषय विविध घटकांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे.

**निष्कर्ष :**

१. ८५ टक्के प्रतिसादक हे एम.पी.एस.सी.,यु.पी.एस.सी.,तलाठी,ग्रामसेवक,बँक,रेल्वे,स्टाफ सिलेक्शन कमिशन.पोलीस या स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे.

२. ७४ टक्के प्रतिसादक हे स्पर्धा परीक्षा अभ्यासासाठी पाच तास वेळ ग्रंथालया देतात.

३. ६४ टक्के प्रतिसादक यांच्या मते,महाविद्यालयातील ग्रंथालयात स्पर्धा परीक्षा अभ्यासासाठी पुरशी संदर्भ साहित्य उपलब्ध नाहीत.

४. ९५ टक्के प्रतिसादक यांच्या मते, स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी ते ग्रंथालयातील वर्तमान पत्रे,मासिके,स्पर्धा परीक्षा संदर्भ साहित्याचा अभ्यास करतात.

५. ९६ टक्के प्रतिसादक यांनी स्पर्धा परीक्षा अभ्यासाचे वेळापत्रक बनविले आहे.

६. ७८.४७ टक्के प्रतिसादक यांच्या मते,महाविद्यालयातील ग्रंथालयात इंटरनेट सुविधा नाहीत.

७. ९२ टक्के प्रतिसादक यांच्या मते,महाविद्यालयातील ग्रंथालयाचे वातावरण अभ्यास योग्य आहेत.

८. ८८.६६ प्रतिसादक यांच्या मते, ग्रंथालयाचा स्पर्धा परीक्षा अभ्यासामध्ये ७५ टक्के वाटा आहे.

**समारोप :**

प्रस्तुत संशोधनात स्पर्धा परीक्षा यशामध्ये महाविद्यालयीन ग्रंथालयाची भूमिका आणि विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे नियोजन या विषय अभ्यास करण्यात आला आहे. स्पर्धा परीक्षा या आजच्या युगात स्पर्धा परीक्षार्थी यांच्या उज्वल भविष्यासाठी महत्वाचे साधन ठरल्या आहेत. स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळवण्यासाठी महाविद्यालयातील ग्रंथालयाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. या संशोधन अभ्यासातून असे स्पष्ट होते की, योग्य अभ्यासाचे नियोजन,अभ्यासामध्ये सातत्य,सकारात्मक दृष्टीकोन,आत्मविश्वास,परिश्रम करण्याची तयारी,योग्य मार्गदर्शन आणि अभ्यास साहित्य पुरेशे उपलब्ध असेल तर स्पर्धा परीक्षेमध्ये यश येते.

**शिफारशी :**

१. महाविद्यालयातील ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.

२. ग्रंथालयात स्पर्धा परीक्षा विषय संदर्भ साहित्य उपलब्ध करून देण्यात यावी.

३. विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे नियोजन करून ग्रंथालयाचा जास्त उपयोग करावा.

**संदर्भ साहित्य :**

१. पाठक.सु.(२०१९). संशोधनशास्त्र आणि पद्धती, औरंगाबाद:चिन्मय प्रकाशन.

२. आगलावे,प्र.(२०२२). सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे,नागपूर:श्री.साईनाथ प्रकाशन.

३. देशपांडे,ली.(१९९९).सर्वेक्षण :एक संशोधन पद्धती,नाशिक :यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन.

४. महाजन,य.आणि गोरडे,म.(२०१८).अभ्यास मित्र, जळगाव : दीपस्तंभ प्रकाशन.

५. व्यवहारे,रा.बा.(२०१३). दिशा करिअरच्या,पुणे:साकेत प्रकाशन.

६. जगताप,ह.ना.(२००७).शैक्षणिक मानसशास्त्र,पुणे:नरेंद्र प्रकाशन.

७. अग्रवाल,वी.(२०१९).असा करा अभ्यास,पुणे :प्रकाशन मायमिरर पब्लिकेशन.

**मासिके :**

१. लोकराज्य

२. योजना

३. साधना

**वेबसाईट :**

https://www.mpsc.gov.in

https://www.upsc.gov.in

https://youtube.ac.in

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

## वायू प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि देखरेख तंत्रज्ञानाचा अभ्यास

**दिपाली मालू बांगारे**

(एम.ए.बी. एड इकॉनॉमिक्स) शेठ. ज. नौ. पालीवाला कॉमर्स कॉलेज, आर्ट्स आणि सायन्स कॉलेज पाली सुधागड - रायगड

**ईमेल**: bangaredipali@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180210
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 43-47
February - 2026

**Submitted:** 15 Jan. 2026
**Revised:** 25 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

**गोषवारा –**

२०१४ च्या जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार २०१२ मधील वायू प्रदूषणामुळे जगभरात सुमारे ७ दशलक्ष लोकांचा मृत्यू झाला होता. जेव्हा वातावरणात हानिकारक धन किंवा द्रव कन विषारी वायू आणि जैविक रेणू मिसळतात. आणि हलक्या नैसर्गिक गुणधर्ममध्ये बदल घडवतात तेव्हा त्याला वायुप्रदूषण असे म्हणतात. वायु प्रदूषणामुळे सजीव आणि वातावरणाला हानी पोहोचते. तसेच वायु प्रदूषणामुळे मानवामध्ये रोग, ॲलर्जी तसेच मृत्यु देखील होऊ शकतात. हे इतर सजीवांना किंवा नैसर्गिक वातावरणाला हानी पोहोचू शकते. मानवी क्रिया आणि नैसर्गिक प्रक्रिया या दोन्ही गोष्टी वायु प्रदूषण निर्माण करू शकतात. त्यामुळे पर्यावरणाचा होणारा ऱ्हास रोखण्यासाठी प्रदूषण नियंत्रणात आणणे गरजेचे आहे. प्रदूषण ही आजच्या काळातील एक खूप गंभीर समस्या बनली आहे. वाढती लोकसंख्या, वृक्षतोड, औद्योगिक कचरा, नैसर्गिक साधनसंपत्तीचा गैरवापर अश्या अनेक कारणामुळे प्रदूषण भयंकर वाढत आहे. प्रदूषण ही समस्या आता फक्त भारतापुरती मर्यादित नसून जगभरात देखील ही समस्या खूप वाढत आहे.वाढते प्रदूषण म्हणजे जीवन नष्ट करू शकतील अथवा विस्कळीत करू शकतील असे घटक वातावरण, जल आणि भूप्रदेशात मिसळणे. उदाहरणार्थ, हवेमध्ये डीझेल, पेट्रोल या इंधनातून सल्फर असलेला धूर वातावरणात मिसळतो. यामुळे वातावरणात अतिउच्च असलेल्या ओझोन वायूच्या थराला हानी पोहचून सूर्यापासून निघणारी अतिनील किरणे पृथ्वीवर नको असताना पोहचतात.

**प्रस्तावना –**

आजच्या युगात पर्यावरणीय प्रदूषण हा मानवजातीस सर्वात मोठा धोका आहे. वाढत जाणारी लोकसंख्या, नियंत्रणाबाहेर वाढत चाललेले औद्योगिक क्षेत्र आणी वाढती शहरे आणि नैसर्गिक संसाधनांचा बेजबाबदार पणे वापर यामुळे पर्यावरण दुषित होऊन जाते. प्रदूषणामुळे पर्यावरणावर घातक परिणाम होऊन पर्यावरणावर गंभीर परिणाम होतात. मानवाच्या तीन मुलभूत गरजा म्हणजे जल, जमीन आणि हवा या वेगवेगळ्या मानवी कृतींमुळे प्रदूषित होतात.भारतात गेल्या काही वर्षात वाहनांच्या संख्येत प्रचंड वाढ झाल्याने अतिसूक्ष्म धूलिकणांच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे. शास्त्रीय नियतकालिकांत प्रकाशित झालेल्या माहितीनुसार शहरातील १० मायक्रोमीटर पेक्षा लहान कणांत २.५ मायक्रोमीटरपेक्षा लहान कणांचे प्रमाण ७० टक्यांपेक्षाही जास्त आहे. हे प्रमाण दोन तीन दशकांपूर्वी ५ टक्यांपेक्षाही कमी होते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**

*दिपाली मालू बांगारे, (एम.ए.बी. एड इकॉनॉमिक्स) शेठ. ज. नौ. पालीवाला कॉमर्स कॉलेज, आर्ट्स आणि सायन्स कॉलेज पाली सुधागड - रायगड*

**How to cite this article:**

बांगारे. दिपाली. मालू. (2026). वायू प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि देखरेख तंत्रज्ञानाचा अभ्यास. Journal of Research and Development, 18(2(XIX)), 43–47. https://doi.org/10.5281/zenodo.19326048

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.19326048

OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

भारतातील सर्वच मोठी शहरे या प्रदूषणाच्या विळख्यात असून दिल्ली, कानपूर, पुणे, बंगलोर ही शहरे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांत मोडतात. सूक्ष्म व अतिसूक्ष्म धूलिकणांची आरोग्यासाठी मर्यादा काही तासांसाठी ५० पीपीएम इतकी आहे. परंतु वर नमूद केलेल्या शहरात जवळपास वर्षातील सर्वच ३६५ दिवस ही मर्यादा ५० पीपीएम पेक्षा कितीतरी पटीने अधिक होती. मानवी आरोग्यास तसेच पर्यावरणाचा अविभाज्य भाग असलेले प्राणी, पशु, पक्षी, वनस्पती तसेच इतर जीवजंतू इत्यादींना हानिकारक असलेले घटक जेव्हा हवेमध्ये मिसळल्याने त्रास होतो तेव्हा वायु प्रदूषण झाल्याचे दिसून येते. फक्त मानवी आरोग्यास हानिकारक असलेले वातावरणातील घटक वायू प्रदूषणास जबाबदार आहेत. सध्याच्या युगात हवामान बदलास जबाबदार असणारे घटक हे देखील वायु प्रदूषणाला कारणीभूत असल्याचे दिसून येते. वायु प्रदूषण नियंत्रण आणि देखरेख तंत्रज्ञान म्हणजे प्रदूषणाचे स्त्रोत शोधने आणि त्याचे प्रमाण मोजणे आणि वातावरणात मिसळण्यापूर्वी किंवा नंतर ते कमी करण्यासाठी वापरली जाणारी साधने किंवा पद्धती यांचा वापर करून मानवी आरोग्य आणि पर्यावरणाचे रक्षण करणे होय.

**उद्दिष्टे –**

1.वायू प्रदूषण म्हणजे काय त्याची संकल्पना जाणून घेणे.

2.वायू प्रदुषणाचा पर्यावरणावर कोणता परिणाम होतो याची माहिती मिळवणे.

3.वायू प्रदूषणामुळे पर्यावरणावर होणारे घातक परिणाम कमी करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाय-योजनांची माहिती घेणे.

4.वायू प्रदूषणाची करणे, आणि हवा प्रदूषण होण्यास कारणीभूत ठरणारे घटक यांची माहिती मिळवणे.

5.वायू प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने केलेल्या उपाय योजना माहिट करून घेणे.

6.वायू प्रदूषणामुळे होणाऱ्या घातक परिणामांची माहिती इतरांना करून देणे.

**तथ्य संकलन -**

संशोधन प्राप्त तथ्यांच्या आधारे सखोल अध्ययनावर आधारित आहे. तथ्य संकलनाची संशोधन कार्यामध्ये अत्यंत महत्वपूर्ण भूमिका आहे. संशोधनाचे यश त्यावर अवलंबून असते. प्रस्तुत शोध प्रबंधासाठी पुढील तथ्य संकलन स्रोतांचा आधार घेतला आहे. विषयानुसार पाण्याचा मोठ्या प्रमाणात होत असेलेल वायू प्रदूषण आणि त्यामुळे होत असलेले मानवी जीवनावर परिणाम तसेच पर्यावरणावर होणारे परिणाम यावरील माहिती मिळविण्यासाठी मी मुलाखत, प्रश्नावली व क्षेत्रभेट या कार्यपद्धतीचा अवलंब केला.पर्यावरण विषयक पुस्तकांचा आधार घेऊन प्रश्नावलीतून तयार झालेल्या मुद्यांबाबत सविस्तर माहितीचे संकलन केले.


**दुय्यम स्रोत –**

वायू प्रदूषण नियंत्रण आणि देखरेख तंत्रज्ञानाचा यावर आधारित प्रबंध, पुस्तके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, समित्यांचे अहवाल, संदर्भग्रंथ, मासिके, यांच्या आधारे माहिती संकलित केली आहे.

**वायू प्रदूषण म्हणजे काय?**

वायू प्रदूषण म्हणजे हवेतील कोणताही भौतिक, रासायनिक किंवा जैविक बदल. हानिकारक वायू, धूळ आणि धूर यांच्यामुळे हवेचे दूषित होणे, ज्यामुळे वनस्पती, प्राणी आणि मानवांवर गंभीर परिणाम होतात.

वातावरणात काही प्रमाणात वायू असतात. या वायूंच्या रचनेत वाढ किंवा घट हे जगण्यासाठी हानिकारक आहे. वायू रचनेत या असंतुलनामुळे पृथ्वीचे तापमान वाढले आहे, ज्याला जागतिक तापमानवाढ म्हणतात. वायू प्रदूषणाचा जर आपण इतिहास पहिला तर पूर्वीची वायू ही आत्ताच्या हवेपेक्षा कित्येक पटींनी शुद्ध होती. औद्योगिक क्रांतीची सुरुवात आणि त्यानंतर वाढत जाणारे उद्योग धंदे आणि मोठ्या प्रमाणवर वाढत जाणारी लोकसंख्या या लोकसंख्येला पुरवल्या जाणाऱ्या सोई सुविधा त्यासाठी तयार केली गेलीली उपकरणे यांतून दिवसेंदिवस वाढ होऊन त्यांमधून बाहेर पडणाऱ्या विविध प्रकारच्या वायूंमुळे दिवसेंदिवस पृथ्वीवरील हवा ही प्रदूषित होत चालली आहे.



Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

**वायू प्रदूषकांचे प्रकार**

वायू प्रदूषकांचे दोन प्रकार आहेत:

**प्राथमिक प्रदूषक**

थेट वायू प्रदूषणास कारणीभूत ठरणारे प्रदूषक प्राथमिक प्रदूषक म्हणून ओळखले जातात. कारखान्यांमधून उत्सर्जित होणारा सल्फर-डायऑक्साइड हा एक प्राथमिक प्रदूषक आहे.

**दुय्यम प्रदूषक**

प्राथमिक प्रदूषकांच्या मिश्रणातून आणि अभिक्रियेतून तयार होणारे प्रदूषक दुय्यम प्रदूषक म्हणून ओळखले जातात. धूर आणि धुके यांच्या मिश्रणातून तयार होणारे धुके हे दुय्यम प्रदूषक आहे.

**वायु प्रदूषणाची कारणे –**

वायू प्रदूषणाची प्रमुख कारणे म्हणजे जीवाश्म इंधनांचा (कोळसा, पेट्रोल, डिझेल) वापर, औद्योगिक उत्सर्जन, वाहनांमधून निघणारा धूर, कचरा जाळणे, खाणकाम आणि बांधकाम यांसारख्या मानवनिर्मित क्रियाकलापांमुळे हवेत कार्बन मोनोऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर डायऑक्साइड, सूक्ष्म कण आणि इतर हानिकारक वायू मिसळतात; तसेच, नैसर्गिकरित्या धूळ, ज्वालामुखीचा उद्रेक आणि वणवे यांमुळेही प्रदूषण वाढते.

**प्रमुख मानवनिर्मित कारणे:**

१) वाहतूक: वाहनांमधून कार्बन मोनॉक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, हायड्रोकार्बन्स बाहेर पडतात.
२) औद्योगिक क्रिया: कारखाने आणि वीज केंद्रांमधून कण, विषारी वायू आणि इतर प्रदूषक बाहेर टाकले जातात.
३) इंधनाचे ज्वलन: कोळसा, लाकूड आणि इतर जीवाश्म इंधने जाळल्याने प्रदूषण होते.
४) कचरा जाळणे: घरगुती आणि शेतीचा कचरा जाळल्याने धूर आणि कण हवेत मिसळतात.
५) बांधकाम आणि खाणकाम: बांधकाम आणि खाणकामातून धूळ आणि रसायने हवेत पसरतात.
६) कृषी क्रिया: शेतीत नायट्रोजनयुक्त खतांचा वापर अमोनिया वाढवतो.

**नैसर्गिक कारणे:**

१) धुळीची वादळे: वाऱ्यामुळे उडणारी धूळ.
२) ज्वालामुखीचा उद्रेक: राख आणि वायूंचे उत्सर्जन.
३) वणवे: जंगलातील आग.

**वायु प्रदूषणाचे परिणाम –**

वायुप्रदूषण कमी जास्त होण्यात हवामानाचा खूपच प्रभाव असतो. जमिनीवरील तापमान, हवेतील तापमान, वातावरणातील वरच्या भागातील तापमान इत्यादी प्रदूषण पसरवण्यात किंवा एकवटण्यात महत्त्वाची कामगिरी बजावतात. वाऱ्याचा वेग व दिशा हे त्यांत महत्त्वाचे घटक ठरतात.
उदा.मुंबईमध्ये प्रदूषक घटकांची निर्मिती जास्त असूनही प्रदूषणाची पातळी पुण्यापेक्षा बरीच कमी असते. मुंबईतील प्रदूषण समुद्रावरील वाऱ्यांमुळे बऱ्याच प्रमाणात वाहून जाते तर पुण्याच्या सभोवतालच्या टेकड्यांमुळे वाहून जाण्यात अडथळा येत असल्याने पुण्यात प्रदूषणाची पातळी जास्त असते. तसेच काही ठिकाणी प्रदूषण होत नसतानाही वाऱ्याबरोबर दुसऱ्या ठिकाणांहून प्रदूषण वाहून येते व स्रोताची जागा प्रदूषणमुक्त राहून सभोवतालचा परिसर प्रदूषणमय होऊन जातो. उदा: साखर कारखान्यांजवळचा परिसर.

**आरोग्यावरील परिणाम-**

वायुप्रदूषणाचा सर्वात घातक परिणाम श्वसनसंस्थेवर होतो. ओझोन, नायट्रोजन डायॉक्साईड. हे फुफ्फुसांवर अतिशय घातक परिणाम करतात. ओझोन फुफ्फुसांमधील पेशींना नष्ट करून फुफ्फुसे कमजोर करतो, त्यामुळे दमा वाढीस लागतो. नायट्रोजन ऑक्साईड हे श्वसन नलिकेत व फुफ्फुसांत गेल्यानंतर फुफ्फुसे व श्वसन नलिका ते विरघळवण्यासाठी जास्तीजास्त कफाची निर्मिती करतात व त्यामुळे आपणास सर्दी होते. ही सर्दी अनेक दिवसांची जुनी झाल्यास जीवाणूंचा संसर्ग होतो व परिस्थिती गंभीर होते. कार्बन मोनॉक्साईड आपल्या रक्तामध्ये ऑक्सिजन वाहण्याचे काम करणारे हिमोग्लोबिनमध्ये ऑक्सिजनऐवजी मिसळून जातो व शरीरातील सर्व भागात पोहोचतो. हा वायू अत्यंत विषारी असून काही मिनिटे सातत्याने संपर्कात आल्यास मृत्यूही ओढवू शकतो.

**निसर्गाल इतर घटकांवर परिणाम -**

केवळ मनुष्यच नव्हे तर निसर्गातील इतर घटकांवर प्रदूषणाचे विपरीत परिणाम होतात. सल्फर डायॉक्साईड व नायट्रोजन डायॉक्साईडमुळे अम्लधर्मी पावसाची निर्मिती होते व त्याचे विपरीत परिणाम जमीनीवर व पिकांवर होतो. शेतातील पिक उदा. गहू ज्वारी इतर खराब होतात असे निदर्शनात आले आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

**इतर परिणाम -**

१) रबर ओझोनच्या संपर्कात आल्यामुळे ते कडक बनते व त्याचे आयुष्य कमी होते. तसेच ओझोनच्या अस्तित्वाने कपड्यांचे रंगही / गाड्यांचे रंगही फिके होतात.

२) ताजमहाल, ग्रीसमधील अक्रोपोलिस या व जगातील इतर महत्त्वाच्या वास्तूंचे सौंदर्यदेखील वायूप्रदूषणामुळे कमी झाले आहे.

३) साध्या बांधकामाचे आयुष्य कमी होते.

४) कार्बन डायॉक्साईडच्या सातत्याच्या उत्सर्जनाने जागतिक तापमानवाढीची समस्या भेडसावणे चालू झाले आहे.

**वायू प्रदूषण नियंत्रण कायदा, १९८१ (Air Act, 1981)**

या कायद्यांतर्गत, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB) आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळे (SPCB) स्थापन करण्यात आली आहेत, ज्यांना प्रदूषण नियंत्रण क्षेत्र घोषित करण्याचे आणि मानके (standards) ठरवण्याचे अधिकार आहेत.महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना 7 सप्टेंबर 1970 रोजी झाली सुरुवातीला जल कायद्यांतर्गत, नंतर वायू कायद्याची जबाबदारी देण्यात आली.

**कायद्याचे मुख्य उद्देश -**

- वायू प्रदूषणाला प्रतिबंध करणे, त्यावर नियंत्रण ठेवणे आणि ती कमी करणे.
- वायू गुणवत्ता मानके (Air Quality Standards) निश्चित करणे.
- औद्योगिक आणि इतर स्रोतांकडून होणाऱ्या प्रदूषणाचे नियमन करणे.

**वायु प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि देखरेख तंत्रज्ञान –**

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB) ही भारताच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या अंतर्गत एक वैधानिक संस्था आहे. त्याची स्थापना १९७४ मध्ये जल (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत करण्यात आली. CPCB ला हवा प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण कायदा, १९८१ अंतर्गत अधिकार आणि कार्ये देखील सोपवण्यात आली आहेत. ते एक क्षेत्रीय निर्मिती म्हणून काम करते आणि पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या तरतुदींनुसार पर्यावरण आणि वन मंत्रालयाला तांत्रिक सेवा देखील प्रदान करते. ते तांत्रिक सहाय्य आणि मार्गदर्शन देऊन राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळांच्या क्रियाकलापांचे समन्वय साधते आणि त्यांच्यातील वादांचे निराकरण देखील करते. प्रदूषण नियंत्रण क्षेत्रातील ही देशातील सर्वोच्च संस्था आहे.

**वायु प्रदूषण नियंत्रण मंडळाची कार्ये –**

वायु प्रदूषण नियंत्रण मंडळाची कार्ये राष्ट्रीय पातळीवर आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी राज्य मंडळे म्हणून येतात. जल प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण कायदा, १९७४ आणि हवा प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण कायदा, १९८१ अंतर्गत, जल प्रदूषण रोखणे, नियंत्रण करणे आणि कमी करणे आणि हवेची गुणवत्ता सुधारणे आणि देशातील वायू प्रदूषण रोखणे, नियंत्रित करणे किंवा कमी करणे याद्वारे राज्यांच्या विविध भागातील ओढे आणि विहिरी स्वच्छतेला प्रोत्साहन देणे हे आहे.

**वायु प्रदूषण देखरेख तंत्रज्ञान –**

वायु प्रदूषण देखरेख तंत्रज्ञानामध्ये (Air Pollution Monitoring Technology) IOT (इंटरनेट ऑफ थिंग्ज), AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि प्रगत सेन्सरचा वापर करून हवेतील CO2, SO2 आणि NO2 सारखे प्रदूषक रिअल-टाइममध्ये मोजले जातात. हे तंत्रज्ञान हवेची गुणवत्ता दर्शवते. ज्यामुळे उद्योग आणि शहरांमध्ये प्रदूषण नियंत्रण आणि आरोग्यविषयक निर्णय घेणे सोपे होते.

१) IOT -आधारित सेन्सर्स: NodeMCU सारख्या उपकरणांचा वापर करून हवेच्या गुणवत्तेचा डेटा क्लाउड प्लॅटफॉर्मवर रिअल-टाइममध्ये पाठवला जातो.

२) AI आणि अंदाज (Forecasting): LSTM आणि रँडम फॉरेस्ट सारख्या AI मॉडेलचा वापर करून प्रदूषणाच्या पातळीचा आधीच अंदाज वर्तवला जातो.

३) इनडोअर आणि परिधान करण्यायोग्य (Wearable) मॉनिटर्स: श्वसनाचे विकार असलेल्यांसाठी वैयक्तिक एक्सपोजरचे सतत मूल्यांकन करण्यासाठी छोटे सेन्सर वापरले जातात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

४) औद्योगिक उत्सर्जन नियंत्रण: सायक्लोन्स, फॅब्रिक फिल्टर्स, आणि इलेक्ट्रोस्टॅटिक प्रेसिपिटेटर्सचा वापर करून कारखान्यांतून बाहेर पडणारा धूर शुद्ध केला जातो.

**वायु प्रदूषण उपायोजना –**

**वायू** प्रदूषण कमी करण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे, जीवाश्म इंधनांऐवजी अक्षय ऊर्जा वापरणे, झाडे लावणे, कचरा जाळणे टाळणे, प्रदूषण नियंत्रण नियमांची अंमलबजावणी करणे आणि घरात इको-फ्रेंडली उत्पादने वापरणे यांसारखे उपाय करता येतात; तसेच मास्क वापरणे आणि जागरूकता पसरवणे महत्त्वाचे आहे.

**व्यक्तिगत आणि घरगुती स्तरावर उपाय:**

१) वाहतूक: शक्य असल्यास सार्वजनिक वाहतूक (बस, ट्रेन) वापरा किंवा कमी अंतरासाठी पायी चालणे किंवा सायकल चालवणे उत्तम आहे.

२) ऊर्जा वापर: सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांसारख्या अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर करा.

३) कचरा व्यवस्थापन: कचरा जाळणे टाळा; लाकूड, कोळसा जाळण्याऐवजी स्वच्छ इंधनाचा वापर करा.

४) झाडे लावा: अधिकाधिक झाडे लावा, कारण ती हवा शुद्ध करण्यास मदत करतात.

५) घरातील प्रदूषण: धूप, अगरबत्ती आणि तीव्र परफ्यूमचा वापर कमी करा; कमी धूर होणाऱ्या उत्पादनांचा वापर करा.

६) मास्कचा वापर: प्रदूषित वातावरणात बाहेर पडताना N95 मास्क वापरा.

७) घरात हवा शुद्ध ठेवा: एअर प्युरिफायरचा वापर करा किंवा घरातील हवा खेळती ठेवा.

८) जागरूकता: हवा प्रदूषणाबद्दल जागरूक राहा आणि इतरांनाही सांगा.

**निष्कर्ष -**

१) **वायू** प्रदूषण म्हणजे काय त्याची संकल्पना काय आहे याबाबत माहिती मिळवली.

२) **वायू** प्रदुषणाचा पर्यावरणावर कोणता परिणाम होतो याबाबत माहिती मिळवून तिचे संकलन केले.

३**) वायू** प्रदूषणामुळे पर्यावरणावर होणारे घातक परिणाम कमी करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाय-योजनांची अधिक माहिती घेणे शक्य झाले.

४) **वायू** प्रदूषणाची करणे, आणि हवा प्रदूषण होण्यास कारणीभूत ठरणारे घटक याबबत सविस्तर माहितीचे संकलन केले.

५) **वायू** प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने केलेल्या उपाय योजना माहित करून घेतल्या.

९) आहार: बीटा-कॅरोटीनयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करा.

**सामूहिक आणि धोरणात्मक उपाय:**

१) कठोर कायद्यांची अंमलबजावणी: प्रदूषण नियंत्रण कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करा.

२) प्रदूषणकारी तंत्रज्ञान टाळा: प्रदूषण वाढवणारे तंत्रज्ञान वापरणे टाळा.

३) जुनी वाहने बाद करा: जुन्या आणि जास्त प्रदूषण करणाऱ्या वाहनांना वापरातून काढून टाका.

**संदर्भसूची –**

१) पर्यावरण - प्राकृतिक संसाधन एव प्रदूषण - पी. एन.नाटाणी , प्रकाशक - बुक एनक्लेव

२) पर्यावरण अर्थशास्त्र - प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के

स्थानपन्न कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई, प्राचार्य डॉ. अजय भामरे

स्थानपन्न प्र-कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई , प्राध्यापक प्रकाश महानवर संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

३) www.educationalmarathi.com

४) www.wikipidia.org

५) www.mazaabhyas.com

६) पर्यावरण पुस्तिका

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# महाराष्ट्रातील ऐतिहासिक लेण्यांचे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व: - एक अभ्यास

**डॉ. अंकुश मारुती सोहनी**
शेठ जे. नौ. पालीवाला महाविद्यालय पाली, सुधागड, रायगड.
**Email:** anilzende@jnpaliwala.in

**Manuscript ID:**
JRD -2026-180211
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 48-50
February - 2026
**Submitted:** 20 Jan. 2026
**Revised:** 30 Jan. 2026
**Accepted:** 15 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***सारांश***

*महाराष्ट्र राज्यात प्राचीन काळापासून कोरलेल्या लेण्यांचा समृद्ध वारसा आढळतो. अजिंठा लेणी, वेरूळ लेणी, कार्ला लेणी आणि भाजे लेणी यांसारख्या लेण्या केवळ ऐतिहासिकच नव्हे तर जागतिक पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत.*

*या लेण्या बौद्ध, हिंदू आणि जैन धर्मांच्या सांस्कृतिक व धार्मिक परंपरेचे प्रतीक आहेत. त्यांच्या भित्तिचित्रांमध्ये, शिल्पकलेत आणि स्थापत्यशैलीत प्राचीन भारतीय कलाकौशल्याचे उत्कृष्ट दर्शन घडते. विशेषतः अजिंठा लेण्यांतील चित्रकला आणि वेरूळ लेण्यांतील कैलास मंदिराची रचना जगभरातील पर्यटकांना आकर्षित करते.*

*पर्यटनाच्या दृष्टीने या लेण्यांचे महत्त्व अनेक अंगांनी दिसून येते. प्रथम, या स्थळांमुळे महाराष्ट्रात देश-विदेशातील पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर आवक होते, ज्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळते. दुसरे म्हणजे, स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती (मार्गदर्शक, हॉटेल व्यवसाय, वाहतूक सेवा) वाढते. तिसरे, या वारसास्थळांमुळे सांस्कृतिक जतन व संवर्धनाला प्रोत्साहन मिळते.*

**प्रस्तावना:**

भारत देशातील अनेक राज्यापैकी महाराष्ट्र राज्याला फार मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्रात प्राचीन मध्ययुगात व आधुनिक काळात निर्माण झालेली विविध प्रकारची विस्मयकारक लेणी, गड-किल्ले, स्मारके, सुंदर सागरी किनारे, जंगल संपत्ती, त्याचप्रमाणे वन्य जीवसृष्टी, थंड हवेची ठिकाणे, उद्याने, प्राणी संग्रहालये, वस्तुसंग्रहालये, महत्त्वाची धार्मिक स्थळे व तीर्थक्षेत्रे इत्यादींना अलीकडच्या काळात विज्ञान तंत्रज्ञांच्या युगात पर्यटनच्या दृष्टीने प्रचंड महत्त्व प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्रातील काही पर्यटन स्थळांची गांभीर्याने दखल घेऊन त्यांना युनोस्को सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेने ऐतिहासिक वारसा म्हणून घोषित केलेले आहे. महाराष्ट्रात अनेक प्रकारची जी पर्यटन स्थळे आहेत. त्यापैकी काही ठराविक पर्यटन स्थळांचा प्रस्तुत शोध निबंधामध्ये अभ्यास करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके आणि इंटरनेट सारख्या साधनांची मदत घेण्यात आलेली आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश : -**

अ) पर्यटकांच्या अभ्यासाचा दृष्टिकोन लक्षात घेणे.

ब) स्थापत्य कला आणि कौशल्याची माहिती घेणे.

क) पर्यटन संदर्भातील लेखन प्रवाहात आणणे.

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.19326135
OPEN ACCESS

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. अंकुश मारुती सोहनी,शेठ जे. नौ. पालीवाला महाविद्यालय पाली, सुधागड, रायगड.*

**How to cite this article:**
सोहनी. अंकुश. मारुती. (2026). महाराष्ट्रातील ऐतिहासिक लेण्यांचे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व: - एक अभ्यास. Journal of Research and Development, 18(2(XIX)), 48–50. https://doi.org/10.5281/zenodo.19326135

**शोधनिबंधाची व्याप्ती** : - महाराष्ट्रातील ऐतिहासिक वारसा यांची पर्यटनाच्या दृष्टिकोनातून महत्व प्रस्तुत शोधनिबंधात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधन पद्धती : -**

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता सामाजिक शास्त्रे संशोधन पद्धती पैकी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक आणि ऐतिहासिक पद्धतींचा अवलंब करण्यात आलेला आहे.ऊ त्याकरिता दुय्यम पद्धतीच्या साधनांचा आधार घेऊन प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

**तथ्य संकलन : -**

**गृहीतके :**

अ) महाराष्ट्रातील ऐतिहासिक वारसा हे पुरातत्वीय स्तोत्र आहे.

ब) इतिहास अभ्यासक पर्यटक म्हणून विविध अंगावर प्रकाश टाकतात.

क) पर्यटनाच्या माध्यमातून अनेक ऐतिहासिक वारसांचा शोध लागतो.

ड) पर्यटनाच्या माध्यमातून अनेक ऐतिहासिक वारसांची साधर्म्यता आणि विविध संदर्भात तुलनात्मकरित्या माहिती होते.

**पर्यटनाच्या दृष्टीने इतिहासाची भूमिका :**

मानवसमूहकरवी केल्या जाणाऱ्या पर्यटनाचा शास्त्रशुद्ध अभ्यास पर्यटनात केला जातो. म्हणूनच मानवी पर्यटन हे पर्यटनशास्त्राच्या अभ्यासाचा मूळ गाभा आहे. भटकंती करणे, आपल्या आवडीच्या ठिकाणास भेटी देणे, आनंद व समाधानापोटी एका ठिकाणावरून दुसऱ्या अन्य ठिकाणाकडे प्रवास करणे प्रवास करणे यालाच आधुनिक काळात पर्यटना असे म्हणतात. आधुनिक काळामध्ये पर्यटनाला जे महत्त्व प्राप्त झाले आहे. हे महत्त्व खऱ्या अर्थाने इतिहासकाळातील मानवी समूहाच्या सततच्या प्रयत्नाचा तो एक परिपाक आहे. एकंदरीत पर्यटनाची पाळी-मुळे इतिहासामध्ये दिसून येतात.

**अजिंठा लेणी : -**

संभाजीनगर सारख्या महत्त्वपूर्ण शहराच्या उत्तरेस साधारणतः १०७ कि.मी. वर सह्याद्रीच्या उपरांगा असलेल्या अजिंठा डोंगर- कपारीत अप्रतिम अशा लेण्या दिसून येतात.१९ व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत या लेण्यांची साधी कल्पना सुद्धा आलेली नव्हती. मात्र ब्रिटिश लष्करातील कॅप्टन जॉन स्मिथ या परिसरामध्ये इ. स.१८८९ मध्ये शिकारीसाठी आल्यानंतर त्याच्या दृष्टीस या लेण्या पडल्याने जगापुढे हा ऐतिहासिक वारसा आलेला आहे. या लेण्यांचा विस्तार इंग्रजी यु अक्षराप्रमाणे झाल्याचे दिसून येते. या ठिकाणी एकूण २९ लेणे असून त्यामधील ७ लेण्यांची काम अपूर्ण असलेले दिसून येते. अशा लेण्यांची निर्मिती ही इ.स. पू. दुसऱ्या शतकापासून ते इ.स. च्या ६ व्या शतकापर्यंतच्या काळात सातवाहन आणि वाकाटक या सुप्रसिद्ध प्राचीन काळातील राज घराण्यांच्या पुढाकाराने झालेल्या आहेत. लेण्या या चैत्यालय किंवा विहाराच्या स्वरूपात असल्याने या बौद्ध धर्माशी निगडित असलेल्या दिसून येतात. शिल्पकला आणि चित्रकलेचा एक उत्तम नमुना म्हणून या लेण्या प्रसिद्ध आहेत. तत्कालीन कलाकारांनी वेगवेगळ्या वनस्पती पासून रंग तयार करून लेण्यासाठी वापर करण्यात आलेला आहे. तो रंग आजही आहे, तसाच असल्याचे दिसून येत आहे. या लेण्यांच्या माध्यमातून प्राचीन भारतीय संस्कृती तसेच कला साहित्यांचा एक प्रकारे अत्यूच्य ठेवा समजण्यात येत आहे. अशा प्राचीन ऐतिहासिक वास्तुकलेची युनोस्को सारख्या जागतिक संघटनेने इसवी सन १९८३ साली जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषणा केल्यामुळे, पर्यटनाच्या दृष्टीने या ऐतिहासिक वास्तुकलेस विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**वेरूळची लेणी** : -

संभाजीनगर शहराच्या पश्चिमेस ३०कि.मी.वर चारनाद्री डोंगर रांगेत या जगप्रसिद्ध प्राचीन लेण्या कोरलेल्या दिसून येत आहेत. त्या अत्युच्च दर्जाच्या शिल्पकलेचा नमुना म्हणून जगात प्रसिद्ध आहेत. याशिवाय या लेण्यांचे आणखीन एक वैशिष्ट्य असे आहे की, संपूर्ण देशात बौद्ध हिंदू व जैन या तिन्ही धर्मियांच्या लेण्या केवळ आणि केवळ याच ठिकाणी पाहण्यास मिळत आहेत. या ठिकाणी एकूण ३४ लेण्या असून त्या प्राचीन काळातील सुप्रसिद्ध अशा कलचुरी, चालुक्य आणि राष्ट्रकूट या राजघराण्यांच्या काळात कोरलेल्या दिसून येतात. यामध्ये लेणी क्रमांक २ ते १२ अंदाजे इ.स. ५५० ते ७५० मध्ये कोरलेले असून, या सर्व बौद्ध धर्मीय आहेत. तर लेणी क्रमांक १३ ते २९ यांचा निर्मिती कालखंड हा इ.स. ७७५ ते ९०० असल्याचे मानले जाते. या लेण्या हिंदू धर्मीय आहेत. लेणी क्रमांक ३० ते ३४ या जैन धर्मिया असून, त्या इ. स. ९०० ते ११०० च्या दरम्यान कोरल्याचे दिसून येत आहे. खऱ्या अर्थाने ऐतिहासिक वारसा म्हणून वेरूळच्या लेण्यांची दखल आंतरराष्ट्रीय संघटना म्हणून कार्यरत असलेल्या युनोस्कोने इ.स. १९८३ साली जागतिक वारसा म्हणून घोषणा

केल्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने या प्राचीन ऐतिहासिक वास्तुकलेला विशेष असे महत्त्व प्राप्त झालेले आहे. या लेण्यांच्या दर्शनासाठी प्रतिवर्षी लाखोंनी देसी व परदेशी पर्यटक येत असल्याचे दिसून येते.

**कार्ला लेणी : -**

पुणे शहराच्या पश्चिमोत्तरेस साधारणतः ६० कि.मी.वर या प्राचीन कालीन लेण्या दिसून येतात. इ.स. पूर्व पहिल्या शतकात या लेण्यांची निर्मिती केलेली असून बौद्ध धर्मीय चैत्यालय प्रचंड विलोभनीय असल्या तरी विद्वानांच्या मतानुसार हे भारतातील अन्य चैतालयापेक्षा सर्वात मोठे चैत्याले आहे. लेणी क्रमांक ८ चे चैत्यागृह १३.८० मीटर रुंद ३७.८७ मीटर लांब व १४.०२ मीटर उंच आहे. लेणीच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीवर हत्ती कोरलेले दिसून येतात. तर लेणीच्या मध्यावर स्तंभ आढळून येतो त्याचप्रमाणे प्रवेशद्वारावर मिथुन शिल्पे हत्ती व बहुमजली प्रासादाचे चित्र दृष्य व दोन्ही बाजूला अप्रतिम गंधर्वदांपत्यांची कोरीव शिल्पे तयार तर सभामंडपात पशुवर स्वार झालेल्या मनुष्याकृती पाहण्यास मिळते. चैत्यगृहापुढे लाकडी हर्मिका आज सुद्धा उत्तम स्थितीत टिकून आहे. चैत्यगृहापुढे सारनाथ येथील अशोक स्तंभाच्या धर्तीचा सिंहशीर्ष स्तंभ पाहण्यास मिळतो. या ठिकाणी आणखी १६ लेण्या कोरलेल्या दिसून येतात. प्राचीन काळात हे ठिकाण बौद्ध धर्मीयांच्या दृष्टीने एक प्रमुख केंद्र बनलेले होते. त्यामुळेच येणार येथे वर्षभर फार मोठ्या संख्येने देशी व परदेशी पर्यटक येत असल्याचे दिसून येते.

**एलिफंटा लेणी : -**

अलीकडच्या काळात विकसित पावलेल्या नवीन मुंबई स्थित उरण शहरापासून अत्यंत जवळ असलेल्या घारापुरी बेटावर ही लेणी इ.स.च्या ६ व्या शतकात कोरलेल्या कोरलेली दिसून येतात. या ऐतिहासिक वारसावर हिंदू धर्मीयांचा मोठा पगडा पाहण्यास मिळतो. या जगप्रसिद्ध अशा लेण्यापासून भारत देशाची आर्थिक राजधानी म्हणून प्रसिद्ध असलेले मुंबई शहर हे केवळ ९ कि.लो मिटरवर असलेले दिसून येते. तर भारताचे प्रवेशद्वार म्हणून ज्याची ओळख आहे. अशा गेट-वे-ऑफ इंडियापासून छोट्या बोटी द्वारे या ठिकाणी ये-जा करता येणे शक्य होते. महाराष्ट्रातील इतर अन्य प्राचीन लेण्याप्रमाणेच येथील वास्तुकला पाहण्यास मिळतात. या ठिकाणी प्रचंड विलोभनीय असे हत्तीचे मोठे शिल्प होते. (आता त्या हत्तीची मूर्ती मुंबईच्या वस्तुसंग्रहालयामध्ये हलवण्यात आली आहे.) त्यामुळे पोर्तुगीज या लेण्यांना एलिफंटा या नावाने ओळखत होते. एलिफंटाची लेणी म्हणजे विकसित समकालीन पाशुपत शैलस्थापत्याचा अत्यंत उत्कृष्ट स्वरूपाचा अविष्कार होय. या लेणीत फार सुंदर अशी त्रिमूर्ती (शिवमुर्ती) कोरलेली आहे. यात ब्रह्मा विष्णू आणि महेश यांची रूपे पाहण्यास मिळतात. त्यामुळे या लेण्या जगप्रसिद्ध असून शिवपार्वतीच्या जीवनातील विविध प्रसंग कोरलेले दिसून येतात. तसेच पूर्व आणि पश्चिमेस एक मंदिर असून, तिथे शिवलिंगाची स्थापना केलेली आहे. मंदिराच्या भिंतीवर गणेश, कार्तिकेय व सप्तमातृकांचे चित्र कोरलेले आहे. या लेण्यांच्या दर्शनास देशी आणि परदेशी पर्यटकांचा राबता प्रचंड पाहण्यास मिळतो. म्हणून हे पर्यटकनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे स्थळ असून जगात प्रसिद्ध झालेले आहे.

**निष्कर्ष : -**

भारत देशातील अनेक राज्यापैकी महाराष्ट्र हे राज्य ऐतिहासिक दृष्टीने फार महत्त्वाचे असून, महाराष्ट्राला प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्र मध्ये प्राचीन काळात आपल्या पूर्वजांनी जंगल, डोंगर- कपारीमध्ये लेण्या करून ठेवलेल्या आहेत. विशेषता संभाजीनगर जिल्ह्यात जगप्रसिद्ध अशा अजिंठा लेणी, वेरूळची लेणी असून त्यांना ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्व प्राप्त झालेले आहे या ठिकाणी उत्कृष्ट स्वरूपातील वास्तुशिल्प असून त्या उत्तम वास्तुकलेची नोंद युनोस्को सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेने १९८३ मध्ये जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषणा केली आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने देशी व परदेशी पर्यटक या लेण्यांच्या दर्शनाला येत असतात. याशिवाय पुणे शहराच्या जवळ कार्ला येथील लेणी तर, मुंबईच्या नजीक समुद्रात एका बेटावर एलिफंटा लेणी हे देशी व परदेशी पर्यटनाच्या दृष्टीने आकर्षण ठरले आहेत .

**संदर्भ ग्रंथ :**


1. महाराष्ट्र १९६९, महाराष्ट्र शासन, सचिवालय मुंबई, १९७०.
2. साखरे विजया व कठारे अनिल, भारतीय कलेचा इतिहास, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर, २०१२.
3. पाटील शिवकुमार, इतिहासप्रदर्शक शास्त्र पुरातत्वशास्त्र व वस्तुसंग्रहालयशास्त्र, पर्यटनशास्त्र, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, २०१४
4. मोरे मा. शं., महाराष्ट्रातील बुद्ध धम्माचा इतिहास, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, २०००.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

5. रायरीकर कल्पना व भालेराव मंजिरी, महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षीदार (शिलालेख आणि ताम्रपट), डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २००९.
6. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), मराठी विश्वकोश खंड- १४ महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई, १९८९.
7. जोशी पी.जी., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विद्या प्रकाशन नागपूर,२००३.
8. दुर्गा दीक्षित, महाराष्ट्र संस्कृती कोटा, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २००९.
9. Bhatia A. K. tourism in India, history and development, New Delhi, 1978.
10. http:// w w w. google.com transliterate.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# ग्रामीण भागात होणारे शहरी संक्रमण

**श्रद्धा संतोष भोईर**
एम ए (इतिहास) शेठ ज नौ. पालीवाला वाणिज्य महाविद्यालय, विज्ञान व कला महाविद्यालय, पाली -सुधागड, जि. रायगड, महाराष्ट्र
**ई-मेल -** shraddhabhoir2602@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180212
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 51-52
February - 2026
**Submitted:** 20 Jan. 2026
**Revised:** 30 Jan. 2026
**Accepted:** 15 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

**गोषवारा:**

' अर्बन कल्चरल ट्रांजेक्शन '(Urban Cultural Transition in Rural) चा मराठीत अर्थ ग्रामीण भागात होणारे शहरी संस्कृतीचे संक्रमण असा होतो. याचाच अर्थ गावाकडच्या जीवनशैलीत, विचारांमध्ये, पेहरावात आणि राहणीमानात शहराचा प्रभाव पडणे होय. यालाच. आपण रुबानायझेशन ( Rurbanization )किंवा शहरीकरणाचा ग्रामीण भागावरील परिणाम म्हणू शकतो.

विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून या दोन जीवनशैलीची वैशिष्ट्ये ग्रामीण वाद आणि शहरीवाद या दोन संकल्पना द्वारे दर्शविली जातात.

थोडक्यात, हा बदल म्हणजे गावाचा गाभा कायम ठेवून शहरी सुविधा आणि संस्कृतीचा स्वीकार करणे. ज्यामुळे 'शहरी आणि ग्रामीण जीवनपद्धती' एकत्र येत आहेत.

**प्रस्तावना:**

औद्योगिक क्रांतीनंतर औद्योगीकरण आणि शहरीकरण यांच्यामध्ये वाढ होत गेली. औद्योगीकरण आणि शहरीकरण हे सातत्याने वाढत गेलेले आढळते. तसेच वाढत्या औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यांचे विपरीत परिमाण सुद्धा अनुभवायला मिळत आहेत. सध्या लोकसंख्येच्या वाढत्या शहरीकरणामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. ह्या सगळयांचा विश्लेषणात्मक आणि समस्या प्रधान अभ्यास आवश्यक आहे. जो ग्रामीण भागात होणारे शहरी संक्रमणाच्या मदतीने केला जातो.

आधुनिक काळात कृषी क्षेत्रात औद्योगिक क्षेत्रात तसेच त्या अनुषंगाने असणाऱ्या इतर क्षेत्रात झपाट्याने होत असलेला बदल व विकास याचा परिणाम ही ग्रामीण वसाहतीच्या स्वरूपावर होत आहे. कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आधुनिकता आलेली दिसते यांत्रिकीकरणाचा वापर मोठ्या प्रमाणावर होताना आढळतो त्याचा परिणाम म्हणून ग्रामीण वस्तीचे स्वरूप बदलत आहे. उदा. छोटे शेतकरी आपल्या शेतजमिनी मोठ्या शेतकऱ्यांना विकतात व जवळच्या शहराकडे स्थलांतरित होतात विकसित देशांमध्ये जलसिंचनासाठी आणि जलविद्युततेच्या निर्मितीसाठी नद्यांचे पाणी आडवून धरणे बांधले जातात. अशा ठिकाणी अस्तित्वात असलेल्या ग्रामीण वसाहतीचे स्वरूप बदलते कारण जेथे धरण बांधले जाणार आहे त्या प्रदेशातील ग्रामीण वस्ती हटविल्या जातात व त्याचे पुनर्वसन इतर ठिकाणी केले जाते. त्यामुळे खेड्यांचे शहरात रूपांतर होण्याची प्रक्रिया सुद्धा ग्रामीण वस्तीचे स्वरूप बदलण्यास कारणीभूत ठरते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*श्रद्धा संतोष भोईर,एम ए ( इतिहास) शेठ ज नौ. पालीवाला वाणिज्य महाविद्यालय, विज्ञान व कला महाविद्यालय, पाली -सुधागड, जि. रायगड, महाराष्ट्र*

**How to cite this article:**
भोईर. श्रद्धा. संतोष. (2026). ग्रामीण भागात होणारे शहरी संक्रमण. Journal of Research and Development, 18(2(XIX)), 51–52. https://doi.org/10.5281/zenodo.19326169

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.19326169
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

**उद्दिष्टे:**

प्राध्यापक बर्ट्रांड यांनी खालील निरीक्षण केले :-- 'अखंड सिद्धांताच्या समर्थकांना असे वाटते की ग्रामीण आणि शहरी या दोन ध्रुवीय टोकांमधील विस्तारित श्रेणीत ग्रामीण-शहरी फरक सापेक्ष प्रमाणात आढळतात.'

सातत्य सिद्धांत ग्रामीण-शहरी द्विभाजनापेक्षा ग्रामीण-शहरी फरकांवर भर देतो. उत्क्रांतीचा मार्ग काहीही असो ग्रामीण आणि शहरी जीवनशैलीत फरक करता येतो.

शहरी केंद्रे आणि ग्रामीण भागांमधील फरक इतका स्पष्ट वाटू शकतो की व्याख्या हा एक मुद्दा असू नये, तथापि वेगवेगळ्या राष्ट्रांनी शहरी केंद्र म्हणजे काय हे ज्या पद्धतीने परिभाषित केले आहे त्यामध्ये मोठे फरक असू शकतात. वापरले जाणारे निकष म्हणजे लोकसंख्येया आकार आणि घनता आणि माध्यमिक शाळा, रुग्णालये आणि बँका यासारख्या सेवांची उपलब्धता तथापि लागू केलेल्या निकषांचे संयोजन खूप बदलू शकते. वापरलेली लोकसंख्या मर्यादा देखील भिन्न असू शकते.

**तथ्यसंकलन:**

' अर्बन कल्चरल ट्रांजेक्शन '(Urban Cultural Transition in Rural) चा मराठीत अर्थ ग्रामीण भागात होणारे शहरी संस्कृतीचे संक्रमण असा होतो. याचाच अर्थ गावाकडच्या जीवनशैलीत, विचारांमध्ये, पेहरावात आणि राहणीमानात शहराचा प्रभाव पडणे होय. यालाच. आपण रुबानायझेशन ( Rurbanization )किंवा शहरीकरणाचा ग्रामीण भागावरील परिणाम म्हणू शकतो.

* या संक्रमणाचे प्रमुख पैलू :-

जीवनशैली बदल :-- ग्रामीण भागात पक्क्या घरांचा वाढता वापर, तंत्रज्ञानाचा प्रसार आणि शहरी फॅशनचा प्रभाव.

* विचारसरणीतील बदल :- शिक्षण आणि इंटरनेटमुळे ग्रामीण तरुणांच्या विचारांमध्ये आधुनिकता आणि सामाजिक बदल.

आर्थिक बदल :- शेतीकडून बिगर-शेती व्यवसाय किंवा रोजगारासाठी शहरी भागावर अवलंबून राहणे.

पायाभूत सुविधा :- ग्रामीण भागात इंटरनेट, रस्ते आणि वाहतुकीच्या सुविधा सुधारल्यामुळे शहरी संस्कृतीचा जलद शिरकाव.

थोडक्यात, हा बदल म्हणजे गावाचा गाभा कायम ठेवून शहरी सुविधा आणि संस्कृतीचा स्वीकार करणे. ज्यामुळे 'शहरी आणि ग्रामीण जीवनपद्धती' एकत्र येत आहेत.

**विषयाची माहिती:**

शहरीकरण म्हणजे ग्रामीण भागातून शहरी भागात लोकसंख्या स्थलांतर. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या प्रमाणात होणारी घट आणि समाज या बदलाशी जुळवून घेण्याच्या पद्धती. याचा अर्थ ग्रामीण भागात न होता शहरी भागात लोकसंख्या वाढ देखील होऊ शकते.

1) ही प्रामुख्याने अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे शहरे आणि शहरे तयार होतात आणि मध्यवर्ती भागात अधिक लोक राहू लागतात आणि काम करू लागतात तेव्हा ती मोठी होतात.
2) शहरीकरण हे शहरी नियोजन, भूगोल, समाजशास्त्र, वास्तुकला, अर्थशास्त्र, शिक्षण, सांख्यिकी आणि सार्वजनिक आरोग्य यासारख्या विविध विषयांशी संबंधित आहे. ही घटना जागतिकीकरण, आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण, बाजारीकरण, प्रशासकीय/संस्थात्मक शक्ती आणि तर्कसंगतीकरणाच्या समाजशास्त्रीय प्रक्रियेशी जवळून जोडली गेली आहे.
3) शहरीकरणाला एका विशिष्ट वेळेत एक विशिष्ट स्थिती म्हणून पाहिले जाऊ शकते (उदा. शहरे किंवा शहरांमधील एकूण लोकसंख्या किंवा क्षेत्रफळाचे प्रमाण), किंवा कालांतराने त्या स्थितीत वाढ म्हणून शहरीकरणाचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या तुलनेत शहरी विकासाच्या पातळीच्या दृष्टीने किंवा लोकसंख्येचा शहरी प्रमाण ज्या दराने वाढत आहे त्या दराच्या दृष्टीने मोजले जाऊ शकते. शहरीकरण प्रचंड सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हाने निर्माण करते.

**संदर्भ सूची:**

1. मानवी भूगोल :-- डॉ. शिवराम ठाकूर, डॉ. राजाराम पाटील, डॉ. पेडणेकर.
2. अर्बन जिओग्राफी :-- प्राचार्य डॉ. विलासिनी मोहन ठिगळे- महाजन, डॉ. अनिल शिंदे, डॉ. प्रकाश जगन्नाथ हजारे, डॉ. राहुल शांताराम पवार.
3. वस्ती भूगोल :-- प्राध्यापक वराट ,प्राध्यापक घोलप.
4. वस्ती भूगोल :-- प्राध्यापक विठ्ठल घारपुरे, प्राध्यापक के. ए. खतीब.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवा : एक चिकित्सक अध्ययन

**डॉ. अनंत मारोतराव थोरात**
ग्रंथपाल कोएसो, डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य आणि सौ के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय रोहा- रायगड
**Email:** anantthorat2002@gmail.com

**Manuscript ID:** JRD -2026-180213
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 53-60
February - 2026
**Submitted:** 20 Jan. 2026
**Revised:** 30 Jan. 2026
**Accepted:** 15 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***सारांश***

*सदर अध्ययनात शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवा यावर आधारित आहे. शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये, ग्रंथालयांना त्यांच्या संसाधनांमध्ये आणि सेवांमध्ये दूरस्थपणे आणि कोणत्याही सीमांशिवाय प्रवेश देण्याची आवश्यकता वाढत आहे. मोबाइल तंत्रज्ञानाने (एमटी) जागतिक स्तरावर शैक्षणिक ग्रंथालय भागधारकांमध्ये व्यापक स्वीकृती मिळवली आहे, कारण ग्राहकांना सोयीस्कर ग्रंथालय सेवा प्रदान करण्यासाठी त्यांना प्रभावी संवाद साधने म्हणून पाहिले जाते. शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवांचा अवलंब आणि अंमलबजावणी करण्याचे संभाव्य फायदे शोधण्यासाठी या अभ्यासाचा उद्देश होता. सदर अध्ययनात सोयीस्कर नमुन्याद्वारे निवडलेल्या ३९० पदवीपूर्व विद्यार्थ्यांचा समावेश होता, ज्यापैकी ३५६ प्रतिसाद मिळाले. प्रश्नावली वापरून डेटा गोळा केला गेला आणि SPSS सॉफ्टवेअर वापरून त्याचे विश्लेषण केले गेले, प्रामुख्याने वारंवारता संख्या आणि टक्केवारी यासारख्या वर्णनात्मक आकडेवारीचा वापर केला गेला. या अभ्यासातून ग्रंथालय व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांमध्ये एमटी ग्रंथालय सेवांबद्दलची एक मजबूत जागरूकता आणि सकारात्मक धारणा दिसून आली. मोबाईल तंत्रज्ञान आधारित ग्रंथालय सेवांच्या अंमलबजावणीला आव्हानांचा सामना करावा लागला आहे. या अडथळ्यांमध्ये अपुरी आयसीटी पायाभूत सुविधा, प्रशिक्षणाच्या अभावामुळे निर्माण होणारी कौशल्यांची कमतरता, तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी धोरणात्मक चौकटीचा अभाव आणि महाविद्यालय व्यवस्थापनाला तंत्रज्ञान स्वीकारण्यास प्रवृत्त करण्याची आवश्यकता यांचा समावेश आहे.*

***कीवर्ड:*** *मोबाईल तंत्रज्ञान, शैक्षणिक ग्रंथालये, ग्रंथालय सेवा,*

**परिचय**

२१ व्या शतकात, जगभरातील ग्रंथालये त्यांच्या कामकाजात उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा समावेश करण्यासाठी विकसित होत आहेत, ज्याचा उद्देश अधिक परिष्कृत परंतु वापरकर्ता-अनुकूल बनणे आहे. विविध क्षेत्रांमधील महत्त्वाच्या माहितीचे प्राथमिक भांडार म्हणून, ग्रंथालये, मग ती समुदाय-आधारित असोत किंवा शैक्षणिक असोत, राष्ट्रीय माहिती व्यवस्थापन आणि विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात.शैक्षणिक ग्रंथालये, विशेषतः वेळेवर अभ्यासपूर्ण माहिती प्रदान करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. जमील, तारिक आणि जमील (२०१३) यांनी परिभाषित केल्याप्रमाणे, शैक्षणिक ग्रंथालये शैक्षणिक गुणवत्तेला समर्थन देण्यासाठी आणि वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या संग्रहांसह स्थापन केली जातात. गेल्या काही वर्षांत, शैक्षणिक ग्रंथालयांनी विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षण प्रयत्नांमध्ये वापरल्या जाणाऱ्या पुस्तके, जर्नल्स, नकाशे आणि इतर साहित्य यासारख्या संसाधनांद्वारे माहिती मिळविण्याचे आणि प्रसारित करण्याचे मार्ग म्हणून काम केले आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19326212
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ. अनंत मारोतराव थोरात,ग्रंथपाल कोएसो, डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य आणि सौ के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय रोहा- रायगड*

**How to cite this article:**
थोरात. अनंत. मारोतराव. (2026). शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवा: एक चिकित्सक अध्ययन. Journal of Research and Development, 18(2(XIX)), 53–60. https://doi.org/10.5281/zenodo.19326212

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

ओकलीफ (२०१५) यांनी अधोरेखित केले की कार्यक्षम शैक्षणिक ग्रंथालये प्रामुख्याने त्यांच्या संग्रहाद्वारे आणि या साहित्यांपर्यंत पोहोचण्यास सुलभ करून शैक्षणिक माहितीचे प्रवेशद्वार म्हणून काम करतात.

२१ व्या शतकात, शैक्षणिक ग्रंथालये पारंपारिक भौतिक सेवा पुरवठ्यापासून अधिक आधुनिक आभासी आणि आयसीटी-आधारित दृष्टिकोनाकडे वळत आहेत. विविध भौगोलिक स्थानांवर वाढत्या वापरकर्त्यांच्या मागणीमुळे आणि सोयीच्या गरजेमुळे हे बदल घडत आहेत. मोबाइल तंत्रज्ञान अनुप्रयोग आणि सेवा नवकल्पनांचा आगमन वापरकर्त्यांना माहिती कशी मिळवायची आणि कशी मिळवायची हे मूलभूतपणे बदलत आहे. मोबाइल तंत्रज्ञान शैक्षणिक ग्रंथालयांद्वारे ऑफर केलेल्या सेवांचे आधुनिकीकरण आणि वर्धित करण्यात महत्त्वपूर्ण ठरले आहे, मोबाइल उपकरणे आणि वापरकर्ता-अनुकूल इंटरफेसमुळे "Libraries in Hand" ट्रेंड उदयास आला आहे (कुंभार आणि पवार, २०१४).

जगभरातील ग्रंथालयांची संख्या वाढत आहे, विशेषतः विकसित राष्ट्रांमधील ग्रंथालये नाविन्यपूर्ण सेवा देण्यासाठी आणि त्यांच्या ग्राहकांसाठी विशाल इलेक्ट्रॉनिक माहिती संसाधनांमध्ये अप्रतिबंधित प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी मोबाइल तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत आणि त्यांचा समावेश करत आहेत. भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांनी मोबाईल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवा देण्यासाठी या संधीचा पूर्णपणे फायदा घेतलेला आहे. या अभ्यासाचे उद्दिष्ट शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवांचा अवलंब आणि अंमलबजावणीचा तपास करून ही विशिष्ट तफावत भरून काढणे आहे, याव्यतिरिक्त, या अभ्यासात पदवीपूर्व विद्यार्थ्यांचे या सेवांचा अवलंब आणि अंमलबजावणी करण्याच्या क्षमतेबद्दलचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासाचे उद्दिष्टे**

• निवडक खाजगी महाविद्यालया मधील शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवांच्या वापराबद्दल जागरूकतेच्या पातळीचे मूल्यांकन करणे.
• मोबाइल डिव्हाइस वापरातील विद्यार्थ्यांची प्रवीणता ओळखणे.
• निवडक शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये मोबाइल तंत्रज्ञान प्लॅटफॉर्मवर प्रदान केल्या जाऊ शकणाऱ्या ग्रंथालय सेवा ओळखणे.
• निवडक महाविद्यालया मधील शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवा वापरण्याची विद्यार्थ्यांची तयारी तपासणे.

**गृहीतके**

- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये मोबाईल तंत्रज्ञानाचे समधानकारक ज्ञान आहे.
- महाविद्यालयीन विद्यार्थी मोबाईल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवांचा उपयोग करण्यात पारंगत आहेत.

**अध्ययनाची व्याप्ती आणि मर्यादा**

सदर अध्ययन हे कोएसो. डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य आणि सौ. के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय रोहा जि. रायगड आणि एम.बी. मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धाटाव जि. रायगड या दोन महाविद्यालया पुरते मर्यादित असून शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्याच ठराविक गटाचेच अध्ययन करण्यात आले आहे.

**अभ्यासाचे महत्त्व**

भारताच्या शैक्षणिक संस्थांमध्ये मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवांच्या सद्यस्थितीबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करणे हा या अभ्यासाचा उद्देश आहे. याव्यतिरिक्त, ते शैक्षणिक ग्रंथालयांचे व्यवस्थापन करण्यासाठी धोरणकर्त्यांना मार्गदर्शन प्रदान करण्याचा आणि महाविद्यालय अधिकाऱ्यांना या सेवा प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी धोरणे विकसित करण्यास मदत करण्याचा प्रयत्न करते. शिवाय, अभ्यासाच्या निष्कर्षांची अंमलबजावणी केल्याने विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण फायदे मिळण्याची अपेक्षा आहे. शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवांचा अवलंब आणि मोबाइल-चलित तंत्रज्ञानावर अवलंबून असलेल्या जीवनातील इतर महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये त्यांचा वापर करण्याबाबतच्या ज्ञानातील तफावत दूर करून हे संशोधन विद्यमान साहित्यात योगदान देईल.

**साहित्य आढावा**

**कुमार (२०१४)** यांनी भारतात एक अभ्यास केला ज्याद्वारे विद्यार्थ्यांनी त्यांच्या ग्रंथालयांद्वारे मोबाईल तंत्रज्ञानाद्वारे प्रदान केलेल्या सेवांमध्ये प्रवेश करण्याची इच्छा शोधली. निष्कर्षांवरून असे दिसून आले की मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी अशा नवोपक्रमांना सकारात्मक पसंती दर्शविली आणि अशा सेवा वापरण्यास तयार होते. तथापि, त्यांनी असे म्हटले की मोबाइल इंटरफेसवर दिल्या जाणाऱ्या सेवांची गुणवत्ता सामान्य ऑनलाइन ग्रंथालयाच्या वेबसाइटद्वारे प्रदान केलेल्या सेवांसारखीच असावी. मोबाइल तंत्रज्ञानामुळे लोक कसे संवाद साधतात आणि माहिती कशी मिळवतात यात मोठे बदल झाले आहेत. मोबाइल तंत्रज्ञान जसजसे वेगाने वाढत आहे, तसतसे अनेक विद्यार्थी शैक्षणिक उद्दिष्टांसाठी मोबाइल डिव्हाइस वापरत आहेत. म्हणूनच, मोबाइल तंत्रज्ञानाची लोकप्रियता ग्रंथालयांना त्यांच्या मोबाइल डिव्हाइसवर ग्रंथालय सेवांमध्ये प्राधान्य देणाऱ्या अनेक ग्राहकांना सेवा देण्यासाठी त्यांच्या सेवा वितरण पद्धतीचा आढावा घेण्यास भाग पाडत आहे.

**नोवलन (२०१९)** यांनी यावर भर दिला की शैक्षणिक ग्रंथालयांना संगणकीय जगात, विशेषतः मोबाईल तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात, क्रांतीशी सुसंगत राहण्यासाठी त्यांच्या सेवांमध्ये विविधता आणावी लागेल. शैक्षणिक ग्रंथालय ऑपरेशन्समध्ये एमटीचे एकत्रीकरण वापरकर्त्यांना ग्रंथालयाच्या संसाधनांमध्ये प्रवेश करण्यास आणि ग्रंथालयात प्रत्यक्ष उपस्थित न राहता दूरस्थपणे चौकशी करण्यास अनुमती देते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

**ग्रिफी (२०१३)** यांनी असे मांडले की जसजसे अधिक विद्यार्थी त्यांच्या मोबाईल उपकरणांवर इंटरनेटचा वापर करतात - विशेषतः पारंपारिक पीसीच्या तुलनेत स्मार्टफोन वापरतात, तसतसे शैक्षणिक ग्रंथालयांनी मोबाईल तंत्रज्ञानाचे फायदे ओळखावेत आणि वापरकर्त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अशा माध्यमातून सेवा प्रदान केल्या पाहिजेत.

**ओकलीफ (२०१५)** यांनी अधोरेखित केले की कार्यक्षम शैक्षणिक ग्रंथालये प्रामुख्याने त्यांच्या संग्रहाद्वारे आणि या साहित्यांपर्यंत पोहोच सुलभ करून शैक्षणिक माहितीचे प्रवेशद्वार म्हणून काम करतात. अध्यापन आणि शिक्षणाला पाठिंबा देण्याच्या त्यांच्या मूलभूत ध्येयाशी सुसंगत, ते संशोधकांना त्यांच्या संशोधन प्रयत्नांमध्ये मदत करण्यासाठी प्रभावी ग्रंथालय सेवा देखील देतात. हरिनारायण आणि वसंत **राजू (२०१२),** ओकलीफच्या कामात उल्लेख केल्याप्रमाणे, शैक्षणिक ग्रंथालयांमधील संसाधने प्रामुख्याने विद्यापीठातील विद्यार्थी आणि संशोधकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केली जातात.

**सिमंड्स आणि अंदलीब (२०१९)** यांनी स्पष्ट केले की शैक्षणिक सेटिंग्जमध्ये ग्रंथालय संसाधनांचा वापर वापरकर्त्यांच्या ग्रंथालयांबद्दलच्या धारणा आणि त्यांच्या संसाधनांवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पाडतो. ज्या व्यक्ती शैक्षणिक ग्रंथालयांशी अधिक परिचित आहेत ते त्यांच्यातील उपलब्ध संसाधनांचा वापर करण्यास अधिक इच्छुक असतात.

शैक्षणिक ग्रंथालये या माहिती युगात मोबाइल सामग्री आणि उपायांना प्रगती करत आहेत जेणेकरून संशोधनासाठी मोबाईल तंत्रज्ञानाचा वापर करण्यास समाधानी असलेल्या विद्यार्थ्यांच्या आणि संशोधकांच्या गरजा पूर्ण होतील. शैक्षणिक ग्रंथालयांना त्यांच्या पारंपारिक ग्रंथालय सेवांमध्ये मोबाईल संग्रह आणि डेटाबेस, मोबाईल कॅटलॉग, मोबाईल एसएमएस सेवा, मोबाईल ग्रंथालय सूचना आणि व्हर्च्युअल टूरद्वारे सुधारणा करण्याची शक्यता प्रदान करतात.

**मोबाईल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवांच्या वापराबद्दल जागरूकता**

माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानातील (आयसीटी) संक्रमण आणि जलद गतीने घडामोडी, विशेषतः एमटी क्षेत्रात, जनतेच्या कल्पनांची देवाणघेवाण आणि माहिती संसाधनांची देवाणघेवाण करण्याच्या पद्धती बदलल्या आहेत. एमटी व्यक्ती माहिती कशी मिळवतात, गोळा करतात आणि त्यांच्याशी कसे जोडले जातात हे सुधारते आणि ते संवादासाठी नवीन माध्यमे सादर करतात. हे उदयोन्मुख मोबाइल तंत्रज्ञान विकास वाढत्या प्रमाणात आणि वैविध्यपूर्ण माहितीसाठी जलद प्रवेश प्रदान करतात. तरीही, या दृष्टिकोनातून शैक्षणिक ग्रंथालयांसमोरील आव्हान म्हणजे या समकालीन तंत्रज्ञानाचे पुनर्निर्माण करणे आणि त्यांच्या दैनंदिन सेवा वाढविण्यासाठी आणि त्यांच्या वापरकर्त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना प्रासंगिक बनवणे मोलाचे ठरते. मोबाइल तंत्रज्ञान च्या लोकप्रियतेचा सामना ग्रंथालयांना करावा लागत आहे आणि त्यांना मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवा कशा द्यायच्या आणि त्यांचे संग्रह मोबाइल डिव्हाइसवर कसे उपलब्ध करून द्यायचे याचे काम करावे लागत आहे. मोबाइल तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी आवश्यक संसाधनांची उपलब्धता आणि ग्रंथालय कर्मचाऱ्यांची तज्ञता याबद्दल त्यांचे मत मध्यम होते. ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या आवलोकनावरून वरून असे दिसून येते की मोबाइल तंत्रज्ञाना ची अंमलबजावणी आव्हानात्मक असेल आणि काहीजण या नवोपक्रमाचा मोठ्या प्रमाणात अवलंब करण्यास विरोध करतील. निकालांवरून असे दिसून येते की मोबाइल तंत्रज्ञान समकालीन आहेत परंतु नंतर या ट्रेंडशी जुळवून घेणे खूप कठीण होईल, म्हणून अशा तांत्रिक नवोपक्रमाचा प्रभावीपणे अवलंब आणि अंमलबजावणी करण्यासाठी ग्रंथालय कर्मचाऱ्यांना सेवेत आणि पुन्हा प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. प्रामुख्याने, असे आढळून येते की ग्रंथपालांना मोबाईल तंत्रज्ञान हा एक फायदेशीर उत्प्रेरक वाटतो जो ग्रंथालये वापरकर्त्यांशी संवाद साधण्यास, चांगला ग्राहक अभिप्राय तयार करण्यासाठी आणि त्यांना योग्य प्रकारच्या सेवा प्रदान करण्यासाठी स्वीकारू शकतात.ग्रंथालयांमध्ये मोबाईल तंत्रज्ञानाचा उपयोग आणि संकल्पनांबद्दल जागरूकतेची पातळी समधानकारक असल्याचे निदर्शनास येते.

**माहितीचे संकलन**

या अभ्यासात वर्णनात्मक सर्वेक्षणाचा वापर करण्यात आला. विद्यार्थ्यांकडून माहिती गोळा करण्यासाठी आणि विश्लेषण करण्यासाठी परिमाणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला. या अभ्यासासाठी पदवीपूर्व ३९० विद्यार्थी प्रतिसादक होते. माहिती संकलन साधने (प्रश्नावली) व्यवस्थापित करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या उत्तरदात्यांची निवड करताना, सोयीस्कर नमुना तंत्र वापरले गेले.

**माहितीचे विश्लेषण**

प्रश्नावली वापरून गोळा केलेला डेटा प्रथम चुका दुरुस्त करण्यासाठी संपादित केला गेला. त्यानंतर तो सामाजिक विज्ञान पॅकेज (SPSS) वापरून वर्णनात्मकपणे एकत्रित केला गेला. निकाल उत्तरदात्यांनी दिलेल्या प्रतिसादांची वारंवारता आणि टक्केवारी दर्शविणारे टेबल, पाय चार्ट आणि बार चार्टच्या स्वरूपात सादर करण्यात आले.

**तक्ता १: प्रतिसादकर्त्यांचे लिंग वितरण**

| ALL | | | | CDCC | MBMASC | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Frequency | Percent | Frequency | Percent | Frequency | Percent |
| Gender | | | | | | |
| Male | 226 | 63.6 | 147 | 60.2 | 79 | 70.5 |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Female | 130 | 36.5 | 97 | 39.8 | 33 | 29.5 |
| **Total** | **356** | **100.0** | **244** | **100.0** | **112** | **100.0** |

तक्ता १ मध्ये एकूण ३५६ विद्यार्थ्यांचे प्रतिसाद गोळा करण्यात आले असल्याचे दिसून आले आहे. या प्रतिसादकर्त्यांमध्ये २२६ (६३.५%) पुरुष होते, तर १३० (३६.५%) महिला होत्या. विशेषतः, MBMASC मधील ११२ विद्यार्थी प्रतिसादकर्त्यांपैकी ७९ (७०.५%) पुरुष आणि ३३ (२९.५%) महिला होत्या. CDCC च्या बाबतीत, एकूण २४४ विद्यार्थी प्रतिसादकर्त्यांपैकी १४७ (६०.२%) पुरुष आणि ९७ (३९.८%) महिला होत्या. हे सूचवते की अभ्यासात सहभागी होणारे बहुतेक दोन्ही महाविद्यालयांचे विद्यार्थी होते.

**तक्ता २: विद्यार्थ्यांच्या उत्तरदात्यांचे वय**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ALL | | CDCC | | MBMASC | |
| Age | Frequency | Percent | Frequency | Percent | Frequency | Percent |
| 20-25 वयोगट | 349 | 98.0 | 239 | 98.0 | 110 | 98.2 |
| 26 आणि पुढील | 7 | 2.0 | 5 | 2.0 | 2 | 1.8 |
| **Total** | **356** | **100.0** | **244** | **100.0** | **112** | **100.0** |

तक्ता २ मध्ये असे दिसून आले आहे की उत्तरदात्यांमध्ये सर्वात मोठा वयोगट '२०-२५' होता, ज्यामध्ये ३४९ (९८%) प्रतिसाद होते, तर सर्वात लहान '२६ आणि त्यावरील' होता, ज्यामध्ये ७ (२.०%) प्रतिसाद होते. CDCC, उत्तरदात्यांचे सर्वाधिक प्रमाण '२०-२५' वयोगटातील होते, ज्यामध्ये २३९ प्रतिसाद होते, तर सर्वात कमी प्रतिसाद '२६ आणि त्यावरील' वयोगटातील होते, ज्यामध्ये फक्त २ (१.८%) प्रतिसाद होते. तर MBMASC मध्ये '२०-२५' वयोगटातील विद्यार्थ्यांची संख्या एकूण ११० होती. विश्लेषण असे दर्शविते की अभ्यासासाठी बहुतेक प्रतिसाददाते २० ते २५ वर्षांच्या दरम्यान होते.

**मोबाईल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवांच्या वापराबद्दल जागरूकतेची पातळी**

संशोधकाने प्रथम हे शोधण्याचा प्रयत्न केला की मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवांच्या वापराबद्दल जागरूकता आणि मूल्यांकन करण्यासाठी महाविद्यालया महाविद्यालयामध्ये ग्रंथालय सेवांमध्ये प्रवेश करण्यासाठी मोबाइल डिव्हाइसचा वापर केला जाऊ शकतो याची उत्तरदात्यांमध्ये जाणीव होती का.

**तक्ता ३: ग्रंथालय सेवांमध्ये मोबाईल डिव्हाइसेसचा वापर केला जाऊ शकतो याबद्दल जागरूकता**

| Institution | Strongly Disagree | | Disagree | | Neutral | | Agree | | Strongly Agree | | **Total** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | N | % | N | % | N | % | N | % | N | % | N | % |
| CDCC | 14 | 5.7 | 19 | 7.8 | 16 | 6.6 | 95 | 38.9 | 100 | 41.0 | **244** | **100.0** |
| MBMASC | 3 | 2.7 | 3 | 2.7 | 4 | 3.6 | 45 | 40.2 | 57 | 50.9 | **112** | **100.0** |
| **Total** | **17** | **4.8** | **22** | **6.2** | **20** | **5.6** | **140** | **39.3** | **157** | **44.1** | **356** | **100.0** |


तक्ता ३ दर्शवितो की ३५६ प्रतिसादकर्त्यांपैकी १५७ (४४.१%) यांनी महाविद्यालयांमध्ये ग्रंथालय सेवांमध्ये प्रवेश करण्यासाठी मोबाइल डिव्हाइस वापराबद्दल त्यांना जाणीव होती यावर ठामपणे सहमती दर्शविली, तर १४० (३९.३%) यांनी या कल्पनेशी सहमती दर्शविली. उलट, २२ (६.२%) असहमत होते आणि १७ (४.८%) यांनी जोरदार असहमती दर्शविली. याव्यतिरिक्त, २० (५.६%) प्रतिसादकर्त्यांनी महाविद्यालय ग्रंथालय सेवांमध्ये प्रवेश करण्यासाठी मोबाइल डिव्हाइस वापराबद्दलच्या जागरूकतेबद्दल तटस्थ राहिले. CDCC प्रतिसादकर्त्यांपैकी १०० (४१.०%) यांनी ग्रंथालय सेवांमध्ये प्रवेश करण्यासाठी मोबाइल डिव्हाइस वापराबद्दलच्या त्यांच्या जागरूकतेशी जोरदार सहमती दर्शविली, तर MBMASC मधील ५७ (५०.९%) यांनी या जागरूकतेशी सहमती दर्शविली. शिवाय, CDCC प्रतिसादकर्त्यांपैकी ९५ (३८.९%) यांनी MBMASC मधील ४५ (४०.२%) यांच्या तुलनेत या जागरूकतेशी सहमती दर्शविली. यावरून असे दिसून येते की दोन्ही महाविद्यालयामधील बहुतेक प्रतिसादकर्त्यांना महाविद्यालयामध्ये ग्रंथालय सेवांमध्ये प्रवेश करण्यासाठी मोबाइल डिव्हाइसची क्षमता माहित होती. पुढील विश्लेषणातून विद्यार्थ्यांमध्ये मोबाइल तंत्रज्ञान-आधारित ग्रंथालय सेवांबद्दल लक्षणीय पातळीचे कौतुक दिसून आले.

**विद्यार्थ्यांची मोबाईल उपकरणांच्या वापरातील प्रवीणता**

या अभ्यासाचा आणखी एक उद्देश विद्यार्थ्यांची मोबाईल उपकरणांच्या वापरातील प्रवीणता तपासणे हा होता.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

**आकृती १. मोबाईल उपकरणांच्या वापरातील प्रतिसादकर्त्यांची प्रवीणता**




आकृती १ मध्ये दाखवलेले निष्कर्ष CDCC आणि MBMASC या दोन्ही महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांची मोबाईल उपकरणांच्या वापरातील प्रवीणता पातळी दर्शवितात. हे स्पष्ट होते की दोन्ही महाविद्यालयामधील प्रतिसादकर्त्यांनी मोबाईल उपकरणांच्या वापरात उच्च प्रवीणता पातळी दर्शविली. विशेषतः, CDCC च्या ३७% आणि ४६% विद्यार्थ्यांनी मोबाईल उपकरणांच्या वापरात अनुक्रमे प्रवीणता असल्याचे नोंदवले, ज्यामुळे एकत्रित ८२% प्राविण्य दर मिळाला. त्याचप्रमाणे, MBMASC च्या ३७% आणि ४५% विद्यार्थ्यांनी मोबाईल उपकरणांच्या वापरात अनुक्रमे प्रवीणता दर्शविली, ज्याचा एकत्रित प्राविण्य दर ८३% होता. या निकालांवरून, असा अंदाज लावता येतो की दोन्ही महाविद्यालयामधील बहुतेक विद्यार्थ्यांनी मोबाईल उपकरणांच्या वापरात प्रवीणता दर्शविली.

**मोबाइल तंत्रज्ञान प्लॅटफॉर्मद्वारे प्रदान करता येणाऱ्या ग्रंथालय सेवा**

निवडलेल्या ग्रंथालयांमध्ये मोबाइल तंत्रज्ञान प्लॅटफॉर्मवर प्रदान करता येणाऱ्या ग्रंथालय सेवा ओळखणे हा अभ्यासाचा एक उद्देश होता

**तक्ता ४: मोबाईल ऑनलाइन पब्लिक ॲक्सेस कॅटलॉग (MOPAC)**

| Institution | Interested | | Not Interested | | **Total** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | N | % | N | % | N | % |
| CDCC | 189 | 77.5 | 55 | 22.5 | **244** | **100.0** |
| MBMASC | 91 | 81.3 | 21 | 18.8 | **112** | **100.0** |
| **Total** | **280** | **78.7** | **76** | **21.3** | **356** | **100.0** |

तक्ता ४ नुसार, २८० (७८.७%) प्रतिसादकर्त्यांनी त्यांच्या मोबाइल डिव्हाइसवर त्यांच्या ग्रंथालयाच्या कॅटलॉगमध्ये प्रवेश करण्यास रस दर्शविला, तर ७६ (२१.३%) प्रतिसादकर्त्यांनी त्यांना रस नसल्याचे दर्शविले.

विशेषतः, संस्थात्मक पातळीवर, CDCC मधील १८९ (७७.५%) आणि MBMASC मधील ९१ (८१.३%) प्रतिसादकर्त्यांनी अशा सेवांमध्ये रस दर्शविला. याउलट, CDCC मधील ५५ (२२.५%) आणि MBMASC मधील २१ (१८.८%) प्रतिसादकर्त्यांनी असे दर्शविले की त्यांना रस नसेल. एकूणच, अर्ध्याहून अधिक प्रतिसादकर्त्यांनी ग्रंथालयाने प्रदान केल्यास ग्रंथालय कॅटलॉगमध्ये प्रवेश करण्यासाठी त्यांच्या मोबाइल डिव्हाइसचा वापर करण्यास रस दर्शविला.

**तक्ता ५: मोबाईल संदर्भ चौकशी सेवा (मदतीसाठी दूरस्थपणे ग्रंथपालाशी थेट चॅटसह)**

| Institution | Interested | | Not Interested | | **Total** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | N | % | N | % | N | % |
| CDCC | 209 | 85.7 | 35 | 14.3 | **244** | **100.0** |
| MBMASC | 92 | 82.1 | 20 | 17.9 | **112** | **100.0** |
| **Total** | **301** | **84.6** | **55** | **15.4** | **356** | **100.0** |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

तक्ता ५ मध्ये सादर केलेल्या निष्कर्षांवरून असे दिसून येते की ३०१ (८४.६%) विद्यार्थी-प्रतिसादकर्त्यांपैकी बहुसंख्य लोकांनी मोबाइल तंत्रज्ञान-आधारित ग्रंथालय संदर्भ चौकशी सेवांमध्ये रस दर्शविला. तथापि, CDCC आणि MBMASC दोन्हीमधील ५५ (१५.४%) प्रतिसादकर्त्यांनी उलट मत व्यक्त केले आणि असे सूचित केले की त्यांना अशा सेवेमध्ये रस नसेल. शिवाय, निकालांवरून असे दिसून येते की CDCC मधील २०९ (८५.७%) प्रतिसादकर्त्यांना मोबाइल तंत्रज्ञान-आधारित ग्रंथालय संदर्भ सेवांमध्ये रस होता, तर MBMASC मधील ९२ (८२.१%) प्रतिसादकर्त्यांनी रस दर्शविला. उलट, CDCC मधील ३५ (१४.३%) प्रतिसादकर्त्यांनी या प्रकारच्या ग्रंथालय सेवेमध्ये रस दर्शविला, तर MBMASC मधील संबंधित आकडा २० (१७.९%) होता.

एकूणच, हे स्पष्ट आहे की बहुसंख्य प्रतिसादकर्त्यांनी, विशेषतः CDCC मधील, मोबाइल तंत्रज्ञान-आधारित ग्रंथालय संदर्भ सेवांमध्ये रस दर्शविला, ज्यामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये अशा सेवांची संभाव्य मागणी अधोरेखित झाली.

**तक्ता ६: मोबाईल शैक्षणिक डेटाबेस आणि ई-जर्नल्स**

| Institution | Interested | | Not Interested | | **Total** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | N | % | N | % | N | % |
| CDCC | 222 | 91.0 | 22 | 9.0 | **244** | **100.0** |
| MBMASC | 105 | 93.8 | 7 | 6.3 | **112** | **100.0** |
| **Total** | **327** | **91.9** | **29** | **8.1** | **356** | **100.0** |

तक्ता ६ वरून असे दिसून येते की दोन्ही विद्यापीठांमधील ३२७ (९१.९%) प्रतिसादकर्त्यांनी शैक्षणिक डेटाबेस आणि ई-जर्नल्सच्या मोबाइल आवृत्त्यांमध्ये रस दर्शविला, तर फक्त २९ (८.१%) लोकांनी अशा सेवेमध्ये रस नसल्याचे दर्शविले. एका विद्यापीठाने बारकाईने तपासणी केल्यावर, CDCC मधील २२२ (९१.०%) प्रतिसादकर्त्यांनी शैक्षणिक डेटाबेस आणि ई-जर्नल्सच्या मोबाइल आवृत्त्यांमध्ये रस दर्शविला, तर MBMASC मधील १०५ (९३.८%) प्रतिसादकर्त्यांनी रस दर्शविला. याउलट, CDCC मधील २२ (९.०%) आणि MBMASC मधील ७ (६.३%) प्रतिसादकर्त्यांनी असे दर्शविले की जर त्यांच्या ग्रंथालयांनी शैक्षणिक डेटाबेस आणि ई-जर्नल्सच्या मोबाइल आवृत्त्यांमध्ये रस दाखवला तर त्यांना रस नसेल. एकूणच, डेटा दोन्ही विद्यापीठांमधील प्रतिसादकर्त्यांमध्ये शैक्षणिक डेटाबेस आणि ई-जर्नल्सच्या मोबाइल आवृत्त्यांमध्ये प्रवेश मिळविण्यात तीव्र रस दर्शवितो, ज्यामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये अशा सेवांची संभाव्य मागणी अधोरेखित होते.

**मोबाईल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवा वापरण्याची विद्यार्थ्यांची तयारी**

मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवांसाठी मोबाइल अनुप्रयोग विकसित करताना वापरकर्त्यांच्या दृष्टिकोनाचा विचार करणे आणि सेवा वापरण्याची त्यांची तयारी तपासणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच, अभ्यासाच्या उद्दिष्टांचा एक भाग म्हणून, संशोधकाने विद्यार्थ्यांच्या मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवा वापरण्याची तयारी तपासण्याचाही प्रयत्न केला.

**तक्ता ७: मोबाइल तंत्रज्ञान-आधारित ग्रंथालय सेवांचा वापर**

| Institution | Strongly Disagree | | Disagree | | Neutral | | Agree | | Strongly Agree | | **Total** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | N | % | N | % | N | % | N | % | N | % | N | % |
| CDCC | 9 | 3.7 | 4 | 1.6 | 10 | 4.1 | 123 | 50.4 | 98 | 41.0 | **244** | **100.0** |
| MBMASC | 2 | 1.8 | 9 | 8.0 | 4 | 3.6 | 49 | 43.8 | 48 | 50.9 | **112** | **100.0** |
| **Total** | **11** | **3.1** | **13** | **3.7** | **14** | **3.9** | **172** | **48.3** | **146** | **41.0** | **356** | **100.0** |

तक्ता ७ दर्शवितो की दोन्ही खाजगी महाविद्यालयांमधील ३१८ (८९.३%) प्रतिसादकर्त्यांपैकी बहुतेकांनी "पूर्णपणे सहमत" किंवा "सहमत" केले की ते कुठूनही आणि कधीही मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवा वापरण्यास इच्छुक आहेत. विशेषतः, १७२ (४८.३%) प्रतिसादकर्त्यांनी सहमती दर्शविली, तर १४६ (४१.०%) प्रतिसादकर्त्यांनी जोरदार सहमती दर्शविली. तथापि, कमी प्रमाणात प्रतिसादकर्त्यांनी, एकूण २४ (६.८%) विधानाशी "पूर्णपणे असहमत" किंवा "असहमत" असल्याचे दर्शविले, जे कोठूनही,

कधीही मोबाइल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवा वापरण्यास अनिच्छा दर्शवते. याव्यतिरिक्त, १४ (३.९%) प्रतिसादकर्त्यांनी तटस्थ राहिले.

महाविद्यालय स्तरावरील डेटाचे विश्लेषण केल्यावर असे आढळून आले की, CDCC मधील १२३ (५०.२%) प्रतिसादकांनी कुठूनही, कधीही मोबाईल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवा वापरण्यास सहमती दर्शविली, तर MBMASC मधील ४९ (४३.८%) प्रतिसादकांनी यावर सहमती दर्शविली. त्याचप्रमाणे, CDCC मधील ९८ (४०.२%) प्रतिसादकांनी ठामपणे सहमती दर्शविली, तर MBMASC मधील ४८ (४२.९%) प्रतिसादकांनीही असेच मत व्यक्त केले. याउलट, CDCC मधील १३ (५.३%) प्रतिसादकांनी असहमती दर्शविली किंवा जोरदार असहमती दर्शविली, तर MBMASC मधील ११ (९.८%) प्रतिसादकांनी असहमती दर्शविली. बहुतेक प्रतिसादकांनी कुठूनही आणि कधीही मोबाईल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालय सेवा वापरण्याची आणि वापरण्याची तयारी दर्शविली, जे विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये अशा सेवा स्वीकारण्याकडे अनुकूल कल दर्शवते.

**निष्कर्ष**

सदर अध्यानावरून असे निदर्शनास येते की जगभरातील शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये ग्रंथालय सेवा पुरवण्यासाठी मोबाइल तंत्रज्ञानाचा वापर हा एक नवीन ट्रेंड आहे. कारण तंत्रज्ञान वापरकर्त्यांना त्यांच्या 'Library in Hand' ठेवण्यास सक्षम करते, म्हणजेच, त्यांच्या मोबाइल डिव्हाइसचा वापर करून कुठेही आणि कधीही ग्रंथालय सेवांमध्ये प्रवेश करण्यास सक्षम करते. या संशोधनात शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये CDCC आणि MBMASC या दोन महाविद्यालयीन ग्रंथालयांवर लक्ष केंद्रित करून मोबाइल तंत्रज्ञान ग्रंथालय सेवांचा अवलंब आणि अंमलबजावणी निश्चित करण्याचा प्रयत्न केला गेला. अभ्यासाच्या निष्कर्षांवरून असे दिसून आले की पदवीधर विद्यार्थी आणि ग्रंथालय व्यवस्थापन तसेच दोन्ही ग्रंथालयांच्या गैर-व्यवस्थापन ग्रंथालय कर्मचाऱ्यांमध्ये मोबाइल तंत्रज्ञान-आधारित ग्रंथालय सेवांबद्दल तीव्र जागरूकता आहे. अभ्यासात असे आढळून आले की पदवीधर विद्यार्थी आणि ग्रंथालय व्यवस्थापन दोघांमध्येही मोबाईल तंत्रज्ञान आधारित ग्रंथालय सेवांच्या वापराबद्दल जागरूकता आहे. ग्रंथालय व्यवस्थापनाने एकमताने त्यांच्या ग्रंथालयांमध्ये हे तंत्रज्ञान एकत्रित करण्याची तीव्र इच्छा दर्शविली आणि पदवीधर विद्यार्थ्यांनी मोबाईल तंत्रज्ञान आधारित ग्रंथालय सेवा लागू करण्यासंबंधी समाधान व्यक्त केले.

मोबाईल प्लॅटफॉर्मवर दिल्या जाणाऱ्या ग्रंथालय सेवांबद्दल, विद्यार्थी प्रतिसादकांना मोबाइल ई-जर्नल्स आणि शैक्षणिक डेटाबेस, मोबाईल डिजीटलाइज्ड स्थानिक संस्थात्मक रिपॉझिटरीज, मोबाईल संदर्भ चौकशी सेवा, मोबाईल ऑनलाइन पब्लिक ॲक्सेस कॅटलॉग (MOPAC) आणि मोबाईल इलेक्ट्रॉनिक ग्रंथसंग्रह यामध्ये रुची होती. विद्यार्थ्यांनी पसंत केलेल्या इतर सेवांमध्ये New Arrival साठी एसएमएस अलर्ट, मोबाईल लायब्ररी सूचनात्मक आणि व्हर्च्युअल टूर आणि मोबाईल सोशल मीडिया सेवांचा समावेश केल्याचे वरील अध्यायानावरून दिसून येते.

**References**

1. Armah, A. (2015). Use of Internet Services in Ghanaian University Libraries. African Journal of Library, Archives & Information Science, 19(1).
2. Baro, E., Efe, B., & Oyeniran, G. (2014). Reference inquiries received through different channels: The challenges reference librarians face in university libraries in Nigeria. Reference Services Review, 42(3), 514–529.
3. Bolton Palumbo, L. (2014). Mobile phones in Africa: opportunities and challenges for academic librarians. New Library World, 115(3/4), 179–192.
4. Canuel, R., & Crichton, C. (2011). Canadian academic libraries and the mobile web. New Library World, 112(3/4), 107–120.
5. Harinarayana, N., & Vasantha Raju, N. (2012). Web 2.0 features in university library websites. The Electronic Library, 28(1), 69–88.
6. Jamil, M., Tariq, R.-H., & Jamil, S. (2013). Library Resources: Utilization by Teachers and Students. Bulletin of Education and Research, 35(2), 19–35.
7. Jaradat, M.-I. (2018). Exploring the factors that affect intention to use mobile phones in Jordanian academic libraries. International Journal of Information Technology and Web Engineering (IJITWE), 7(4), 34–49.
8. Kumbhar, S., & Pawar, R. (2014). Mobile-based services: application and challenges: Paper submitted Conference on Changing Trends in Academic Libraries and Librarianship in Digital Environment. Shivaji University Kolhapur, India.
9. Kumekpor, T. (2012). Research methods and techniques of social research. SonLife Press & Services. Liu, Y., & Briggs, S. (2015). A library in the palm of your hand: mobile services in top 100 university libraries. Information Technology and Libraries, 34(2), 133–146.
10. Lo, P., Cho, A., Leung, M., Chiu, D., & Ko, E. (2016). Use of smartphones by art and design students to access library services and learning. Library Hi Tech, 34(2), 224–238.
11. Paul, A., & Mavuso, M. (2020). Old wine in new wineskin: marketing library services through SMS-based alert service. Library Hi Tech, 30(2), 310–320.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

12. Sekyere, K. (2013). Virtual reference service in academic libraries in West Africa. Journal of Library & Information Services in Distance Learning, 5(1–2), 3–9.
13. Shonola, S., Joy, M., & Oyelere, S. (2016). The impact of mobile devices for learning in higher education institutions: Nigerian universities case study. International Journal of Modern Education and Computer Science, 8(8), 43.
14. Simmonds, P., & Andaleeb, S. (2019). Usage of academic libraries: The role of service quality, resources, and user characteristics.
15. Smith, B., Jacobs, M., & Lippincott, J. (2013). A mobile future for academic libraries. Reference Services Review.
16. Washburn, B. (2017). Library mobile applications: what counts as success? Information Outlook, 15(1), 13–15. World Bank. (2012). ICT's delivering home-grown development solutions in Africa. Retrieved from http://go.worldbank.org/L20948QYZ0 retrived on 08/02/2026.
17. Zheng, P., & Ni, L. (2012). Smartphone and next-generation mobile computing. Elsevier.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# भारतीय भाषा, साहित्य आणि ज्ञानपरंपरा यांचे विकसित भारत २०४७ शाश्वत विकासातील योगदान

**शिल्पा मधुकर रामटेके**
पी. एचडी संशोधक,स्नातकोत्तर मराठी विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
**Email:** shilvani832@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180214
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 61-64
February - 2026

**Submitted:** 20 Jan. 2026
**Revised:** 30 Jan. 2026
**Accepted:**15 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

*भारत हा विविधतेने नटलेला देश आहे; येथे असंख्य भाषा, समृद्ध साहित्यपरंपरा आणि प्राचीन ज्ञानपरंपरा एकत्र येऊन भारतीय संस्कृतीला अद्वितीय रूप देतात. विकसित भारत २०४७ ही संकल्पना केवळ आर्थिक प्रगतीपुरती मर्यादित नसून सांस्कृतिक, सामाजिक आणि बौद्धिक विकासालाही समान महत्त्व देते. भाषिक विविधता ही लोकशाही आणि सर्वसमावेशकतेचे प्रतीक आहे; भाषा हे ज्ञानाचे प्राथमिक वाहक असल्याने स्थानिक भाषांमध्ये शिक्षण व संशोधन केल्यास ज्ञान अधिक सर्वसमावेशक आणि लोकाभिमुख होते.*
*साहित्य समाजाला नैतिक व मूल्याधारित दिशा देते, तर पारंपरिक ज्ञानपरंपरा पर्यावरणपूरक जीवनशैली व शाश्वत उपाय सुचवते. वेद-उपनिषदांपासून संत साहित्य आणि आधुनिक दलित साहित्यापर्यंतचा प्रवास समाजाला न्याय, समता आणि नैतिकतेची दिशा दाखवतो. भाषेतून ज्ञान, ज्ञानातून साहित्य आणि साहित्यातून संस्कृती व परंपरेचे जतन शक्य होते.*
*आजच्या डिजिटल युगात या परंपरांचा संवर्धन, पुनराविष्कार आणि आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाशी एकत्रीकरण ही काळाची गरज आहे. भारतीय भाषा, साहित्य आणि ज्ञानपरंपरा हे विकसित भारत २०४७ साठी शाश्वत विकासाचे आधारस्तंभ आहेत आणि त्यांचे संवर्धन व समन्वित धोरणात्मक उपक्रम आवश्यक आहेत*

***बीजशब्द:*** *भारतीय भाषा, साहित्य, ज्ञानपरंपरा, शाश्वत विकास, विकसित भारत २०४७.*

## प्रस्तावना

भारताची सांस्कृतिक ओळख त्याच्या भाषिक, साहित्यिक आणि ज्ञानपरंपरांच्या वैविध्यात रुजलेली आहे. या परंपरांनी केवळ ऐतिहासिक आणि बौद्धिक संपदा निर्माण केली नाही, तर समाजाच्या नैतिक, सामाजिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनाला दिशा दिली आहे. विकसित भारत २०४७ या दृष्टीने शाश्वत विकास साध्य करण्यासाठी या परंपरांचा संवर्धन, पुनराविष्कार आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी समन्वय करणे अत्यावश्यक आहे.

या संशोधन लेखाचा उद्देश भारतीय भाषा, साहित्य आणि पारंपरिक ज्ञानपरंपरांचा शाश्वत विकासाशी असलेला संबंध स्पष्ट करणे आणि विकसित भारत २०४७साठी त्यांचे योगदान अधोरेखित करणे हा आहे. स्थानिक भाषांमध्ये शिक्षण व संशोधन, प्रादेशिक साहित्याचे डिजिटलायझेशन आणि पारंपरिक ज्ञानाचे वैज्ञानिक समायोजन या माध्यमातून ज्ञान अधिक सर्वसमावेशक, लोकाभिमुख आणि व्यवहार्य बनवता येते. वेद-उपनिषदांपासून संत साहित्य आणि आधुनिक दलित साहित्यापर्यंतचा सांस्कृतिक प्रवास समाजात समता,

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*शिल्पा मधुकर रामटेके,पी. एचडी संशोधक,स्नातकोत्तर मराठी विभागराष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर*

**How to cite this article:**
रामटेके. शिल्पा. मधुकर. (2026). भारतीय भाषा, साहित्य आणि ज्ञानपरंपरा यांचे विकसित भारत २०४७ शाश्वत विकासातील योगदान. Journal of Research and Development, 18(2(XIX)), 61–64.
https://doi.org/10.5281/zenodo.19326255

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19326255
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

न्याय आणि नैतिकतेचे मूल्य रुजवतो, तर पारंपरिक कृषी व आरोग्यज्ञान पर्यावरणपूरक उपाय आणि दीर्घकालीन टिकावाचे मार्ग सुचवते.

या लेखात भाषिक संवर्धन, डिजिटल ग्रंथालये, स्थानिक शैक्षणिक पाठ्यक्रम आणि तंत्रज्ञानाद्वारे ज्ञानसंपदेचे एकत्रीकरण यावर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच आयुर्वेद, योग, गणित व खगोलशास्त्र यांसारख्या ज्ञानपरंपरांचा आधुनिक विज्ञानाशी तुलनात्मक विश्लेषण करून त्यांचे आजच्या काळातील उपयुक्तता व धोरणात्मक शिफारसी मांडल्या आहेत. या अभ्यासातून स्पष्ट होते की भारतीय भाषा, साहित्य आणि ज्ञानपरंपरा हे विकसित भारत २०४७ च्या शाश्वत विकासासाठी केवळ सांस्कृतिक वारसा नसून व्यवहार्य आणि धोरणात्मक आधारस्तंभ आहेत.

**भारतीय भाषा, साहित्य आणि ज्ञानपरंपरा यांचे विकसित भारत २०४७ शाश्वत विकासातील योगदान**

भारतीय विचार आणि तत्त्वज्ञानात ज्ञान, प्रज्ञा आणि सत्याचा शोध ही नेहमीच मानवाची सर्वोच्च उद्दिष्टे मानली जातात. प्राचीन भारतात शिक्षणाचे लक्ष्य पूर्ण आत्मज्ञान किंवा मोक्ष होते. प्राचीन भारतातील तक्षशिला, नालंदा, विक्रमशीला, वल्लभी ही अशा जागतिक दर्जाच्या संस्थांनी बहुशाखीय शिक्षण आणि संशोधनाची उच्च मानके तयार केली होती. भारतीय शिक्षण व्यवस्थेने चरक, सुश्रुत, आर्यभट्ट, वराहमीहीर, भास्कराचार्य, ब्रह्मगुप्त, चाणक्य, चक्रपाणि, दत्त माधव, पाणिनी, पतंजली, नागार्जुन, गौतम पिंगल, शंकरदेव, मैत्रेयी , गार्गी आणि थीरवल्लूवर असे अनेक विद्वान निर्माण केले. ज्यांनी गणित, खगोलशास्त्र, धातुशास्त्र, वैद्यकशास्त्र आणि शल्य चिकित्सा, स्थापत्य, अभियांत्रिकी, स्थापत्यविद्या, जहाज बांधणी आणि नौकानयन, योग, ललित, कला, बुद्धिबळ आणि इतर अनेक क्षेत्रातील जागतिक ज्ञानात मोलाची भर घातली. भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञान यांचा जगावर खूप मोठा प्रभाव आहे.

**भारतीय भाषांचे महत्त्व**

**अनुसूचितील भाषा आणि बोली भाषा :** भारताच्या संविधानाने २२ अनुसूचित भाषा मान्य केल्या आहेत. या भाषांबरोबरच शेकडो बोलीभाषा प्रचलित असून त्या लोकजीवनाशी, परंपरांशी आणि सांस्कृतिक ओळखीशी घट्ट जोडलेल्या आहेत.

**अनुसूचितील भाषा -** मराठी, हिंदी, बंगाली, तमिळ, तेलुगू, गुजराती, उर्दू, कन्नड, मल्याळम, पंजाबी, आसामी, ओडिया, संस्कृत, कश्मीरी, सिंधी, डोगरी, मैथिली, संथाली, बोडो, मणिपुरी, नेपाळी, कोकणी.

**बोलीभाषा -** प्रत्येक राज्यात स्थानिक बोलीभाषा प्रचलित आहेत. उदाहरणार्थ, मराठीत वऱ्हाडी, कोकणी, दक्षिणी बोली; हिंदीत अवधी, ब्रज, भोजपुरी; बंगालीत राढी, वरेंद्र; तर तमिळमध्ये कोयंबतूर, मदुराई अशा बोलीभाषा आढळतात.

या भाषांमध्ये स्वतंत्र साहित्यिक परंपरा विकसित झाल्या आहेत. भाषेतून आणि बोली भाषेतील साहित्य सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक सातत्य आणि ज्ञानपरंपरेचे संवर्धन यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

**सांस्कृतिक समृद्धीचे प्रतीक** : प्रत्येक भाषेत लोककथा, गाणी, म्हणी, साहित्य आणि परंपरा दडलेल्या आहेत. मराठीतील भक्ती साहित्य (ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा) समाजाला आध्यात्मिकता आणि समतेचा संदेश देते, तर तमिळ संगम साहित्य प्राचीन समाजजीवनाचे दर्शन घडवते. या विविधतेमुळे भारतीय समाजाला बहुआयामी सांस्कृतिक वारसा लाभला आहे.

**स्थानिक भाषेमधील शिक्षणाचे महत्व** : मातृभाषेत शिक्षण दिल्यास विद्यार्थ्यांना ज्ञान अधिक सखोल, सहज आणि सर्वसमावेशक पद्धतीने मिळते. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरी ने भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान मराठी भाषेत मांडले, ज्यामुळे सामान्य लोकांनाही ते समजले. स्थानिक भाषेत शिकवलेले ज्ञान समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचते आणि शैक्षणिक विषमता कमी होते.

**डिजिटल युगातील भाषांचे संवर्धन :** आजच्या काळात भाषांचे डिजिटायझेशन, ई-ग्रंथालये, भाषांतर साधने आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित अनुप्रयोग यांचा वापर करून भाषांचे संवर्धन शक्य आहे. उदाहरणार्थ, मराठी विश्वकोश ऑनलाइन उपलब्ध करून दिल्याने संशोधकांना तर यामुळे मदत होते; मराठी भाषेविषयी रुची असणारे लोक देखील विश्वकोशाचा आपल्या भाषिक ज्ञानवर्धनासाठी उपयोग करू शकतील. यामुळे भाषांचे जतन तर होतेच, पण जागतिक स्तरावर त्यांचा प्रसारही होतो.

**भविष्यातील भूमिका** : विकसित भारत २०४७ साध्य करण्यासाठी भारतीय भाषांचा वापर प्रशासन, संशोधन, तंत्रज्ञान आणि शिक्षण क्षेत्रात वाढवणे आवश्यक आहे. स्थानिक भाषांमध्ये संशोधन लेखन, साहित्य निर्मिती आणि ज्ञानपरंपरेचे डिजिटायझेशन केल्यास ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचेल आणि शाश्वत विकासाला गती मिळेल.

**साहित्यिक परंपरेचे महत्त्व**

प्राचीन ग्रंथाचा वारसा : वेद, उपनिषद, रामायण आणि महाभारत यांसारख्या ग्रंथांनी भारतीय समाजाला नैतिकता, तत्त्वज्ञान आणि जीवनमूल्ये दिली. हे ग्रंथ केवळ धार्मिक नाहीत तर सामाजिक आणि सांस्कृतिक मार्गदर्शक आहेत.

भक्ती साहित्याची भूमिका : संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी द्वारे भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान मराठीत मांडले, ज्यामुळे सामान्य लोकांनाही ते समजले. संत तुकारामांच्या अभंगांमध्ये समता, भक्ती आणि सामाजिक न्यायाचा संदेश आहे. कबीर, मीरा,रामदास, नामदेव, एकनाथ, तुकाराम ,

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

निवृत्ती, सोपान, मुक्ताई, बहिणाबाई, सावतामाळी, चोखामेळा यांसारख्या संतांनी लोकभाषेत साहित्य रचून समाजाला आध्यात्मिक आणि नैतिक दिशा दिली.

लोकसाहित्य आणि ओळख : लोककथा, ओव्या, गाणी आणि म्हणी या समाजाच्या जीवनशैलीचे प्रतिबिंब आहेत. उदाहरणार्थ, मराठीतील ओव्या सांस्कृतिक स्त्रियांच्या जीवनातील अनुभव आणि भावविश्व व्यक्त करतात. या साहित्यामुळे समाजातील विविध घटकांना आपली ओळख आणि अभिव्यक्ती मिळते.

**आधुनिक साहित्याचा सामाजिक दृष्टिकोन** : आधुनिक काळात साहित्याने कादंबरी, कविता, नाटक, लघुकथा, निबंध, समीक्षा, अनुवाद, दलित व स्त्री साहित्य अशा विविध प्रकारातून कधी **शृंगार** म्हणजे प्रेम, सौंदर्य, आकर्षण; कधी **हास्य** म्हणजे विनोद, आनंद; कधी **करुण** म्हणजे दुःख, सहानुभूती; कधी **रौद्र** म्हणजे क्रोध, संताप; कधी **वीर** म्हणजे शौर्य, धैर्य; कधी **भयानक** म्हणजे भय, भीती; कधी **बीभत्स** म्हणजे घृणा, विकर्षण; कधी **अद्भुत** म्हणजे आश्चर्य, विस्मय; तर कधी **भयाण शांत** म्हणजे शांती, समाधी, आत्मिक स्थैर्य यांसारख्या भावनांचा विस्तार केला आहे.इतकेच नव्हे तर साहित्यातून सामाजिक वास्तवाची जाणीव आणि स्वविकासाची प्रेरणा मिळते; त्यामुळे आस्वादकाला ज्ञान मिळून जीवन जगण्याची नवी दिशा प्राप्त होते. आधुनिक साहित्य हे विकसित भारताच्या २०४७ च्या ध्येयाकडे वाटचाल करणारे प्रेरक साधन आहे.

**शाश्वत विकासाशी संबंध** : साहित्य समाजाला मूल्याधारित विचार देऊन शाश्वत विकासाला प्रेरणा देते. पर्यावरण संरक्षण, सामाजिक समता आणि नैतिकता यांसारख्या विषयांवर साहित्यिक कृती समाजाला जागरूक करतात. उदाहरणार्थ, आधुनिक कवितांमध्ये पर्यावरणीय संकटांवर भाष्य केले जाते, ज्यामुळे जनजागृती होते. कथा, कादंबरी, नाटक, एकांकिका च्या माध्यमातून समाजतील समस्या दृष्टीगत होते. जनप्रबोधनासाठी साहित्य हे अतिशय उपयुक्त साधन आहे.

**ज्ञानपरंपरेचे महत्त्व**

**आयुर्वेद आणि योग** : आयुर्वेद ही भारतीय वैद्यक परंपरा शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधण्यावर भर देते. आजही आयुर्वेदिक औषधे आणि उपचार पद्धती पर्यावरणपूरक आणि शाश्वत आरोग्य व्यवस्थेसाठी उपयुक्त आहेत. योग ही भारतीय ज्ञानपरंपरेतील देणगी असून, ती शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारते. पतंजली योगसूत्र हे याचे मूलभूत ग्रंथ आहे.

**गणित आणि खगोलशास्त्र** : आर्यभट, भास्कराचार्य यांसारख्या विद्वानांनी गणित आणि खगोलशास्त्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. शून्याचा शोध, दशमान पद्धती, ग्रहणांचे गणितीय विश्लेषण ही भारतीय ज्ञानपरंपरेची वैशिष्ट्ये आहेत. ही परंपरा आधुनिक विज्ञानाच्या विकासासाठी आधारभूत ठरली.

**वास्तुशास्त्र आणि पर्यावरणपूरक जीवनशैली** : वास्तुशास्त्र ही भारतीय परंपरा घर, मंदिर आणि नगररचना करताना नैसर्गिक ऊर्जेचा योग्य वापर करण्यावर भर देते. ही परंपरा शाश्वत विकासाशी थेट जोडलेली आहे कारण ती पर्यावरणाशी सुसंगत जीवनशैली सुचवते.

**सामाजिक तत्त्वज्ञान** : "वसुधैव कुटुंबकम्" ही भारतीय संकल्पना संपूर्ण जगाला एक कुटुंब मानते. ही विचारधारा जागतिक शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी सुसंगत आहे. समता, न्याय आणि सामूहिक कल्याण यावर भर देणारी ही परंपरा आजच्या काळात अधिक महत्त्वाची ठरते.

**आधुनिक काळातील पुनराविष्कार** : पारंपरिक ज्ञानाचे आधुनिक विज्ञानाशी एकत्रीकरण केल्यास शाश्वत विकासाला गती मिळते. उदाहरणार्थ, आयुर्वेदिक औषधांचे वैज्ञानिक संशोधन, , भारतीय गणितीय संकल्पनांचा संगणकशास्त्रात वापर तसेच योगाचे आंतरराष्ट्रीय प्रसारामुळे भारताची ज्ञानपरंपरा जागतिक आरोग्य चळवळीचा भाग झाली आहे.

**उपक्रम व धोरणात्मक शिफारसी**

- मातृभाषा-आधारित शिक्षण: प्राथमिक व माध्यमिक स्तरावर स्थानिक भाषांमध्ये विज्ञान व सामाजिक शास्त्रांचे पाठ्यक्रम राबवणे.
- डिजिटल ग्रंथालय व ई-आर्काइव्ह: प्रादेशिक साहित्य, लोककथा व पारंपरिक ज्ञानाचे डिजिटलीकरण व सार्वजनिक प्रवेश सुनिश्चित करणे.
- परंपरागत कृषीज्ञानाचे आधुनिक प्रयोग: जलसंधारण, माती संवर्धन व जैवविविधता टिकविण्यासाठी स्थानिक पद्धतींना वैज्ञानिक पद्धतींनी समायोजित करणे.
- भाषा-आधारित संशोधन निधी: केंद्र व राज्य पातळीवर स्थानिक भाषांमध्ये संशोधन, अनुवाद व शिष्यवृत्तींसाठी समन्वयित अनुदाने.
- बहुभाषिक शिक्षण मॉडेल: मातृभाषा-आधारित प्रारंभिक शिक्षण आणि द्विभाषिक/बहुभाषिक कौशल्यांचा प्रसार.
- डिजिटल एकत्रीकरण व तंत्रज्ञान समर्थन: OCR(अक्षर ओळख तंत्रज्ञान), बहुभाषिक डेटाबेस व AI-आधारित भाषांतर साधने तयार करून ज्ञानसंपदा संशोधन व उद्योगाशी जोडणे.

**समारोप**

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

भारतीय भाषा, साहित्य आणि ज्ञानपरंपरा या केवळ सांस्कृतिक वारसा नसून शाश्वत विकासाचे आधारस्तंभ आहेत. "विकसित भारत २०४७" ही संकल्पना साध्य करण्यासाठी या परंपरांचा पुनराविष्कार, संवर्धन आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी एकत्रीकरण आवश्यक आहे. स्थानिक भाषांमध्ये शिक्षण व संशोधन केल्यास ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचेल. संत साहित्य, दलित साहित्य आणि आधुनिक साहित्य समाजाला मूल्याधारित दिशा देऊन सामाजिक न्याय व पर्यावरणीय जागरूकता निर्माण करते. आयुर्वेद, योग, गणित, वास्तुशास्त्र यांचा आधुनिक विज्ञानाशी एकत्रित वापर शाश्वत विकासाला गती देतो. भाषांचे डिजिटायझेशन, साहित्याचे ई-आर्काइव्ह आणि ज्ञानपरंपरेचे जागतिक प्रसारण ही काळाची गरज आहे.

यावरून स्पष्ट होते की, भारतीय परंपरा ही केवळ भूतकाळातील स्मृती नसून भविष्याच्या शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासासाठी मार्गदर्शक आहेत. विकसित भारत २०४७ चे लक्ष्य साध्य करण्यासाठी या परंपरांचा उपयोग करून आधुनिकतेशी सुसंगत अशी नवी दिशा निर्माण करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

1. भारतीय भाषांचे डिजिटायझेशन, स्थानिक भाषांमध्ये शिक्षण व संशोधनाचा विस्तार केल्यास ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचेल.
2. संत साहित्य, आधुनिक दलित साहित्य आणि पर्यावरणीय साहित्य समाजाला मूल्याधारित दिशा देऊन शाश्वत विकासाला प्रेरणा देते.
3. आयुर्वेद, योग, गणित, वास्तुशास्त्र यांसारख्या परंपरांचा आधुनिक विज्ञानाशी एकत्रित वापर शाश्वत विकासासाठी उपयुक्त ठरतो.
4. भाषिक व साहित्यिक विविधता ही सामाजिक समता, न्याय आणि सांस्कृतिक ऐक्याचे प्रतीक आहे, जी विकसित भारतासाठी आवश्यक आहे.
5. ई-आर्काइव्ह, भाषांतर साधने आणि AI-आधारित अनुप्रयोगांद्वारे भारतीय भाषांचे व ज्ञानपरंपरेचे जागतिक स्तरावर प्रसारण शक्य आहे.
6. भारतीय भाषा, साहित्य आणि ज्ञानपरंपरा या केवळ सांस्कृतिक वारसा नसून शाश्वत विकासाचे आधारस्तंभ आहेत. त्यांचे संवर्धन व पुनराविष्कार ही काळाची गरज आहे.

**संदर्भ**

१. शर्मा, रामशरण. *भारताचा प्राचीन इतिहास.* ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
२. बाशाम, ए. एल. *The Wonder That Was India.* सिडनी: पिकाडोर.
३. कोसांबी, डी. डी. *An Introduction to the Study of Indian History.* मुंबई: पॉप्युलर प्रकाशन.
४. थापर, रोमिला. *भारतीय संस्कृतीचे प्रवाह.* ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
५. थापर, रोमिला. *सांस्कृतिक भूतकाळ: भारतीय इतिहासावरील निबंध.* नवी दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
६. झेलिओट, एलेनॉर. *अस्पृश्य ते दलित: आंबेडकर चळवळीवरील निबंध.* नवी दिल्ली: मनोहर पब्लिशर्स, 1992.
जोशी, प्र. न. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

Original Article

# लोकसंस्कृती, आदिवासी परंपरा आणि मौखिक इतिहास

**श्री. यशवंत ढवळा भांडकोळी[1], प्राचार्य, डॉ. शंकर शिवाजी मुंडे[2]**
[1]प्रमुख, मराठी विभाग, (संशोधक विद्यार्थी) शेठ ज. नौ. पालीवाला वाणिज्य महाविद्यालय,
विज्ञान आणि कला महाविद्यालय पाली,ता. सुधागड, जि. रायगड
[2] (मार्गदर्शक) सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग, प्रमुख, कला महाविद्यालय नांदूर (घाट),ता. केज, जि. बीड
**Email**: ydbhandkoli@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180215
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(XIX)
Pp. 65-69
February - 2026
**Submitted:** 20 Jan. 2026
**Revised:** 30 Jan. 2026
**Accepted:**15 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

**सारांश (Abstract):**

लोकसंस्कृती, आदिवासी परंपरा आणि मौखिक इतिहास हे समाजाच्या सांस्कृतिक ओळखीचे महत्त्वाचे घटक आहेत. लोकसंस्कृतीमध्ये लोककला, लोकगीते, नृत्य, सण-उत्सव आणि परंपरा यांचा समावेश होतो, जे पिढ्यान्पिढ्या चालत आलेले असतात. आदिवासी समाज आपल्या जीवनशैलीत निसर्गाशी सुसंगत परंपरा, श्रद्धा आणि रूढी जपतो, ज्यामध्ये त्यांच्या सामाजिक संरचना आणि सांस्कृतिक मूल्यांचे प्रतिबिंब दिसते.

मौखिक इतिहास (Oral History) हा लेखी नोंदींच्या अभावात भूतकाळ समजून घेण्यासाठी एक महत्त्वाचा स्रोत आहे. कथा, दंतकथा, गीते आणि म्हणी यांच्या माध्यमातून इतिहास, परंपरा आणि अनुभव जतन केले जातात. विशेषतः आदिवासी समाजात मौखिक परंपरा ही ज्ञानसंवर्धनाची प्रमुख पद्धत आहे.

या तिन्ही घटकांच्या अभ्यासामुळे सांस्कृतिक विविधतेचे जतन, समाजाच्या मुळांची ओळख आणि ऐतिहासिक घटनांचे पर्यायी दृष्टिकोन समजून घेण्यास मदत होते. तसेच, आधुनिकतेच्या प्रभावामुळे या परंपरांचे जतन आणि संवर्धन करणे अत्यंत आवश्यक बनले आहे.

**मुख्य शब्द :** लोकसंस्कृती, आदिवासी परंपरा, मौखिक इतिहास, लोककला, लोकगीते, लोकनृत्य, सण-उत्सव, परंपरा व रूढी, सांस्कृतिक वारसा, वारली कला, निसर्गाशी नाते

**प्रस्तावना :**

लोकसाहित्याच्या अभ्यासात लोकसंस्कृती, आदिवासी परंपरा आणि मौखिक इतिहास यांचा अन्योन्य संबंध आहे. लोकसाहित्यात समूहमनाचा आविष्कार झालेला असतो. लोकसाहित्य हा शब्द 'लोक' आणि 'साहित्य' अशा दोन पदांच्या संधीतून निर्माण झाला आहे. 'लोक' या शब्दांमध्ये परंपरागत जीवन प्रवाहातील स्थळ - काल - प्रदेश, समूहजीवन, संस्कृती, भाषा यांचा अंतर्भाव झालेला आहे. म्हणून आदिवासी लोकसंस्कृतीचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, आदिवासींच्या दैनंदिन जीवन व्यवहाराचे सामूहिकरित्या जपलेले आचार - विचार, जीवन जगण्याच्या पद्धती आणि पिढयान पिढयांपासून मौखिक परंपरेने एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे हस्तांतरित होणारे लोकसंचित हीच आदिवासी समाजाची लोकसंस्कृती आहे. ही लोकसंस्कृती मौखिक वाङ्मयाने चिरकाल टिकून ठेवली आहे. म्हणून आदिवासी आणि निसर्ग यांचा घनिष्ट संबंध आहे. निसर्गाच्या सानिध्यात जीवन जगताना अनेक घटना घटितांचा अनुभव त्यांच्या पाठीशी असतो.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*श्री. यशवंत ढवळा भांडकोळी,प्रमुख, मराठी विभाग, (संशोधक विद्यार्थी) शेठ ज. नौ. पालीवाला वाणिज्य महाविद्यालय, विज्ञान आणि कला महाविद्यालय पाली,ता. सुधागड, जि. रायगड*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19326290
OPEN ACCESS

**to cite this article:**
भांडकोळी. यशवंत. ढवळा. & मुंडे. शंकर. शिवाजी. (2026). लोकसंस्कृती, आदिवासी परंपरा आणि मौखिक इतिहास. Journal of Research and Development, 18(2(XIX)), 65–69. https://doi.org/10.5281/zenodo.19326290

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

निसर्गातील या घटनाचे ते स्वानुभवातून सूक्ष्म निरीक्षण करतात. ते त्यांच्या जीवन जगण्याचे फलित असते. निसर्गाच्या सान्निध्यात राहून त्यांच्या स्वभावाची घडण झालेली असते. त्यामुळे कितीही मोठे संकट आले तरी ते खचून जात नाहीत. त्यामुळे त्यांच्या संस्कृतीमध्ये मानवतावाद, भूतदयावाद परंपरेने ठासून भरलेला आहे.

आदिवासी हा आदिम कालापासून या भूमीवर सुख समाधानाने जीवन जगत आहे. त्यांची प्राचीन अशी मानवतावादी, भूतदयावादी संस्कृती आहे. त्या काळात त्यांची विविध ठिकाणी समृद्ध अशी स्वतंत्र राज्य अस्तित्वात होती. परंतु खैबर खिंडीतून आर्यांनी भारतात गुरे चारण्याच्या निमित्ताने प्रवेश केला. या ठिकाणी बेसावध असणाऱ्या अनार्यांवर शास्त्रानिशी हल्ला केला. अशा बेसावध अवस्थेत असलेल्या अनार्यांचा पराभव झाला. आदिवासींची स्वतंत्र राज्य लयास गेली. आर्य सुपीक प्रदेशात राहू लागले. ऐषआरामात जीवन जगू लागले. तर आदिवासींनी डोंगरदऱ्यांचा आश्रय घेऊन रानातील रानमेवा आणि कंदमुळे खाऊन जगू लागले. आर्यांच्या आगमनानंतर लोक आणि नागर अशा दोन संस्कृती उदयास आल्या. या संदर्भात लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रभाकर मांडे म्हणतात, "भारतात आर्यांचे आगमन झाल्यानंतर येथील आर्येतर जमातींशी प्रारंभी त्यांचा संघर्ष झाला. हा संघर्ष केवळ दोन भिन्न जमातींमधील नव्हता तर या दोन जमाती भिन्न संस्कृतीच्या पुरस्कर्त्या होत्या. याचा अर्थ असा की, हा दोन संस्कृतीमधील, वृत्तींमधील संघर्ष होता. याचा परिणाम म्हणून वेद आणि वेदबाह्य अशी परिस्थिती निर्माण झाली. वेद मानणारे आर्य, वेद न मानणाऱ्या इतर जमातींना लोक या नावाने ओळखू लागले.[१]" डॉ. मांडे यांचे हे विधान आदिवासी संस्कृतीतील समूहजीवनाला प्राधान्य देणारे आहे. आर्यांनी या देशात येऊन येथील मूलनिवासींवर कशा प्रकारे हल्ले करून त्यांना गुलाम केले. याचे परखड वास्तव मांडले आहे. तसेच 'लोक' या शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. संजय लोहकरे म्हणतात, "लोकसाहित्य हा शब्द 'लोक' आणि 'साहित्य' या दोन पदांनी बनलेला आहे. लोक म्हणजे 'परंपरागत जीवन प्रवाहात एकजिन्सीपणाने स्थळ, काल, सापेक्षतेने, विविधतेने आपले अस्तित्व प्रगट करीत परिवर्तनशीलतेने जगणारा मानवी समूह आहे."[२] डॉ. लोहकरे यांच्या वरील विधानातून आदिवासी समाजाच्या परंपरा, रूढी, रीतीरिवाज, आचार - विचार, समूहजीवन, धर्मधारणा या वर्तनसिद्ध अविष्काराची साक्ष देणारी आहे. हे लोकवाङ्मय मौखिक परंपराने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होणारे लोककथा, लोकगीते, सण - उत्सव, लोककला हा त्यांच्या लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग आहे.

आदिवासी आणि लोककथा यांचा अन्योन्य संबंध आहे. मानव जन्माच्या इतिहासापासून या लोककथा त्यांचा सहवास करत आल्या आहेत. त्या काळानुरूप बदलल्या, प्रवाही झाल्या आणि परिपुष्टही होत गेल्या आहेत.

ज्या काळी आदिवासींच्या डोंगरदऱ्यात मनोरंजनाची कोणतीच साधने उपलब्ध नव्हती. अशावेळी दिवसभर शेतीत कष्ट करून आल्यानंतर संध्याकाळच्या वेळी अंगणात आगटी पेटवून विविध विषयांवर गप्पा रंगत असायच्या. त्यावेळी आबालवृद्धापासून लहान - थोरांपर्यंत सर्व वयोगटातील स्त्री - पुरुष यावेळी सहभागी असायचे. त्यावेळी रोचक, प्रबोधनपर लोककथा सांगितल्या जात असत. त्यामुळे मोठया माणसांना विचारप्रवृत करणाऱ्या या लोककथा आहेत. तर त्यासोबतच लहान मुलांवर सुसंस्कार घडवून मनोरंजन केले जात होते. अशा प्रत्येक आदिवासी जमातीच्या प्रादेशिकतेनुसार वेगवेगळया आशय - विषयांनी त्या समृद्ध असलेल्या दिसून येतात. आदिवासी लोककथेच्या या समृद्ध दालनाविषयी लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. विनायक तुकाराम म्हणतात, “आदिवासी लोककथा म्हणजे आदिवासी लोकसाहित्याच्या महानगरातली एक भव्य, गगनचुंबी व चित्तवेधक मिनार होय. आदिवासी लोकसाहित्याच्या राजगृहातील एक कोरीव व नक्षीदार स्तंभ म्हणजे आदिवासी लोककथा.”[३] डॉ. तुमराम यांचे वरील विधान लक्षात घेतले तर शकडो वर्षापासून मौखिक परंपरेने त्या लोकमानसात रुजलेल्या आहेत. महाराष्ट्रातील एकूण ४७ जमातींच्या विविध आशय - विषयांनी समृद्ध असलेल्या या लोककथा आहेत. यापैकी आदिवासी महादेवकोळी यांच्या महादेव नावासंबंधीची प्रातिनिधीक कथा पाहण्यासारखी आहे –

“महादेवाचे दोन भक्त होते. त्यापैकी एक निषाद आणि दुसरा ब्राह्मण. निषाद भक्त रोज भक्तिभावाने महादेवाची पूजा करीत असे. ब्राह्मण भक्तही देवाला आवडीचा नैवेद्य देई. मात्र निषाद भक्ताकडून देवाला रोजच्या रोज नैवेद्य मिळत नसे. एके दिवशी 'मीच कसा श्रेष्ठ भक्त?' म्हणून दोघांत भांडण जुंपते. ते पाहून महादेवाने दोन्ही भक्तांची परीक्षा घेण्याचे ठरविले. पूजेच्या वेळी दोन्ही भक्त हजर असताना देवाने चमत्कार दाखविला. एकाएकी देऊळ हलू लागले आणि ते पडण्याचा आभास निर्माण केला. तेवढयात वीज कडाडावी तसा मोठा आवाज झाला. या भीतीने ब्राह्मण भक्ताने तेथून पळ काढला. निषाद भक्त मात्र घाबरला नाही. देऊळ पडल्यावर महादेवाची पिंड उद्ध्वस्त होईल, ह्या भीतीपोटी त्याने पिंडीला कवटाळून धरलेले. ह्या प्रसंगावरून खऱ्या भक्ताची पारख झाली. महादेवाने तत्काळ प्रकट होऊन निषाद भक्ताला सांगितले, 'हे भक्ता! तुझ्यासारखा अढळ भक्ताच्या वंशाची वेल वाढव...” त्यामुळे पुढे जी वंशवेल वाढली, तीच आजची कोळी महादेव जमात होय.[४]"

वरील कोळी महादेवाची प्रातिनिधिक कथा बघितली, तरी आपल्या लक्षात येईल की, अशाच ४६ जमातींच्याही उत्पत्तिकथा सांगण्यात आल्या आहेत. त्या लोककथांतधून काही ना काही बोध केला आहे.

आदिवासी समाज अतिशय दारिद्र्यमय जीवन जगत आहे. तरीही सण उत्सवामध्ये त्यांच्या जीवनात आनंदाला उधाण येते. ते दिवसभर काबाडकष्ट करतात. दमून, थकून संध्याकाळी घरी येतात. सणाच्या दिवशी संध्याकाळी सर्वजण समूहाने उत्सवात, आनंदाने सहभागी होतात. या उत्सवात ते गातात, नाचतात. अशा प्रसंगी ते आपले गरिबी, दुःख विसरून जातात. लहान - मोठे, गरीबी - श्रीमंती

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

विसरून धुंद होऊन रात्रभर नाचतात. ढोल - ताशे, तारपा या वाद्यांवर ताल धरतात. तेव्हा पाहणाऱ्यांच्या डोळ्याचे पारणे फिटते. पाहणारे अचंबित होऊन पाहतात. यासंदर्भात लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासिका सरोजिनी बाबर म्हणतात, ........ ""रंगीबेरंगी पानाफुलांच्या नेत्रदीपक झुपक्यांची मनोहारी नि देखणी सजावट अंगांगावर धारण करणाऱ्या महावस्त्रांना राजखुशीने पेललेल्या दऱ्याखोऱ्यांतील दुनिया म्हणजे आदिवासींची दुनिया! शहरापासून लांब दूरवर असलेल्या ह्या दुनियेतील माणसं हौसे - मौजेने ऐसपैस मैदानात येऊन नाचायला आणि गायाला लागली म्हणजे धरित्रीच्या अंगावर समाधानाचे रोमांच फुलू लागतात. अशा वेळी पहाडी मुलखातील मंद शीतल वारा शीळ घालीत धावून पुढे येतो. पानाफुलांतील सळसळ पार्श्वसंगीत उभं करते!... मग निजायला धरित्री, उशाला धोंडा अन् पांघरायला आभाळ घेत निसर्गाच्या कुशीत वावरताना ही मंडळी एवढी आनंदी कशी? यातलं गणित काही केल्या सुटत नाही. आदिवासींची ही दुनिया अद्भुततेचे पंख ल्यालेली गंधर्वकन्या आहे, ती देखणी तशीच मोहमयीही आहे....."[५]

सरोजिनी बाबर यांचे वरील विधान अतिशय समर्पक आहे. अशा प्रसंगी आदिवासी आपले सर्वस्व विसरून बेधुंद होऊन गातात, नाचतात. त्याचे प्रातिनिधीक उदाहरण म्हणजे आदिवासी महादेवकोळी जमातीतील होळी या सणाचे लोकगीत नमुन्यादाखल पाहण्यासारखे आहे –

डांगाणातील आदिवासी समाजाच्या 'होळी' या सणाचा पहिला दिवस म्हणजे बारक्या (छोटया) होळीचा होय. या दिवशी सकाळी प्रत्येकजण लवकर उठून आपआपल्या तयारीला लागतात. घरातील स्त्रिया पहाटे आंघोळ करून घराभोवतीच्या परिसराची साफसफाई करतात. अंगण, घर शेणाने सारवतात. त्यानंतर स्वयंपाक, पाण्याच्या तयारीला लागतात. घरातील लहान मोठे पुरूष मंडळी सकाळी लवकर आंघोळ करून गावाच्या चावडीवर किंवा रणांगणावर (गावातील मध्यभागी असलेल्या मोकळया जागेत कि जिथे वेगवेगळे खेळ खेळले जातात असे पटांगण) जमा होतात. आज बारक्या होळीचा दिवस असल्याने सर्वजण होळी पेटवण्याच्या पारंपरिक जागेवर साफसफाई करण्यासाठी जातात. सर्व परिसराची स्वच्छता झाली की मग आपआपल्या घरी जातात.

सकाळच्या न्येहऱ्या (जेवण) झाल्या की मग सर्वजण पुन्हा चावडीवर जमा होतात. एकत्र बसून मग बारक्या होळीच्या दिवसाचे नियोजन केले जायचे. बारक्या होळीला येहळयाचा खांब परंपरेपासून आणला जातो. मग तो खांब कोणी आणि कुठे पाहिला आहे? तो खांब कोण कोणा आणि किती जणांनी आणायला जायाचे याचे नियोजन केले जात असे. कोणत्या गावाच्या शिवत आहे. खांब आणायला संध्याकाळी चार – पाच वाजता ढोल – ताशे घेऊन जात असत. मग वाजवणारे काही जण आपल्याच शिवत थांबत असत. खांब तोडायला मोजकीच मंडळी जाऊन तोडून त्याची साळसूळ करून खांद्यावर आल्हाद उचलून आपल्या शिवत घेऊन येत. आपल्या शिवत खांब घेऊन आले की मग विजयी भावनेने ढोल – ताशे वाजवून गावाकडे निघत असत. सोबत आलेली तरूण मंडळी प्रत्येकजण एक – दोन कवळया, कोणी साबरा, कोणी गवत, गवऱ्या, खाकऱ्या घेऊन देव – देवींच्या नावाने जय जयकार करत, घोषणा देत झावळा पडता पडता होळीच्या माळावर तो खांब खांद्यावर घेऊन येत. मग कोतवाल किंवा जागल्या अनुभवी आणि जाणत्या मंडळीला बोलवत असे. होळी रचण्याची लगबग सुरू होत असे. खांब रोवण्यासाठी दर (खड्डा) खोदला जात असे. दर खणतात तोपर्यंत खांद्यावर आल्हाद असलेल्या खांबाला गावातील सर्व घराघरांतील पापडया बांधल्या जात असत. दर खणून झाल्यावर मग पाटील हळद, कुंकु, तांदुळ, पणती पेटवलेल्या ताटाने ओवाळून पारंपारिक पध्दतीने पुजा करत असे. मग दरात पैसे टाकून खांब उभा करण्यापूर्वी कुणाच्या पापडया राहिल्या का? अशी विचारणा होत असे. सर्वांच्या पापडया खांबाला बांधल्या की मग खांब रोवला जातो.



(बारकी (छोटी) होळी पेटविण्याचे छायाचित्र)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

यावेळी तिथे जमलेल्या आयाबाया आणि मुली **होळी रचण्याचे गाणी** म्हणतात. नमुन्या दाखल एक गाणे –

"पार काय बांधिला **सुपारीचा** । पार काय बांधिला सुपारीचा ।। धृ ।।
त्याही पारावरी होळयाआय उभी । होळयाआयचा भ्रतार देवराजा ।
होळयाआयचा भ्रतार देवराजा ।
पार काय बांधिला **खोबऱ्याचा** । पार काय बांधिला खोबऱ्याचा ।
त्याही पारावरी होळयाआय उभी । होळयाआयचा भ्रतार देवराजा ।
होळयाआयचा भ्रतार देवराजा ।
पार काय बांधियला **खारकाचा** । पार काय बांधियला खारकाचा ।
त्याही पारावरी होळयाआय उभी । होळयाआयचा भ्रतार देवराजा ।
होळयाआयचा भ्रतार देवराजा ।
पार काय बांधिला **कुकवाचा** । पार काय बांधिला कुकवाचा ।
त्याही पारावरी होळयाआय उभी । होळयाआयचा भ्रतार देवराजा ।
होळयाआयचा भ्रतार देवराजा ।"[६]

होळयाआयच्या स्वागतासाठी सुपारी, खारीक, कुंकु यांचे पार बांधून तिची सजावट केली जाते. त्यावेळी ही सजावट होळयाआयचा पती तिथे प्रत्यक्ष येऊन पाहतो आहे. अशी कल्पना करून हे गीत रचले आहे. अशी आशयसंपन्न असलेली ही लोकगीते म्हणजे अनाम मालिनीच्या भावगाथाच आहेत. असे म्हणता येईल. या लोकगीतामध्ये लय, ताल, आणि प्रतीक, प्रतिमांचा अनोखा मिलाप झालेला दिसून येतो. (हे होळयाआयचे लोकगीत – १. धोंडाबाई सोमा भांडकोळी २. कौसाबाई गणपत नाडेकर ३. लुमाबाई बाबूराव नाडेकर ४. व्दारकाबाई गोविंद भांगरे यांच्या मूलसंदर्भातून प्रत्यक्ष घेतले आहे.) यावेळी ढोल ताशे मोठ मोठयाने वाजविले जात असत. जेणेकरून गावातील सर्वांना होळी पेटवण्याची तयारी झाल्याची जाणिव करून दिली जात असे. तो एक सुचक इशार असे. होळीचा खांब रोवला की मग गावातील जुनेजाणते अनुभवी माणसे होळीभोवती कवळया, साबरा, वाळलेले गवत, रचतात. होळी रचून झाली की होळी पेटविण्याचा मान पाटलाचा असे. पाटलाचा हाताने होळी पेटली की आयाबाया गाणे म्हणतात ते असे –

"असा सणामधी सण । सण शिमग्याचा आला ऽऽ...२
सण शिमग्याचा आला ऽऽ...२
अशी दादाची आई बोले । सई बाईला आणाऽऽया ।
हौशीच बंधू याना सजयिला घोडा। वर चढयिला जिनाऽऽऽ...
बंधू चालला हौशी ।धृ।..२
लागं पहिल्या वनाला । तोही वन वलांडिलाऽऽऽ..
आला बाईच्या गावाला ।धृ।..२"[७]

(हे गाणे १. कौसाबाई गणपत नाडेकर २. लुमाबाई बाबूराव नाडेकर ३. व्दारकाबाई गोविंद भांगरे यांच्या मुलसंदर्भातून घेतले आहे.)

पेटलेल्या होळीतील खांब खाली पडून द्यायचा नाही. पेटत्या होळीतून हा खांब पकडण्यासाठी तरूणांमध्ये चढाओढ असते. खांब आल्हाद पकडणाऱ्याला विशेष मान असतो. खांब जाळातून आल्हाद पकडल्यांतर होळयाआय भोवती पाच फेऱ्या मारल्या जातात. हा खांब पूर्व दिशेला पडला पाहिजे असा पारंपारिक संकेत आहे. मग सर्वजण त्या खांबाचा आणि होळीतील अंगारा घरी घेऊन जातात. होळी पेटल्यानंतर प्रत्येकजण आपआपल्या घरी जाऊन होळयाआयला हळद, कुंकू, तांदूळ, पेटवलेली पणती, ताटत पैसे टाकून ओवाळतात. एका हातात ताट आणि दुसऱ्या हातात अन्सूट पाण्याचा तांब्या, पुरण पोळी, साखरेची गाठी, खोबऱ्याची वाटी असा नैवद्य घेऊन होळीवं येतात. त्यावेळी सर्वजण बाजारातून आणलेली नवी कपडे परिधान करून येतात. मुली होळीकडे येताना गळयात साखरेची गाठी, मुले हातात साखरेचा कडा, खिशात खोबऱ्याची वाटी आणतात. मग पेटत्या होळयाआयमध्ये निवद टाकून झाल्यावर होळयामधून अंगारा (राख), खांबाचा थोडा काळा कोळसा घेऊन सर्वजण आपआपल्या घरी जातात. घरी गेल्यानंतर घरातील सर्वांना तो अंगारा लावतात. मग जेवणाच्यावेळी होळयाआयच्या नावाना पुन्हा चुलीमध्ये पुरणपोळी आणि सारभाताचा निवद दाखवला जातो. मग घरातील सर्वजण जेवायला बसतात. **डांगाण प्रदेशातील होळी पेटविण्याचा कार्यक्रम हा संध्याकाळी साधारण साडेसात ते आठ - साडेआठ या दरम्यान पेटविण्याची पुर्वपरंपरेपासून पध्दत आहे.** या मागील कारण या भागातील लोक असं सांगतात की, या सणाचा आनंद लहान मुलांना योग्य वेळेत घेता येतो. त्याबरोबर आदिवासी समाज हा नृत्य आणि गीतांना महत्व देणारा असल्याने त्यांना नाच गाण्यांसाठी पुरेसा वेळ मिळत असतो. हा देखील त्यामागील उद्देश आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

जेवण झाल्यानंतर रात्री सर्वजण गावातील पटांगणत जमा होऊन वेगवेगळया खेळांना सुरूवात होत असते. **मुले कबड्डी, आटयापाटया, चिली, लपाछपी असे खेळ खेळत** तर **मुली लंगडी, फुगडी खेळत, गाणी म्हणत** असतात. **तरूण – वृध्द लेझिम खेळतात**, मग **वयस्कर मंडळी लावण्या म्हणतात. काही जण होळयाआयच्या स्थानकावर होळी जागवण्यासाठी** जातात. **रात्रभर भजन, किर्तन** चाललेले असते. अशी पाच दिवस होळीवर जागराणाचा कार्यक्रम चाललेला असतो.

**समारोप :**

आदिवासी समाज हा आदिम कालापासून नागर संस्कृतीपासून दूर आहे. त्यामुळे त्यांची संस्कृती, रूढी - परंपरा, रीतीरिवाज, जीवन धारणा इतर जनसमूहापेक्षा वेगळया आहेत. ते आपल्या संस्कृतीप्रमाणे गरिबीत हे सण उत्साहाने, मोठया आनंदाने साजरे करतात. यामध्ये समूहमनाचा आविष्कार झालेला दिसून येतो. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या लोककथा, लोकगीते, नृत्य ही मौखिक परंपरेने चित्रित झालेली दिसून येते. हा आदिम परंपरेचा खऱ्या अर्थाने जिवंत झरा आहे. म्हणूनच असे म्हणता येते की, हे सर्व आदिम परंपरेचा खऱ्या अर्थाने मौखिक इतिहास आहे. त्याचे जतन, संवर्धन करण्याची जबाबदारी आजच्या आधुनिक युगात नवीन पिढीवर आहे.

**निष्कर्ष :**

१. आदिवासी जमातीची लोकसंस्कृती, आदिवासी परंपरा आणि मौखिक इतिहासाचे आधुनिक युगात जतन संवर्धन करणे.
२. संशोधकांनी प्रत्यक्ष आदिवासी गाव - पाडयावर जाऊन संशोधन आणि संकलन करण्याची गरज आहे.
३. आदिवासी समाज सर्व सण - उत्सव साजरे करताना निसर्गाची हानी होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतात.
४. आदिवासी संस्कृती परंपरा आणि मौखिक इतिहासाचा अभ्यास संशोधकांनी स्थानिकांच्या मदतीने घेणे गरजेचे आहे.
५. शासन पातळीवर अशा प्रकल्पांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. मांडे, प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद - ३, आवृत्ती पाचवी : २८ सप्टेंबर २००९. (पृ. ७).
२. लोहकरे, संजय, लोकसाहित्य आणि लोकजीवन, सुगावा प्रकाशन, पुणे - ३०. प्रथमावृत्ती : मे २०१५ (पृ. ८).
३. गारे, गोविंद, (संपा.) आदिवासी लोककथा, विनयक तुमराम यांच्या प्रस्तावनेतून कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - ३०. प्रथमावृत्ती : १५ डिसेंबर २००३. (पृ. ९).
४. गारे, गोविंद, सह्याद्रीतील आदिवासी : महादेवकोळी, आदिम साहित्य प्रकाशन, पुणे - ३०, तृतीयावृत्ती २००७, (पृ. ४४.)
५. रोंगटे, तुकाराम, आदिवासी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा, दिलीपराज प्रकाशन, पुणे, ३०. प्रथमावृत्ती : जानेवारी २०१४. (पृष्ठ क्र. ९५).

**मूलसंदर्भ :-**

६. (१.) कौसाबाई गणपत नाडेकर (वय – ६०) मु. विहिर, पो. कोहणे, ता. अकोले, जि. अहमदनगर. (२.) लुमाबाई बाबूराव कोरडे (वय – ६५) मु. विहिर, पो. कोहणे, ता. अकोले, जि. अहमदनगर. (३.) व्दारकाबाई गोविंद भांगरे (वय – ४६) मु. विहिर, पो. कोहणे, ता. अकोले, जि. अहमदनगर.
७. तत्रैव, मूलसंदर्भ.

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026


Original Article

# आदिवासी लोकसंस्कृती, परंपरा आणि मौखिक इतिहास एक संशोधनात्मक अभ्यास


**Sarita Dashrath Deshmukh[1] Dr. Baban Bhivsen Jadhav[2]**

[1]Research scholar, Research Center SMDL College kalamboli

[2]Guide, SMDL College kalamboli

**Email: saritadeshmukh23@gmail.com**



**Manuscript ID:**

JRD -2026-180216

ISSN: 2230-9578

Volume 18

Issue 2(XIX)

Pp. 70-73

February - 2026

**Submitted:** 20 Jan. 2026

**Revised:** 30 Jan. 2026

**Accepted:** 15 Feb. 2026

**Published:** 28 Feb. 2026



***गोषवारा:***

*इतिहास लेखनाची पारंपारिक चौकट प्रामुख्याने लेखी पुराव्यांवर आधारित राहिली असून त्यात आदिवासी लोकसंस्कृती परंपरा आणि मौखिक इतिहास यांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. प्रस्तुत संशोधन निबंध आदिवासी लोकसंस्कृती,परंपरा आणि मौखिक इतिहास यांचा परस्पर संबंध त्यांचे ऐतिहासिक महत्त्व आणि मुख्य इतिहासाशी असलेले नाते यांचा अभ्यास करण्यात आला आहे. या घटकांमुळे इतिहास अधिक समग्र मानवी आणि समाज कसा बनतो हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न या अभ्यासात करण्यात आला आहे.सामुदायिक मालकी पारंपारिक ज्ञान विधी आणि सण,उत्सव हे त्यांचे मुख्य घटक आहेत.आदिवासी समाजाचा इतिहास बहुतेक ठिकाणी लिखित स्वरूपात उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या परंपरा कथा आणि विधी हेच त्यांच्या इतिहासाचे साधन ठरतात.आदिवासी परंपरा या मौखिक इतिहासाच्या प्रमुख वाहक आहेत.*


**गृहीतक:**

1. लोकसंस्कृती आणि आदिवासी समाजाच्या परंपरा ऐतिहासिक वास्तव व्यक्त करतात.
2. लोक संस्कृतीतील लोकगीत कथा परंपरा हे सामाजिक बदलाचे अप्रत्यक्ष ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून कार्य करतात.
3. मौखिक इतिहास हा पुराव्यांच्या स्वरूपामुळे मुख्य इतिहासाच्या चौकटीत बसत नाही.
4. इतिहास लेखनासाठी मौखिक इतिहासाचा शास्त्रीय पद्धतीने वापर आवश्यक आहे.

**उद्दिष्ट:**

1. लोकसंस्कृती आणि आदिवासी परंपरांचा इतिहासाशी असलेला संबंध स्पष्ट करणे.
2. मौखिक इतिहासाचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट करणे

**प्रस्तावना:**

इतिहास हा केवळ राजकीय घडामोडींची नोंद नसून समाजातील विविध घटकांच्या जीवन अनुभवाचे प्रतिबिंब असते.लोकसंस्कृती,आदिवासी परंपरा आणि इतिहास हे समाजाच्या तळागाळातील वास्तव्य व्यक्त करतात. मात्र पारंपारिक इतिहास लेखनात या घटकांकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. त्यामुळे इतिहास अपूर्ण आणि सत्ता केंद्रित राहिला आहे. या संशोधनाचा उद्देश या तीन संकल्पनांचा सिद्धांतिक व विश्लेषणात्मक करणे हा आहे.मौखिक इतिहास म्हणजे समाज समुदाय व्यक्ती आठवणी,अनुभव कथा,गाणी व कथन याद्वारे जतन झालेला इतिहास हा इतिहास पिढ्यानपिढ्या तोंडी परंपरेतून पुढे जातो.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*


Quick Response Code:


Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.21319136

OPEN ACCESS



**Address for correspondence:**

*Sarita Dashrath Deshmukh, Research scholar, Research Center SMDL College kalamboli*



**How to cite this article:**

Deshmukh, S. D.& Jadhav, B. B. (2026). आदिवासी लोकसंस्कृती, परंपरा आणि मौखिक इतिहास एक संशोधनात्मक अभ्यास. Journal of Research & Development, 18(2(XIX)), 70–73. https://doi.org/10.5281/zenodo.21319136

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

मौखिक इतिहास व्यक्तिनिष्ठता भावना स्मृती यांचा मोठा सहभाग असतो. पुराव्यांच्या दृष्टीने तो मुख्य इतिहासात मोडत नसला तरी तो सामाजिक वास्तव समजून घेण्यासाठी तो अत्यंत महत्त्वाचा आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंध आदिवासी लोकसंस्कृती,परंपरा आणि मौखिक इतिहास एक संशोधनात्मक अभ्यास, हा तयार करण्यासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक आणि ऐतिहासिक संशोधन पद्धती वापरण्यात आली आहे.तथ्य,संकलन गोळा करण्यासाठी दुय्यम सामग्री या पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये विविध प्रकारचे संदर्भ ग्रंथ, पुस्तक, मासिक व इंटरनेट यांचा वापर करण्यात आला आहे.

**विस्तार:**

आदिवासी कोणास म्हणावे, आदिवासी समाज म्हणजे अति प्राचीन समाज किंवा अतिशय अप्रगत समाज असे समीकरण करणे चुकीचे आहे मानववंशशास्त्राने वैज्ञानिक पद्धतीने आदिवासी समाजाच्या व्याख्या करून आदिम समाजाविषयीची चुकीचे गृह तर दूर केलेत. त्याचबरोबर आदिवासी कोणास म्हणावे याही प्रश्नांची उत्तर दिले आहे. यासाठी विविध मानवशास्त्रज्ञांनी व अभ्यासकांनी आदिम समाजाच्या केलेल्या व्याख्या विचारात घेणे आवश्यक आहे

**1.गिलीन व गिलीन** यांच्या मते एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा समाज बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटाच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात.

**2. डब्ल्यू जे पेरी** यांनी आदिवासी समाजाची कमीत कमी वैशिष्ट्य सांगितलेली आहेत ते म्हणतात समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच समान भूप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समूहाला अदिम समाज असे म्हणतात.

**3. डॉ. रिव्हर्स** म्हणतात ज्या समूहातील सदस्य एकसमान बोली भाषा बोलतात. युद्ध वगैरे सारख्या उद्दिष्टकरिता एक होऊन झटतात. अशा सरळ व साध्या सामाजिक समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात.

4. **डी एन मुजुमदार** यांनी आदिवासींची सर्व लक्षणे लक्षात घेऊन त्यांची विस्तृत व्याख्या केली आहे. ते म्हणतात समान नाव असणारा एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करणारा एकच भाषा बोलणारा व विवाह व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निःशेद्ध नियमांचे पालन करणारा परस्पर उत्तरदायित्व निर्माण करणाऱ्या दृष्टीने एक पद्धतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाची किंवा कुटुंब समूहाचे एकत्रिकरण म्हणजे आदिवासी समाज होय.शिकागो येथे 1962 मध्ये जनजाती समितीची परिषद भरली होती. या परिषदेने आदिवासींची एक व्याख्या केली या परिषदेनुसार आदिवासी हा एक समान भाषा बोलणारा, एका पूर्वजण पासून उत्पत्ती सांगणारा, एका विशिष्ट प्रदेशात वास्तव्य करणारा, तांत्रिक ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला अक्षर ओळख नसलेला व रक्त संबंधावर आधारित सामाजिक व राजकीय प्रथांचे प्रामाणिकपणे पालन करणारा एकजनसी समूह आहे. वरील व्याख्यान वरून आदिवासी समाजाच्या विविध व्याख्यांवरून अधिक समाजाची लक्षणे स्पष्ट होतात. आदिवासी समाज हा इतर कोणत्याही समाजापेक्षा अनेक दृष्टीने वेगळा असल्याचे प्रचीतीला येते. विशिष्ट भूप्रदेश प्रमाण लघुत्ता एकाच रक्त संबंधावर आधारित स्वतःची बोलीभाषा पण लिपीचा अभाव वेगळी जीवन पद्धती साधी अर्थव्यवस्था सिमित तंत्रविद्या समान धर्म सामाजिक एकजीनसीपणा इत्यादी विशिष्टयांनी आदिम समाजाचे वेगळेपण नजरेत भरते. इव्हन्स प्रीचर्ड यांनी प्रमाणलघुता,सीमित,तंत्रविद्या, साधी अर्थव्यवस्था या लक्षणांना विशेष महत्त्व दिले आहे.आदिवासी परंपरा निसर्गाशी घट्ट जोडलेल्या जीवन पद्धतीवर आधारित असतात.भारतात जवळपास सर्वच राज्य व केंद्रशाशित प्रदेशात आदिवासी समाजाचे वास्तव्य आठळते. भारतात आदिवासी जमातीची नावे भिन्न आहेत. प्रत्येक जमातीची भाषा बोलीभाषा,चालीरीती ,सणवार, वस्त्रवापर इत्यादि बाबी देखील वेगवेगळया आहेत.भारतीय आदिवासीमध्ये भोगोलिक,वांशिक,भाषा,आर्थिक,सामाजिक आणि संस्कृतिक बाबतीत भिन्नता असल्याचे दिसून येते.नसर्गिक पर्यावरणात राहणाऱ्या या लोकांना कोणी जंगलाचे राजे म्हणतात. तर कोणी त्यांना धरतीचे लेकरे म्हणतात.याच लोकांचा उल्लेख आदिवासी किवा आदिमसमाज म्हणून केला जातो.विचारवंत,अभ्यासक,इतिहासकार,प्रशासक व सामाजिक राज्यकर्ते यांनी या समाजाला विविध नावे दिली आहेत.निसर्ग पूजा सामुदायिक मालकी पारंपरिक, ज्ञान, नीती आणि सण,उत्सव हे त्यांचे प्रमुख घटक आहेत. आदिवासी समाजाचा इतिहास लिखित स्वरूपात उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या परंपरा, कथा आणि भिंती हेच त्यांच्या इतिहासाचे साधन ठरतात.आदिवासी परंपरा या मौखिक इतिहासाचा प्रमुख वाहक आहेत.

**लोककला:-** नृत्य,ढोल,पावरी यासारखे वाद्य प्रसिद्ध आहेत. भिंतीचित्रे अंगावरील रंगकाम आणि हस्तकला,शिल्पकला ही आदिवासींची ओळख आहे.

**जीवनपद्धती:-** आदिवासी जमातीचे प्रमुख गाव पंचायत सामूहिक निर्णय ही पद्धत आहे. परस्पर सहकार्य समानता आणि बांधिलकी महत्त्वाची मानली जाते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

**सण उत्सव रितीरिवाज:-** जन्म, मृत्यू, लग्न यासाठी स्वतंत्र विधी असतात. सणांमध्ये पोळा, गौरीगणपती,दसरा दिवाळी, होळी यांना विशेष महत्त्व आहे.आदिवासी समाज हिंदू धर्मियांबरोबर अनेक वर्ष राहत असला तरी आपल्या धर्माविषयी निष्ठा आणि श्रद्धेमुळे जीवन जगत आहेत.हिंदू धर्मातील अनेक संस्कार उत्सव चालू देते जरी आदिवासींनी स्वीकारल्या तरी त्या साजरे करण्याची प्रथा वेगळी आहे.उदाहरणार्थ जन्म,मृत्यू,सण,समारंभ आणि उत्सव साजरे करतात. विधीनिशेधन बाळगतात दारू पिऊन नाचण्याची प्रथा पाहावयास मिळते.विवाहप्रसंगी ब्राह्मण येत नाही. अशा प्रकारे आदिवासींचे सण मुख्यत दोन प्रकारचे असतात.एक म्हणजे ऋतू नुसार प्रत्येक ऋतूत साजरा केला जाणारा ऋतु पंचमी परंपरागत तर दुसरा धार्मिक देव देवतांना प्रसन्न करणे हा धार्मिक सणाचा मुख्य उद्देश आहे. सणासुदीच्या वेळी जत्रेयत्रेच्या वेळी अथवा एखाद्या धार्मिक विधीच्या वेळी हाऊस मौजेने गाव नाच हाच त्यांचा मोठा आनंद असतो.पाघरायला आभाळ आणि निजायला धरती अन उषाला धोंडा सावरित तणांची सेज करणाऱ्या आदिवासींच्या सामाजिक जीवनात हळूहळू बदल होत गेलेला दिसतो. त्यामुळे त्यांच्या जीवन पद्धतीत व रीतीरिवाजा मध्ये बदल होत आहेत असे दिसून येते.आदिवासी जमाती डोंगराळ भागात राहतात त्यामुळे या जमातीची लोक शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या आहेत त्यांच्या उन्नतीच्या मार्गात आणि अडचणी येतात अलीकडे आदिवासी जीवनासंबंधी इतर समाजाला बरीचशी माहिती झालेली आहे त्यामुळे बिगर आदिवासी समाजाशी आदिवासींचा खूप संपर्क आलेला आहे. संस्कार, संस्कृती,आचार विचारांची त्यांच्या देवाण-घेवाण वाढली आहे.

**उपजीविका:-** शेती ,वनउपजत संकलन,मासेमारी आणि पारंपारिक हस्तकला यावर उपजीविका अवलंबून असते

**मौखिक परंपरा:-** कथा, लोकगीत, म्हणी, औषधीज्ञान आणि इतिहास हे लेखनापेक्षा मौखिक परंपरेने पुढे जातात.

**लोकसंस्कृती:-** आदिवासी जमातीचे लोक संस्कृती संपन्न आहे. आदिवासींची घरे झोपडया किंवा कुडाची कारवीची असतात आत्ता सध्याच्या काही वर्षापासून आदिवासींची घरे कौलारू दिसून येतात आदिवासी लोक भटके जीवन जगतात रानावनात राहतात भटके जीवन असल्याने त्यांची घरे पक्क्या विटांची दिसून येत नाहीत. आहार आदिवासींचा प्रमुख आहार भात नाचणीची भाकरी,वरीची भाकरी,मासे माशांचं सार कधी काळी सणावाराला गव्हाची पोळी केली जाते. हे लोक दिवसातून दोन वेळा जेवतात. पहिले जेवण सकाळी व दुसरे जेवण सूर्यास्ताच्या सुमारास करतात. भाजीपाला,डांगर,सुकी मासळी याला महत्त्व असते.आदिवासींचे जीवनमान बदलत असले तरी त्यांचे पारंपारिक दागदागिने इतरांपेक्षा वेगळे आहेत. त्याच्यातून त्यांची संस्कृती आपल्याला दिसून येते.आदिवासींमध्ये विवाह संस्काराबद्दल लोकांमध्ये पूर्ण आदर आहे.आदिवासी विवाह मध्ये गीत नृत्य ढोल ताशांच्या संगीत संगीतासहित इतर सांस्कृतिक विधींनी परिपूर्ण असतात. लावणीची कामे संपली की लोकांचे खेळ नृत्य चढाओढी सुरू होतात. कलेमध्ये रममान होतात असे पाहिले की त्यांच्या संस्कृतीचे जग वेगळेच दिसू लागते. दुःख दारिद्र्य पूर्णपणे विसरून नृत्याच्या वेळी त्यांच्या अंगात जोश संचारतो एखाद्या कारणाने ही मंडळी एकत्र आली की रात्रभर त्यांच्या नृत्याचे फड चालू असतात. तहानभूक विसरून रममान होतात. जेवण घेत नाहीत. पण चहा किंवा दारू पितात स्त्री पुरुष वेगवेगळे नाच करण्याची प्रथा त्यांच्या मध्ये आहे. पुरुषांच्या नृत्यात बैठका फेर, कमानी करून त्यातून जाणे एकमेकांच्या हातावर उभे राहून पिरॅमिड्स बनविणे वेगवेगळे सोंग घेणे असे विविध प्रकार आहेत. स्त्रियांच्या नृत्यात ढोलनाच, गौरी नाच, कोंबडनाच करतात. गायनाच्या सुरुवातीला अनुक्रमे धरणीमाता,अन्नदेवता, पर्जन्य,मेघ मंडळ मारुती, गावदेवी, गोमाता सर्व सभाजन आणि माय बहिणींना नमस्कार वंदन केले जाते व विविध गाणी गायली जातात. स्त्रियांची गाणी मात्र अर्थपूर्ण असतात नृत्याचे वेळी एकत्र जमतात. त्यावेळी सवाल जवाब चालतात. आदिवासी लोक शुभप्रसंगी नाचगाणी करतात. होळी,नागपंचमी व पोळा दसरा, गोकुळाष्टमी,दिवाळी या सणांना त्यांच्या नृत्यकलेला बहर आलेला असतो. दिवसभर काम करून थकून आल्यावर रात्री नाचगाणे चालते पितरपाटयात नृत्य व गायन बंद असते. विशेष बाब स्त्री पुरुष एकत्रित सोबत नाचत नाहीत स्त्रिया वेगळ नृत्य करतात. त्यासोबत गाणीही म्हणतात पुरुष मंडळी ढोलाच्या तालावर नाचतात. गाणेही म्हणतात. गाण्यांची विषय साधारणपणे त्यांच्या जीवनाशी देवधर्माशी संबंधित असतात.

**निष्कर्ष:**

आदिवासी लोकसंस्कृती परंपरा आणि मौखिक इतिहास हे इतिहासाच्या कडेला नसून समाजाच्या मूळ प्रवाहात आहेत. मौखिक इतिहास मुख्य नसला तरी तो दुर्लक्षित समाजाचे अनुभव समोर आणतो. समग्र आणि न्याय इतिहास लेखनासाठी या घटकांचा स्वीकार अनिवार्य आहे. लोकसंस्कृती आणि आदिवासी परंपरा या मौखिक इतिहासाच्या आधारावर टिकून आहेत. मौखिक इतिहास हा लोकांचा इतिहास मानतो तर पारंपारिक इतिहास सत्तेचा इतिहास मानतो. या सर्व घटकांचा समन्वय साधण्यासाठी इतिहास अधिक व्यापक व समावेशक होतो.समाजातील अनेक घटकांचे निरीक्षण केल्यानंतर असे दिसून येते की आदिवासी समाजाचा अजून पर्यंत विकास झालेला नाही आपल्या संविधानात आदिवासी आणि अनुसूचित जमातींना विशेष मान्यता देण्यात आली आहे परंतु अजून पर्यंत त्यांच्या विकासात पाहिजे त्या प्रमाणात सुधारणा झालेल्या दिसून येत नाहीत.त्यांच्या सुधारण्यासाठी सरकारकडून पावले उचलण्यात आलेली आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIX) February - 2026

**संदर्भ ग्रंथ**

1. आगलावे प्रदीप “आदिवासी समाजाचे समाजशास्त्र” श्री साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथमवृत्ती ऑगस्ट 2004 पृ. क्र. 23.
2. आकरे बी .एल. "आदिवासी आणि सामुदायिक विकास योजना" पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स नागपूर.
3. कालेकर गोविंद मंगेश "मुंबई इलाख्यातील जाती" मुद्रक अनंत आत्माराम मोरमकर ,श्री लक्ष्मीनारायण छापखाना, 364 ठाकूरद्वार मुंबई नं.2, इ. स.1928,प्रथमवृत्ती,पृष्ट क्र. 22,23.
4. चौधरी की का "महाराष्ट्र राज्य गॅझेटियर रायगड जिल्हा" प्रकाशक कार्यकारी संपादक व सचिव दर्शनीका विभाग महाराष्ट्र शासन मुंबई, 1993,पृष्ट क्र. 238,239.
5. गारे गोविंद “महाराष्ट्रातील आदिवासी जमाती” प्रकाशक अनिरुद्ध अनंत कुलकर्णी कॉन्स्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर पुणे 411030 प्रथमावृत्ती-2000,पृष्ट क्र.01.
6. गारे गोविंद “सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील ठाकूर आदिवासी”, श्री विद्या प्रकाशन 250, शनिवार पेठ, पुणे 4 11030, प्रथमावृत्ती, 29 मार्च 2002,पृष्ट क्र.151.
7. पाथरकर एस व्ही “रायगड जिल्ह्यातील आदिवासी लोकजीवन” पृष्ट क्र. 78.